म. ग्रं. सं. ठाणे.
विषय निबंध
क्र. 3408



REFBK-0026781

# आपुलाचि वाद

मधु जामकर

संदर्भ
निबंध
३५०८
२६६८१
७/१२/९२

**मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.**

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागले.

30 JAN 1993
13 FEB 1993
17 FEB 1993
6 MAR 1993
17 MAR 1993
24 APR 1993
28 AUG 1993
AUG 1997

(क्र. मा. पहा)
१००००–११–८९

# आपुलाचि वाद

लेखक :
प्रा. मधु जामकर

REFBK-0026781

प्रतिमा प्रकाशन

❋ **प्रकाशन क्रमांक : ८७**

❋ **प्रकाशक :**
अरुण पारगावकर
१३५९ सदाशिव पेठ, नवा विष्णू चौकाजवळ,
पुणे ४११ ०३०, फोन ४३७ ४४४

❋ © मधु जामकर
'दिलासा', स्नेहनगर
परळी - वैजनाथ ४३१ ५१५

❋ **मुद्रक :**
**अजय ऑफसेट,**
८, काका हलवाई इस्टेट,
पुणे-सातारा रोड,
पुणे ४११ ००९

❋ **अक्षरजुळणी :**
**टाइपो आर्टस्**
१४८१ शुक्रवार पेठ,
पुणे ४११ ००२

❋ **मुखपृष्ठ / :** चिंतामणी हसबनिस, पुणे

❋ **प्रथमावृत्ती :** १५ ऑगस्ट १९९२

❋ **मूल्य रुपये ५०/-**

चि. सुधास,

भैय्या, जेवढा तू जवळ, तेवढाच दूर

तुझ्या कर्तृत्वाला माझी ही 'झालर'

– मधु.

# अनुक्रम


१. अश्रु / ७
२. पाचोळा / ११
३. कण्हेरी / १५
४. दिलासा / २०
५. कडुलिंब / २५
६. मोगरा फुलला / २८
७. लागे बांधे / ३४
८. वळण / ४०
९. किनारा / ४४
१०. अंधार / ४९
११. पानझड / ५३
१२. आकाश / ५७
१३. एकला नयनाला विषय तो झाला / ६२
१४. देणाऱ्याने देत जावे / ६६
१५. मैत्र जीवाचे / ७२
१६. आपुलाचि वाद / ७८
१७. निंदक / ८३
१८. कॅथार्सिस / ८७
१९. साभार परत / ९२
२०. प्राजक्ताशी जडले नाते / ९७
२१. हेचि सर्व सुख / १०१
२२. खुराडे / १०८
२३. अनुदिन अनुतापे / ११६
२४. मृत्यूचे साम्राज्य / १२२


---


**वरीललेख युगवाणी, प्रसाद, साधना, दै. मराठा, वसंत, मनोरा, प्रतिष्ठान, दै. मराठवाडा, हंस, सोबत ह्या नियतकालिकांतून प्रकाशित झाले आहे. सर्व संपादकांचे आभार.**

# निवेदन

मित्रहो,

'आपुलाचि वाद' हा माझा पहिला लघुनिबंध संग्रह वाचकांच्या हाती देताना मला मनस्वी आनंद होत आहे. या संग्रहात लघुनिबंध या वाङ्मय-प्रकाराची परंपरा आणि नवता जपण्याचा मी यथाशक्ती प्रयत्न केला आहे. त्याचबरोबर या वाङ्मयप्रकारात मी स्वत:चे असे सूत्रही जपण्याचा प्रयत्न केला आहे. लघुनिबंध हा सौंदर्यदर्शन आणि तत्त्वचिंतन यांचा सुमेळ असतो. तसेच तो व्यक्तिमत्त्वाचे नवे नवे उन्मेष हसत खेळत तुमच्यापर्यंत आणून सोडतो. अशा वेळी कलावंतास जे जीवनसत्य दैनंदिन जीवनात जाणवलेले असते त्या केंद्राभोवतीच या वाङ्मयप्रकाराची वाटचाल होत असते. 'आपुलाचि वाद' हा या संग्रहाचा केंद्रबिंदू एक बाजूने 'वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरे' असा आहे, तर त्याची दुसरी बाजू 'आपुलाचि वाद आपणासी' अशी आहे. सौंदर्य आणि तत्त्वचिंतन असे इथे एकरूप झालेले दिसेल.

मानवी जीवनात एकांत ही एक महत्त्वाची वस्तू आहे. संसाराच्या रामरगाड्यातून मन जरा अलिप्त करायचे. मन शांत करायचे. मनावरची सारी सुखदु:खाची गाठोडी क्षणभर काढून फेकून द्यायची. मनाला मुक्त करायचे. मला हा साक्षात्कार घरच्या बागेत नियमित येतो. म्हणून मला घरची बाग हे एक वैभव वाटते. या बागेत मला एकांत, विश्रांती मिळते. यावेळी मी आपल्या खोल स्वरुपाशी जणू मिळून जातो. पार आत आत जातो. बागेत मी माझे हृदयाकाश रिकामे करतो. स्वच्छ करतो. म्हणून मला एकांताचा हव्यास आहे. बागेतील या एकांतामुळे मला पटकन एकाग्रताही येते. या

एकाग्रतेमुळे मनावरील सारी किल्मिषे बाजूला सारली जातात. सारे संत निसर्गाच्या सान्निध्यात पटकन चित्त एकाग्र करून सर्व परिस्थितीचे आकलन करून घेत. म्हणूनच त्यांना एकांतात सामर्थ्य मिळाले; आशा मिळाली.

तुमच्या घराला जेव्हा बागेचे आंदण मिळते, तेव्हा ती एक वैभवशाली एकांताची जागा असते. या बागेत जाऊन सारे काही विसरायचे, तिच्या सान्निध्यात उघडे व्हावयाचे. जणू तिच्या स्पर्शाने आपल्या जीवाचे सोने करून घ्यायचे! यात केवढे अपूर्व समाधान आहे! या बागेतून जेव्हा तुम्ही घरात याल, तेव्हा अपार चैतन्य तुमच्याजवळ आलेले असेल. दुर्दम्य आशावाद तुमच्याजवळ आलेला असेल. एव्हाना तुम्ही श्रद्धेचे सामर्थ्य घेऊन आलेले असाल. मला जेव्हा बागेत असा एकांत मिळतो, तेव्हा मी माणूसघाणेपणा घेतलेला नसतो; उलट माझ्या माणूसवेडेपणास इथे भरतीच आलेली असते. एकांत म्हणजे मनावरचे क्षुद्र पापुद्रे काढून जीवन धुऊन टाकण्याची जागा आहे. जनसेवा आणि ईशसेवा या दोन्हींचा मेळ मला या एकांतसेवनात आढळतो.

एकांतप्रिय माणसाने स्वत:शी घातलेला वाद हा नेहमीच संवादासाठी भुकेलेला असतो. साद प्रतिसादासाठी तिष्ठतो, तसे हे कलावंतांचे रसिकांसाठी तिष्ठणे आहे. यात परस्परांचे आत्मनिरीक्षण हेच एकमेकांचे आत्मपरीक्षण होऊन जाते. हा संग्रह उघडताना याकडे लक्ष द्यावे ही नम्र विनंती. यातील वैचारिकता जिथे जिथे रूक्ष, पाल्हाळवजा आणि पुनरुक्तीची वाटेल तिथे हा लेखक आपल्या कलात्मक पंगूपणाचे दर्शन घडवीलच. पण त्यातील अचूक सौंदर्यदर्शन तत्त्वचिंतनाच्या ओघाने तुमच्या हृदयास हात घालील एवढा मला विश्वास वाटतो. शेवटी 'आपुलाचि वाद' मध्ये जेवढा 'मी' आहे, तेवढाच 'तू' देखील अध्याहृत झालेला आहे. अन्यथा लिहिणे आणि वाचणे या क्रिया परस्परांशी निगडित राहिल्या नसत्याच. म्हणूनच या संग्रहाचे सूतोवाच करताना रसिकांनीच त्याला उजळायचे आहे, एवढेच!

या संदर्भात माझे मित्र प्रकाशक श्री. अरुण पारगावकर यांच्या धाडसाविषयी मी काय लिहू?

**–मधु जामकर**

**परळी-वैजनाथ**

# ९ / अश्रू

पावसाळी ढग आकाशात पसरत जावेत तशी सुन्नता पसरत जाते. कोंडलेल्या जिवाची कासावीस वाढू लागते. शरीराचे ओझे फेकून देण्याइतके वाढते. वाहता वारा सुन्नतेत मिसळून जातो आणि झाडांची पाने तडफडू लागतात. पाखरे घरट्यातून बाहेर व बाहेरून घरट्यात येतात नि जातात. त्यांना ही ये-जा कळतच नाही. सगळ्याच सावल्या बाजूच्या संथ तळ्यात बुडी घेतात. मग मासे भीतीने एका कोपऱ्यात लपून बसतात. अशा वेळी अश्रू नकळत गळू लागतात. जणू सुन्नतेच्या राज्यात अश्रूंवर तिचाच हक्क. पण अश्रू काय कमी चलाख ? ते सुन्नतेला गोडीने बाजूला सारतात आणि स्वत:च्या अस्तित्वाने चमकू लागतात. तेव्हा कुठे अश्रूंना स्वत:चे चीज वाटते व सारी सुन्नता मग तळ्यात साखरेप्रमाणे विरघळून जाते.

लहानपणी मला कुणी ‘ रडका ’ म्हटलं की, मोठा कमीपणा वाटत असे. पुढे जसजसा मी मोठा होत आलो तसा माझा रडकेपणा अपरिहार्यपणे आपोआप कमी झाला, पण मला त्याचे समाधानच वाटेना. कारण मी अश्रूंच्या मोठ्या सौंदर्याला मुकलो ना ! तेव्हा कुठे मला ‘ लहानपण दे गा देवा ’ यातील मर्म कळू लागले. शिक्षकांनी शाळेत विद्यार्थ्यांना मारू नये अशी मोहीम काढल्यामुळे शिक्षक विद्यार्थ्यांच्या अस्सल सौंदर्याला व कौतुकाला मुकले यात शंका नाही. ‘ छडी लागे छमछम ’ ह्या म्हणीचा जन्मदाता बुद्धिमान असावा बापडा ! अश्रूसाठी हपापलेला तर नसेल ना ? माणूस जन्मला की प्रथम रडतो. ज्या अश्रूंनी जीवनाची सुरुवात होते त्यांचे शुभदर्शन प्रथम आईलाच घडते म्हणूनच ती श्रेष्ठ ठरली जाते.

काकांचा स्वभाव मला अगदी चॉकलेटप्रमाणे आवडतो. ते जेव्हा घरी येतात तेव्हा लहानापासून ते मोठ्यांपर्यंत साऱ्यांना हमखास रडकुंडीस आणतात. आणि मग कुठे त्यांच्यातला कवी जागा होऊन म्हणू लागतो – 'सदू रडत नाही, तो मोती सांडीत आहे,' 'मंदाने आपल्या हरणीवत डोळ्यांत दवबिंदू साचविले आहेत' आणि मग सगळे हसू लागतात. रडक्या पण हसऱ्या चंदूकडे बोट दाखवीत काकांचे बोलणे 'याला म्हणतात आनंदाश्रू' अशाने संपते. काका ऑफिसला जातात आणि मी मात्र अश्रूंच्या खिरापतीसाठी वाट पाहत बसतो.

परवा नाही का, सरांनी शेलेची कविता तल्लीनतेने शिकवली आणि 'Our sweetest songs are those that tell of saddest thoughts' हा मानवी जीवनाचा सिद्धांत आम्हापुढे मांडला. मला मात्र त्यातलं प्रथम काहीच कळलं नाही. पण जेव्हा संध्याकाळी अरुणबरोबर फिरायला गेलो तेव्हा त्याने शेलेवर बेधडक 'रडका' म्हणून रिमार्क मारला तेव्हा कुठं वरील सौंदर्यपूर्ण सिद्धांताचं सार मला कळलं. एवढंच काय, माझा एकमेव कवी शेलेच झाला व रोज अरुणबरोबर फिरताना मला त्याचीच कीव वाटू लागली. क्रौंच पक्ष्यावर बाण मारताना पाहून विरहावस्थेत वाल्मीकींना म्हणे काव्य सुचले. पण मला वाटते प्रथम वाल्मीकींनी त्या जोडप्याकडे पाहून अश्रू गाळले असतील आणि मग त्या अश्रूंनी त्यांना काव्यास स्फूर्ती दिली असेल. म्हणून वाल्मीकी 'न भूतो न भविष्यति' ठरले. कवी लोक फारच हळवे व रडके असतात. खरोखरीच यात त्यांच्या गौरवाचा कितीतरी भाग आहे. कवी रडके असतात म्हणूनच कवी नावाने शोभतात.

द्रौपदीवर नेहमी संकटे येत व तिचा आपला रडत रडत कृष्णाचा धावा सुरू होई. पण कृष्ण मोठा धूर्त! आपल्याला द्रौपदीचे अश्रू मिळावेत म्हणून संकटेच संकटे पाठवीत राही. बिचारी भोळी द्रौपदी, तिला कृष्णाचं कारस्थान कुठलं कळणार? देवाला मग सत्तेची हाव असते. परंतु देवकोटीला पोचलेला कृष्ण अश्रूंसाठी हावरा झाला नाही का?

उन्हाळ्याची सुट्टी संपली आणि मी परत इकडे येण्यास निघालो. येताना मी सर्वांना पद्धतीप्रमाणे नमस्कार केला. तितक्यात कोपऱ्यात रडत बसलेली आजी मला दिसली आणि मला समाधान वाटलं. माझा सारा प्रवास तिच्याच अश्रूंवर तरंगून गेला. अश्रू म्हणे लवकर नाहीसे होतात. पण त्यात नवल काय? अश्रूंनी आपली चमक दाखविली न दाखवली तोच सारेजण त्यांना हावरेपणाने

आत्मसात करतात आणि त्यांच्यावर स्वत:चाच हक्क गाजवतात. माणसाचे जीवन पाण्याचा बुडबुडा आहे. याहीपेक्षा 'जीवन म्हणजे अश्रू' ही कल्पना कवीवर मात करणारी नाही का?

तारुण्यात म्हणे माणसाच्या चेहऱ्यावर तेज चढते. बालपणी खूप रडके असल्याने साऱ्या अश्रूंचे सौंदर्य एकत्र येऊनच जणू काय तारुण्याला बहर येतो. आणि म्हातारपणी जणू नव्या अश्रूंना जन्म देण्यासाठी त्यांच्या चेहऱ्यावर पूर्वतयारी साठवलेली दिसते. पण काही म्हातारी माणसे आपले अमूल्य अश्रू न सोडण्यासाठी हटवादीपणा करण्यास देखील कमी करत नाहीत. त्यांना वाटते, आपल्या उभ्या जीवनाची हीच एकमेव ठेव आहे. साऱ्या आयुष्याची तेजस्वी कर्तबगारी एका अश्रूत साठवली जाते, आणि मग कळू लागतं की यशोदेला कृष्णाच्या तोंडात सारे ब्रह्म दिसले त्याहीपेक्षा अश्रूंची थोरवी जास्त आहे. क्षणभर आपल्याजवळ असलेल्या अश्रूंचे कौतुक वाटते. आणि पुन्हा क्षणांनी अश्रू नसल्याचा पश्चात्ताप वाटतो, पण रडू मात्र येत नाही. अशा वेळी मी जितका तृप्त तितकाच अतृप्त, जितका सुखी तितकाच दु:खी होतो.

अश्रूंचा खेळ मला मनापासून आवडतो; पण त्याहीपेक्षा अश्रू माणसांना खेळविताना फारच खुलून दिसतात. लहान मुलींनी झिम्मा खेळावा व स्वत:ला विसरावे तसे माणसे स्वत:स विसरून अश्रूत मिसळतात. आकाशातून निसर्गत: पाऊस पडतो यावर विश्वास ठेवूनसुद्धा नेहमी माझे मन एका गोड कल्पनेत गुंगलेले असते की, स्वर्गातील देव व गंधर्व एकत्र येऊन आनंदाने खेळत असावेत व त्याच नितांत हर्षातून गळणारी आसवे म्हणजे तर पाऊस नव्हे ना? पण लगेच दुसऱ्या क्षणी बिचारी देव-गंधर्व मंडळी अशा थोर अश्रूंना मुकली याबद्दल वाईट वाटते व त्यांच्या उदारपणाचे कौतुक करण्यात मला समाधान मानावे लागते.

अश्रू येतात आणि माणसातला माणसाचा आकार येतो. त्यांच्यात जीवनरस अश्रू ओततात. म्हणून जीवन रसाळ दिसते. त्यास पाहून इतरास जगावेसे वाटते. बहिऱ्यांना कान फुटल्याचा आनंद होतो, तर आंधळ्यांना डोळसपणा येतो व अश्रू अभिमानाने ताठर बनतात.

अश्रू जातात व माणसाला माणूसच नाहीसा होतो. जीवन कोरडे बनते. आयुष्याच्या साऱ्याच क्रिया बंद होतात आणि शरीराचे पुन्हा ओझे वाढते. न पेलणारे ओझे! म्हणूनच ते नकळत फेकले जाते. आकाशात ढग जमतात. सुन्नतेचे पुन्हा राज्य पसरते. कोंडलेला जीव आपोआप बाहेर येऊन सुन्नतेत

मिसळतो. पावसाच्या सरीवर सरी येऊ लागतात. झोपलेले तळे खडबडून जागे होते व मासे पुन्हा त्यात खेळू लागतात अन् झाडांच्या पानांचा थर अलगद तळ्यावर साचतो.

❀ ❀ ❀

# २ / पाचोळा

समोरच्या कडूलिंबाखाली साचलेला पाचोळा जेव्हा हवेत उडू लागतो तेव्हा माझे काळीज चरचर करते. लहानपणी म्हातारी उडविण्याच्या खेळात आपणही क्षणभर असेच हवेत तरंगत जावे असा ध्यास वाटे. पण अलीकडे तेच दृश्य पाहून जड झालेले शरीर जागं करून हलू शकत नाही. मनाला क्षणभरही उडावेसे वाटत नाही. सृष्टीच्या नित्यक्रमात वृक्षाची पानझड व्हावी व खाली साचलेल्या पाचोळ्याने हवेत उडावे, पुन्हा वृक्षाखाली पालापाचोळा यावा, असे मी बालवयापासून पाहतो. पूर्वी निरागस मनाचे पाहणे कळण्यापलीकडचे होते. आज तेच मन वळण्यापलीकडे पोचले आहे. वसंतऋतूतील नवथर पालवी पाहून उल्हसित होण्यापेक्षा हेमंतऋतूतील पानझड पाहून अलीकडे मी नको तेवढा विचारी होत आहे. दृष्टी नसणे एकवेळ परवडेल, परंतु अधिक दृष्टी असणे तुमच्या दैनंदिन जीवनास अस्वस्थता देणारे ठरेल. म्हणून नजरेतून उडणारा पाचोळा व नजरेत बसणारा पाचोळा एकाचवेळी ऊन-पावसाचा खेळ खेळवीत बसतो, तेव्हा माझा मी स्वत:स हरवून अंतर्मुख झालेला असतो.

भारवाही अस्तित्वाचे जगणे उशाशी घेऊन मी जेव्हा झोपतो तेव्हा स्वप्नातही आपला जीव पालापाचोळ्यासारखा उडतो आहे असे मला दिसते. कवी गोविंदांची 'सुंदर मी होणार' ही कविता अध्यापन-अध्ययनाच्या सर्व कक्षा ओलांडून जाताना मला तिच्यातील 'सौंदर्य' अजूनही घेता आले नाही; की कविवर्य तांब्यांच्या साऱ्या मृत्युविषयक कविता वाचूनही मला 'आव्हानशृंग' फुंकण्याचे सामर्थ्य आले नाही. माझ्या भांबावलेल्या मनास संध्याछाया नेहमीच

भिववितात. अशावेळी उडत असलेल्या पाचोळ्यावर आपण प्रवास करीत आहोत असा भास होतो. साध्या विषयात मोठा आशय पाहणारे केशवसुत जेव्हा स्वत:स ' जगद्द्रुमाचे पिकले पर्ण ' म्हणू लागतात, तेव्हा माझ्या भूमिकेतील पाचोळा वजनदार होतो आणि डोईवरचे ओझे पुढे पाऊल टाकताना जाणवत नाही. पण असा अनुभव इतिहासजमा झाला आहे. माझे नित्याचे डोळे मोठ्या आशयातदेखील साधाच विषय पाहू लागतात. अशावेळी ' पिकले पर्ण ' पाचोळ्याची जागा घेते, आणि मनाची एकतारी बेसूर होऊन एकच पालुपद पुन्हा गाते. आपले जगणे कवडीमोलाचे आहे याची जाणीव सतत होत असूनही ' परिस्थितीचा काढा ' घेण्यात रात्रीचा दिवस व दिवसाची रात्र क्रमाक्रमाने होते. इथपर्यंत की जगण्याचा ' चुकलेला पाढा ' प्रथमपासून आठवूनही स्मरत नाही. यावेळी मानसिक पातळीवरचा पाचोळा वैचारिक पातळीवरही दोलायमान होताना गिरक्या घेत माझ्या अवतीभोवती वातचक्रात विलीन होतो. येथे देखील पाचोळ्यात समान वावरणारा मी आस्तित्वहीन झालेला असतो.

आयुष्याच्या गणितात मी फार कमी वेळा बेरीज केली आणि वजाबाकीच्या वेळी सारे हातचे मिसळून शून्याकार झालो. म्हणूनच की काय, लहानपणापासून माझे व्यवहारी अपूर्णांकाचे गणित चुकत आले. आज मागे वळून पाहताना सारा धीर खचावा ज्यामुळे पुढे चालताना आपण एकाकी व्हावे – आपली मजल दूरची म्हणून साथ नसलेली - पण मिळालेली साथ अशी मध्यावर तरी सुटावी का ? की आपणच तिला सोडून दिले ? या दोन्ही प्रश्नांत चेंगरून गेलेला मी उत्तराशिवाय बाजूला येतो व चुकलेले गणित पुन्हा चुकण्यासाठी सोडवितो. आजवर मला स्वत:स नसलेली किंमत कधीच कळली नाही. त्यामुळे पदोपदी एवढ्या ठेचा लागल्या की माझे पुढचे सारे शहाणे होऊन मी मात्र आहे तसाच राहिलो. आपण आलो कोठून, आहोत कुठे, जाणार कोठे या जगण्याच्या प्रत्येक वळणावर क्षणभर थांबून आत्मचिंतनाचा कलेने कधीच प्रवास केला नाही. खरे म्हणजे सारा प्रवास अवेळी होत राहिला. कर्ता, करविता वेगळा असूनही चालण्याचे बळ मात्र स्वत:चेच असते, ही मुळातील जाण नव्हे, व्यथा पावलागणिक पोखरून सोडते. अशा वेळी उडत जाणारा पाचोळा आपलाच अंगभूत अवयव बनतो.

आकाशात झेप घेणारा गरुड व कुंपणाभोवती घिरट्या घालणारा सरडा एकाच विधात्याने निर्माण केलेली शक्ती. एक पंखात मरण बांधून आयुष्यातील संजीवनी इतरांकडे फेकतो, तर दुसरा आपल्या मर्यादा ह्याच जणू शोभेचा

भाग म्हणून कित्येकांना आंदण देतो. आकाश आणि जमीन यांवर वावरणारे हे दोन्ही जीव मला पेलणारे नाहीत. मायेच्या उबदार पंखाखाली वाढ होऊनही मी आकाशवेडा नाही. रंग बदलण्याची क्रिया अवगत नसल्याने सरडा नसूनही कुंपणावर राहण्याचे भाग्य मात्र आले. आजवर मी आकाशाकडे झेपदेखील टाकली नाही. तेथे झेप घेणे मला परवडणारे नाही. दोरा नसलेला पतंग गोते घेत शेवटी विसाव्याखातर सांदीला पडावा, दृष्टिआड व्हावा, तसे आपल्याच भयाने आपण नजरेआड व्हावे. जगण्याचा प्रवाह सातत्याने परिस्थितीच्या प्रवाहाशी समांतर राहत टप्प्याटप्प्याने दुसऱ्यात एकजीव झाला. या उरलेल्या प्रवाहाचे चटके भोगून सारे शरीर बधीर झाले आहे. प्रत्येक इंद्रिय आपल्या उपजत क्रियेपासून स्वत:ची वंचना करीत आहे. 'चालविशी हाती धरोनिया' हादेखील माझा मार्ग नाही. हिरवे वैभव गमावून बसलेला पाचोळा ज्या दिशेला वारा असेल तिकडेच उडून जावा, त्याप्रमाणे परिस्थितीच्या ओघात आपले 'पिकले पर्ण' सातत्याने गलित आणि जीर्ण होत शेवटी कसे विरघळेल या भयाने माझ्या साऱ्या आसमंतात पाचोळ्याचा सडाच पडलेला आहे.

माडगूळकरांच्या गीतरामायणातील 'जरामरण यातुन सुटला कोण प्राणिजात?' या विचारसौंदर्याशी माझे मन जेव्हा पिंगा घालू पाहते तेव्हा त्याची होत असलेली कुचंबणा सहन होत नाही. बालपणातील सुवर्णकाल पुढे येणाऱ्या म्हातारपणास गती देतो. वस्तुत: या दोन्ही काळात प्रत्ययास येणारी थ्रिल एकाच नाण्याच्या दोन बाजू असल्याने जगण्याचे मोल बावनकशी होण्यास हरकत नसावी. परंतु म्हातारपणाच्या क्षितिजाकडे जाणारे पूर्वायुष्य क्षितिज विस्तारण्याची ताकद केव्हाच गमावून बसलेले असते. वसंतबहार पाहताना हेमंतबहार कोण आठवेल? पालवीचाच कालांतराने पाचोळा होतो याची जाणीव घेणारा पाचोळा पाहू शकतो, होऊ शकतो. म्हणूनच बालपणाच्या ऐलतीरावर उभे राहून म्हातारंपणाचे पैलतीर पाहावे. आयुष्याचे हे दोन्ही किनारे मधल्या प्रवाहाचा चिरकाल ओघ पाहणारे आहेत. ज्यावर पाचोळा होऊन पडलेले पान सृष्टीच्या नवजात निर्मितीस कारणीभूत झाले. एवढाच धीर म्हातारपणातील तारुण्य शोधण्यास पुरेपूर आहे. अशा वेळी आपण आवर्जून पाचोळ्याचे पान व्हावे अशी इच्छा होते. किमान म्हातारपणापर्यंत आपण पोचू ही भावनादेखील मरणाचे भय उद्यावर नेण्यास समर्थ राहील. अंगणी पाचोळा बहरावा तो एवढ्याचसाठी.

सृष्टीच्या क्रमात वृक्षांची पानझड पाहण्यासदेखील अलौकिक दृष्टी असावी

लागते. आकाशातील एखादा तारा अलगद तुटावा तसे वृक्षाचे एकेक पान एका लयीतून तुटते. नवे अर्भक नाळ तोडून आईपासून वेगळे होताना ज्याच्या स्वयंभू अस्तित्वाला त्याच क्षणी आव्हान मिळावे त्याप्रमाणे आपल्या अंगभूत निर्मात्यापासून अलग होताना ते पान पाचोळ्याचे आंदण स्वीकारते. जोडतानाच्या संवेदना आणि तुटतानाच्या वेदना एकमेकांस पूरक होतात. आपले रक्ताचे नाते विभक्त होऊन बिचारा वठलेला वृक्ष पाचोळ्याकडे नजर फेकतो. आता मायेची नजर चिंतनगर्भेच्या वाटेने पुरेपूर भरलेली असते. तृप्तीचा शिगोशीग भरलेला प्याला ओठापर्यंत आलेला असतो. वृक्षाने आपल्या पानझडीतून खाली पाचोळ्यास समर्पणाचे वैभव दिलेले असते. अनंत आहुत्यांची खाली पूर्णाहुती व्हावी, ज्यात पाचोळा पुन्हा निखारा होऊन तेजस्वी व्हावा. वर आत्मचिंतनाने एक एक पानाची आहुती खाली यावी. पानझडीचा हा देखावा जो सवडीने व आवडीने पाहतो त्याला कधीच भयमुक्तीचे वरदान पाचोळ्याने दिले असते. ' आपुले मरण पाहिले मी डोळां ' तो हा देखावा.

हिरवे पान शेवटी पाचोळा होऊन नजरेआड जाणार या सृष्टीच्या क्रमात उभ्या मानवाने स्वत:चे प्रतिबिंब का पाहू नये ? म्हातारपण हे व्याधीने व्यापलेले असते तसे तारुण्य व्याधीशिवाय राहील याची खात्री देता येत नाही. तारुण्यातील म्हातारपण जसे भयाण तसे वृक्षावर हिरव्या पानांत एखादे पाचोळ्यासमान वावरणारे पान सलणारे असते. वठलेला वृक्ष आपली अभिजात पालवी गेल्यामुळे उदास होतो. इतका त्याने आपल्या पूर्वसंचिताचा ठेवा म्हणून पाचोळा जतन केलेला असतो.

आता माझा नवा हुरूप पाचोळ्याने ओंजळ भरण्यास उत्सुक आहे. सानेगुरुजींनी आपला एकमेव मोलाचा अश्रू आपल्यापासून हिरावून नेऊ नये म्हणून परमेश्वराजवळ आर्त अशी मागणी केली, तर कुंतीने कृष्णाजवळ ' दुःखाची कढई ' मागितली. त्यावेळी पाचोळ्याने भरलेली ओंजळ ' तथास्तु ' म्हणून विधात्याने सोडली असेल. वठलेल्या वृक्षाच्या समर्पण-प्रक्रियेतून तावून-सुलाखून निघालेला पाचोळा आपल्या जीर्ण व सात्त्विक तेजाने ' जुने ते सोने ' होऊन जातो.

समोरचा कडूलिंब नव्या पालवीने आज टवटवीत झाला आहे. सारे अंगण धुंद परिमलाने पुनीत झाले आहे. मी मात्र झाडाखाली पाचोळा साचलेला आहे काय हे निरखून पाहत आहे.

# ३ / कण्हेरी

माझ्या शेतात एका कोपऱ्यात एक कण्हेरीचे झाड आहे. बाजूलाच विहिरीच्या काठी एक पारिजातकही आपल्या तोऱ्यात डुलताना दिसतो. साऱ्यांचे लक्ष पारिजातक वेधून घेतो. भल्या पहाटे शेतावर त्याच्या नाजूक फुलांचा सडा सांडलेला असतो. पण बिचारे कण्हेरीचे झाड अगदी अलग राहून स्वत:ची फुले केवळ स्वत:साठी म्हणून जपून ठेवते. पारिजातकाच्या राज्यात त्यांना मुळी वाव नसतोच. जुई किंवा मोगऱ्याचा काळ कण्हेरीचा विसर पाडतो. शेवंतीचे आंदण तिला अपशकुनी व्हावे, तर गुलाबी नखऱ्यापुढे तिच्या नम्रतेची साधी विचारपूस देखील होऊ नये. उपेक्षितांनादेखील अंत:करण असते याची जाणीव नसल्यामुळे की काय, विविध फुलांच्या शिरगणतीत कण्हेरी असून नसते व इतरांवाचून एकटी राहते. गुलमोहर ज्या आगीने तेजस्वी होतो ती आगच कण्हेरीने जन्मभर जपलेली असते. तिला भव्यतेचे, दिव्यतेचे वावडे नाही. फक्त दुर्लक्षतेने ती आत्ममग्न झाली आहे. प्रेमभग्न पावली आहे.

दुरून पाहता गुलाबाचे फूल आणि कण्हेरीचे फूल एकाच जातीचे वाटते. पण 'प्रत्येकाचे दैव आगळे' या न्यायातून एकाची उपेक्षा व दुसऱ्याची मार्गप्रतीक्षा जगात होत राहते. सिद्धार्थ गौतम बुद्धाची वाढ राजाच्या वैभवाखाली होत राहिली. तरीसुद्धा सुख-समृद्धीतून सिद्धार्थ जगापासून वेगळा व अंतर्मुख झालाच. गुलाबाची वाढ देखील अशीच वैभवसंपन्न देखरेखीखाली होऊनही शेवटी त्याची अवहेलना 'काट्याशिवाय गुलाब नाही' म्हणून केली जातेच. कण्हेरी मात्र काट्याशिवाय 'गुलाब' राहूनही आपल्या उपेक्षित जीवनाशी सतत तडजोड करते. स्वत:बरोबर इतरांशी तडजोड हाच मुळी तिचा स्थायी भाव असल्याने

तक्रार तिच्या देही वावरतच नाही. नियतीने आपल्या वाट्यास दिलेले जीवन एवढ्या संथपणे, मंदपणे स्वीकारीत आयुष्याची इतिकर्तव्यता सहीसलामत पार पाडणारी कण्हेरी स्थितप्रज्ञ होऊन इतर फुलांच्या तुलनेत वेगळी होते ती यामुळेच. तिला सुगंध नाही म्हणून कीर्तीचा सोस नाही. तिचे पावित्र्य इतरांच्या ओझ्याखाली चेंगरल्यामुळे तिच्या नशिबी ओंगळपणा शाप होऊन आला. तिच्या पाकळ्यांतील सुकुमारता अंगभूत राकटपणाने ओबडधोबड झाली आणि तिच्या देठादेठातून मकरंदाचा थेंब न् थेंब ओसंडताना माधुर्याने तिची कोमलता आत्मसात केली.

पांढरी कण्हेर सात्त्विक पदराभोवती घुटमळणारी बालिका आहे. तिचे कौमार्य अनाघ्रात पुष्पासारखे असते. तिचे निरागस पाऊल पैंजणाशिवाय नर्तनाकडे ओढणारे आहे. तिच्या पाकळीपाकळीवर पहुडणारा सालसपणा दवबिंदूशी अद्वैतता साधणारा वाटतो. तिच्या नाजूक पण अंतर्गत केशरातून सातत्याने वात्सल्य ओसंडत राहते. कण्हेरीचे फुल हुंगावे आणि एकाग्रतेने सायुज्यता आत्मसात करावी. तिचा स्वाद गाजावाजा न करता अंत:प्रेरणेने स्वीकारावा आणि कृतार्थ भावनेतून तिचा तलम स्पर्श पापमुक्तीसाठी घ्यावा. इतर फुलांना रजोगुण व तमोगुणाचा धाक. कण्हेरी मात्र सत्त्वगुणाने चिरस्मरणीय झाली आहे. रामाचा वनवास आणि पांडवांचा अज्ञातवास अधूनमधून कण्हेरी-दर्शनाने विरंगुळा देणारा झाल्याने तिचे सार्थकी जीवन आजही रामायण-महाभारतात प्रेरणास्थान म्हणून चितारलेले दिसेल.

लहानपणी आमचा खेळ कण्हेरीच्या पानाशी पिंगा घालीत असे. कण्हेरीची दोन पाने एकत्र करून त्यातून येणाऱ्या ध्वनीने आमचे बालविश्व क्रीडामग्न होई. कधी कधी या पानांचे तोरण खेळात मांगल्याचे वातावरण आणून देई, तर कधी या पानांपायीच भांडणामुळे आईचा जबर असा मार खावा लागे. पळण्याच्या शर्यतीतून नदीचा काठ लवकर गाठून केव्हा एकदा कण्हेरीवर झडप जाई याचे भान नसे. बहरलेल्या फुलांनी मोठी परडी केव्हा शिगोशीग भरली जाई याचा पत्तादेखील लागत नसे. कण्हेरीची डेरेदार माळ स्वत:च्या हाताने केल्याने मिळणारा आनंद, देवाचा पवित्रपणा कण्हेरीत मिसळल्याने, द्विगुणित होई ज्यामुळे बालानंदास वारंवार भरती येई. त्यातही पुन्हा कण्हेरी गुच्छ आंब्याच्या तोरणावर खुलविताना या आनंदास पारावार नसे. बालपणाची निरागसता जणू कण्हेरीने आत्मसात केल्याने तीही बाल होऊन आमचे औत्सुक्य वाढवी आणि 'प्रौढत्वी निज शैशवास' जपण्याची जबाबदारी स्वत:वर ओढून इतरांसाठी आपला जीव कुर्बान करी. आजही

सारा नदीचा काठ कण्हेरीच्या झाडाझाडातून समृद्ध झालेला दिसेल. आम्रवृक्षावर कोकिळा गाताना आपली तीक्ष्ण नजर कण्हेरीवर रोखून देईल तर पोपटाची लाल चोच कण्हेरी चुंबनास व्याकुळ होईल.

'आपणास डोळे दृष्टी नाही' या न्यायाने कण्हेरी उपेक्षित जीवन जगते. पण याची तिला खंत नाही. आपल्या जगण्याची पातळी स्वत:च उंच न्यावी म्हणून तिची धडपड असते. नजरेत भरणे किंवा नजरेआड राहणे या दोन्ही बाबी तिला महत्त्वाच्या वाटत नाहीत. तर स्वत:च्या वाट्यास आलेले जीवन विनातक्रार उंचावेल कसे या चिंतेतून ती फुलत जाते. अशा वेळी बाजूस असलेला गुलमोहर तिला चेतना देतो. तर शेजारचा पळस धीर देतो. आजूबाजूस असलेली बाभूळ उत्तेजन देते. जणू सारा परिसर शेजारधर्माचे व्रत तिच्या बाबतीत अगदी तंतोतंत पाळताना दिसेल. अशा वेळी तुम्ही-आम्ही केलेली तिची उपेक्षा तिला वरदान होऊन येते. 'माझी गती मात्र अखंड राहो' या मंत्राने सारा परिसर ती दुमदुमून सोडते. तिचा वेग आणि वेध सातत्याने प्रेरणा घेत व चेतना देत मार्गक्रमण करणारा आहे. कण्हेरी बाजूला वाढते. सांदीला फुलते. पण ऐन मोक्यावर मात्र नजरेत भरते.

मानवी मनाचा आर्त पाढा केवळ कण्हेरीनेच ऐकावा. जिची गळ्यात पडलेली माळ अशुभ मानण्यात येते ती कण्हेरीच आसवाचे नाते तुम्हा-आम्हाशी जुळवणारी आहे. गुलाब सर्व फुलांचा सम्राट असेल, तर कण्हेरी सर्व फुलांची सम्राज्ञी आहे. तिच्याजवळ राजाचा दरारा नाही, पण राणीचा आपलेपणा आहे. सर्व दु:खे ऐकून घेण्याची सहनशीलता आहे. दु:ख आपलेसे करण्याची जवळ किमया आहे. रडगाणे ऐकत हसरेपण देण्याची ताकद आहे. कृष्णभक्तीत बिचारी कुब्जा सर्वस्व हरवून बसली व शेवटी स्वत:च कृष्णमय झाली. कण्हेरी हा पौराणिक संदर्भ विसरेल कशी? रंग, रूप आणि स्वाद या संवेदनांनी बोथट झालेली कण्हेर संवेदनक्षम आहे ती आपल्या वेगळेपणातून, आगळेपणातून. कुंतीने दु:ख मागितले. कण्हेरीचा सूड दु:खातच विरघळल्याने त्यास वेगळी मार्दवता आली. कण्हेरी दु:ख गाते. द्रौपदीचे दु:ख सूड या भावनेत विरघळले गेले. तडजोडीचा तिचा स्वभाव असल्याने सुखदु:खापलीकडे ती गेली. नदीच्या ऐलतीरावर तिचा प्रपंच फुलताना पैलतीरावरील क्षितिज तिने पाहिले, विस्तारले आणि अनायासे आपलेसे केले.

कोणत्याही बागेत 'रुपेरी किनार' म्हणून कण्हेरीचा डौल आहे. कण्हेरीशिवाय विविध फुलांचे उद्यान सुने सुने वाटेल. अंगच्या साऱ्या संवेदना

कण्हेरीशी निगडित राहतील. कण्हेरीशिवाय बोथट होतील. इतर फुले जिवंतपणी संजीवनी देणारी, तर कण्हेरी मृतात्म्यास तेज देणारी आहे. कण्हेरीच्या फुलांचा गुच्छ सभेचा तोल सांभाळील, वक्त्याच्या हातातील गुच्छ वक्तृत्वास स्फुरण देईल. देवळात घर करून राहिलेली कण्हेर आजूबाजूचा परिसर पावन करील आणि अंधारून आलेल्या मानवी वृत्तीस हीच कण्हेर नव्या चांदण्यातून पहाट दाखवील. जिच्याजवळ जगण्याचे व्रत तिच्या मरणाचे वाण तेज:पुंज राहणार नाही काय ? म्हणूनच अंगणात कण्हेर फुलावी व साऱ्या जगण्यातील अचूक वेळ तिच्यामुळे निभावून जावी एवढा कण्हेरीचा डौल आहे. परसात वाढलेला पारिजातक सुकुमार, सुगंधी पण क्षणभंगुर असेल, पण याच परसात आगंतुक म्हणून आलेली कण्हेर सुकुमार व सुगंधी नसूनही सातत्यपूर्ण, अगत्यपूर्ण, विनयशील राहील.

बाराही महिने कण्हेर फुलणारी आहे. तिच्या विकसनशील व्यक्तिमत्त्वाचे हे शुभचिन्ह मानावे लागेल. तिची फुले वेळ निभावून नेतात. एवढेच नसून कित्येक अवेळा कण्हेरीने शुभदायक केल्या आहेत. तिचा बहर साऱ्याच ऋतूंना नवे आंदण देणारा आहे. ती आपल्या डोळ्याने वसंताची पालवी पाहते. श्रावणाची हिरवळ बघते, तर हिवाळी गारठा सुखद बनविते. विनातक्रार तिचा प्रवास अखंडपणे चालल्याने तिला मुळी विसावा नसतोच. टप्प्याटप्प्यावर ती अंतर्मुख होते, तोही क्षणभंगुरच. लगेच आपल्या स्वयंभू गतीने पुढची मजल ती जवळ करते. तिचा पूर्णविराम हाच मुळी विसावा असतो. जगण्याच्या धुंदीत तिला आपल्या मरणाचेही भान राहात नाही. तिच्याजवळ काहीच नाही म्हणून सगळेच आहे. तिला स्वत:च्या जाहिरातीचे वावडे असल्यास नवल ते काय ? इतरांत सर्वस्व विरघळून देणारी कण्हेर सर्व फुलांत उपेक्षित व तुम्हा-आम्हास अपेक्षित आहे ती यामुळेच. ती एकाच वेळी सर्वांना अभिप्रेत वाटणारी आहे. माझ्या शेतात एका कोपऱ्यात खडे असलेले कण्हेरीचे झाड शेतासह मला आंदण आहे. ते झाड माझ्या भावजीवनाशी एकरूप आहे. मला त्याच्या सुखदु:खाने जखडले आहे. घनदाट उदासीनता जेव्हा मला पांघरून जाते तेव्हा एक कण्हेरीच मला 'चेतना चिंतामणीचे गाव' वाटते. माझ्या भेटीने तिला उधाण यावे व तिच्या दर्शनाने मला 'सुंदर' झाल्याचा भास व्हावा एवढी जवळीक आम्हा दोघांत आहे. इतरांना ती दिसत नाही म्हणून मी डोळस, असा माझा हिशेब आहे. माझी कण्हेर जेव्हा कोमेजेल तेव्हा मी पंखविद्ध होईन. तिची पानझड माझ्या जगण्याचे सार घेऊन जाईल. पण मला खात्री या गोष्टीची आहे की,

तिची एवढी उद्ध्वस्तता पाहणे मला शक्य नाही. तिने केलेल्या अपूर्व लाडात माझा उभा जन्म गेल्याने माझ्याच जगण्याचा दिवा ती मालवून देईल. जिने ज्योत प्रज्वलित केली तिलाच ती मिटवायचा हक्क आहे. माझ्यापेक्षा तीच माझ्याशी अधिक प्रामाणिक, प्रांजळ असल्याने माझ्या अप्रामाणिक वृत्तीशी ती नेहमीच फटकून राहिलेली आहे. दोन जीवनात तिने भाव ओतला व दोघांना एक केले. कण्हेरी माझ्यात व मी तिच्यात आहे तो यामुळेचः

आज तीच कण्हेरी माझ्याच कवेत आहे. भोगभोगून गलित इंद्रिये अस्तित्वासह फेकून दिल्यावर आलिंगन देण्यासाठी ती उतावीळ झाली आहे. इच्छामरणाचे दान तिला जगण्यातून मिळाल्याने तृप्तीने ती पावन झाली आहे. सुखाच्या या क्षणी तिला माझी एकरूपता आठवावी हे मानवी फितुरांशी विसंगत नव्हे काय? मातीतून वर आलेला तिचा अंकुर आकाशाकडे नजर देत वाढत जातो व आपल्या उपेक्षित फुलाने तेवढाच पुलकित होतो. म्हणूनच मी म्हणतो की, एकवेळ कण्हेरीची फुले घृणेने तोडा, कुस्करा, पण केवळ वगळून उपेक्षेने त्यांच्या जगण्याचे मातेरे करू नका. तो हक्क तुम्हाला मिळाला नाही आणि कोणीच कोणाकडून घेतला नाही.

# ४ / दिलासा

अलीकडे मी नित्य नेमाने बागेत फिरतो. कधी गुलाबाला गोंजारून जवळ घे, तर कधी रजनीगंधाच्या फुलास कुरवाळून जा. कोपऱ्यात फुललेली शेवंती मला नेहमीच बोलावते, पण त्याहून मी ओढला जातो तो बाजूच्या कण्हेरीकडे. तिला जवळ करणारी फारच थोडी पांढरी कण्हेरी व तांबडी कण्हेरी दोन्ही बाजूंना डौलदार फुटत जावी व मधून आपली पायवाट वळणदार व्हावी यात एक अपूर्व समाधान आहे. परवा मी याच समाधानाने बागेत हिंडू लागलो. तोच मला पारिजाताने अडविले. मी क्षणभर त्याचा समाचारं घेतला व पुढे सटकलो, तो माझा पाय काही उचलेना. जणू माझे पाऊल कुठल्यातरी गंधाने खोलवर गेले आहे व सारा परिमल अंगाभोवती दरवळत आहे.

लहानपणी श्रावण महिन्यात मला घरातून फुले आणण्यासाठी बाहेर जावे लागत असे. मी भली मोठी बुट्टी घेऊन बाहेर पडायचा तो थेट शाळेच्या आवारात. येथे बरोबर मध्यभागी पारिजात फुललेला असायचा. आपण जवळ जायचा अवकाश, तोच एखादी झुळूक यावी व सुंदर फुलांचा सडा अंगणात-आवारात पडावा तसे व्हायचे. या क्षणी हावरा होऊन सारी बुट्टी मी शिगोशीग या फुलांनी भरून घ्यायचा. ती रुमालाने थेट घरी जाई. घरी ती सारी फुले देवघरात पोचती करून न विसरता पांघरलेला रुमाल मी स्वत:जवळ ठेवायचा. तोच रुमाल शाळेत घेऊन वर्ग चालू असताना अधूनमधून नाकाशी हुंगायचा. या रुमालाला येत असलेला पारिजाताच्या फुलांचा वास संपूर्ण तासाचे अध्यायन असे काही सुवासिक करायचा की त्याला तोड नाही. मी मॅट्रिक होऊन पुढे कॉलेजात आलो तरी मला या सुवासाचे वेड होतेच.

पारिजातकाची फुले लवकर सुकतात याचे मला कधीच दु:ख वाटत नाही. कारण ती कमालीची संवेदनक्षम असतात. आपली अपूर्व संवेदना जीवाच्या जीवनी एवढी अलगद ठेवून देणारा पारिजात हा एकमेव वृक्षराज आहे. त्याच्या विधिलिखितात क्षणजीवी जगणे असेल पण त्या क्षणांना जेव्हा अलौकिक सुगंधाने तेज मिळते तेव्हा ते सुवर्णाक्षरांनी नोंदण्यासारखे असते. कुढल्याचे जगण्याचे मोजमाप त्याच्या लांबीवर करायचे नसते तर त्या काळाला मिळालेली तेजस्वी किनार व प्रकाश यावर करायचे असते. पारिजाताचे मूल्यमापन हे नेहमीच त्याच्या आस्वादनप्रक्रियेशी निगडित असल्याने समग्र पारिजात हा घ्राणेंद्रियाशी जवळीक करणारा आहे. आपली ज्ञानेश्वरी संपूर्ण इंद्रियाचे कान करून ऐकावी असा ज्ञानेश्वरांचा दावा होता. पारिजातास बहरलेला पाहून विधात्याने आम्हास सांगून ठेवले आहे की बाबांनो, या सुकुमार फुलांना साऱ्या इंद्रियांचे नाक करून गंधित करा. या अपूर्व सुगंधात तुम्ही तल्लीन व्हा. थोडे उन्मनीकडे जा. लगेच तुमचा प्रवास इंद्रियांकडून अतींद्रियांकडे गेलेला असेल.

रामदासांनी गावोगाव मारुतीची देवळे बांधून लोकांत बलोपासनेची ज्योत प्रज्वलित केली. तसे आपणही घरोघर अंगणात एकतरी पारिजाताचे झाड लावून आस्वादनक्रियेची पूर्तता सांगावी. कुठल्याही ललित कलाकृतीचे रसग्रहण हे तिच्या आस्वादनप्रक्रियेवर अवलंबून असावे ना? हे जर खरे असेल तर निसर्ग या अभिजात कलाकृतीच्या रसग्रहणासाठी पारिजात हा एकच वृक्ष असा सापडेल की ज्याचे फूल या गंधित आस्वादनाचे प्रतिनिधित्व करील. म्हणून जे घर पारिजाताने सुशोभित झालेले असेल ते आपल्या पूर्णत्वाच्या दिमाखाने नावाजलेले राहील व पारिजात नसलेले घर हे आपल्या करंटेपणाने दुर्दैवाचे दशावतार पाहात बसेल. शासन जेव्हा वृक्षारोपणाच्या मोहिमेवर जाते तेव्हा मला त्यांना आवर्जून सांगावेसे वाटते की, तुम्ही वृक्षारोपण जरूर करा, फक्त जो वृक्ष लावायचा तो मात्र पारिजात असावा. तो फक्त छाया देणारा नाही. तो त्याबरोबर गंधित मायाही देतो, जेणेकरून आपली काया सदैव शीतल होते. म्हणून वाटते, जिथे जिथे रामदासांच्या मारुतीचे देऊळ तिथे तिथे त्या देवळासमोर पारिजात खडा असावा. मारुती रामाचा दास. पारिजात मारुतीचा दास आणि आपण या दोघांचेही दास, असेच ना?

महाभारतात श्रीकृष्ण ही व्यक्तिरेखा बहुरंगी व बहुढंगी वठवली आहे. आपल्या अष्टपैलुत्वाचा दिमाख कृष्ण संपूर्ण भारतभर दाखवतो. मला मात्र या व्यक्तिरेखेचा एका गोष्टीसाठी अभिमान वाटतो. तो म्हणजे कृष्णाचे

पारिजात-प्रेम. श्यामसुंदर म्हणे तुळशीच्या मंजिरीने ओढला जातो. वा! हे जर खरे असते तर रुक्मिणी व सत्यभामा यांचे भांडण का होते? व तेही पारिजाताच्या फुलासाठी? कृष्णास सत्यभामेकडून खऱ्या प्रेमाचे प्रतीक हवे होते. भले! तुमचे पुराण सांगत असेल की सुवर्णतुलेत रुक्मिणीने अंत:करणपूर्वक तुलसीदल टाकले व आपल्या प्रीतीची कृतार्थ भावना सिद्ध केली. मला तर ही रुक्मिणी ज्या पारिजाताचा सडा तिच्या अंगणभर पडायचा त्याच्या सुगंधात कृष्णप्रेम मिसळताना दिसते. उगीच का सत्यभामा या फुलावर रागावेल. निसर्गात रमणारे बालकवी जेव्हा 'पारिजातही बघता भामा रोष मनीचा मावळला' असे लिहून जातात, तेव्हा साऱ्या निसर्गाची पुण्याई पाठीशी बांधून श्रावणमहिना तुमच्या आमच्या भेटीस आलेला असतो. जणू काय त्याला जगभर मंत्रच द्यावयाचा असतो की, तुम्हाला रोष घालवायचा ना, मग रोज एक तरी पारिजाताचे फूल जवळ घ्या, त्याचा थोडा गंध आपलासा करा. एकदम तुम्हाला 'खळांची व्यंकटी सांडो' चा भावप्रत्यय येईल.

आपल्या बागेत ऋतुपरत्वे गंधित होणारी फुले असतातच; पण पारिजात हा सर्व ऋतुमतींना गंधित करणारा आहे. जाईजुईच्या फुलांचा गजरा एकाचवेळी प्रेयसी, पत्नी व गृहिणी यांच्या चक्राची शोभा वाढवतो, पण पारिजातास हे तिहेरी सूत्र अमान्य आहे. तो एकनिष्ठ आहे, त्याचबरोबर एकसूत्री आहे. मुख्य म्हणजे ज्या सूत्राशी तो दृढ नाते जोडतो त्याचे पावित्र्य आपल्या गंधाने बावनकशी करणे हे त्याचे ब्रीद असते. म्हणून तोडण्यापेक्षा जोडणे याकडे त्याचा अधिक कल असतो. द्वैत मनाचा दुवा सांधून अद्वैताची पायरी भक्कम करायची व तिच्यावर ठाण मांडून आपले दास्यत्व सिद्ध करावयाचे, हे व्रत त्याने वर्षानुवर्षे चालवले त्याचे इंगित हेच आहे. तुम्ही बागेत पडलेला पारिजात फुलांचा सडा पहा. तो इतर फुलांना आपल्या कुशीत घेऊन सारा आसमंत गंधित करून जात असलेला दिसेल.

निर्माल्य झालेली पारिजाताची फुले देखील आपल्या अंगभूत गंधाचा प्रभाव कमी करीत नाहीत. आपण निर्माल्य झालो याचे दु:ख ते आपल्या दु:खाने कमी करतात. त्यांच्या या समर्पण भूमिकेला जसे समर्थन आहे, तसेच आपल्या तीव्र संवेदनांचे त्यातून एक दिव्य असे दर्शनही घडते. म्हणून ही फुले पायदळी असू नयेत असे वाटते. त्यांनी 'चरण'दास होण्याचे व्रत घेतले आहे. पण ती जेव्हा चरणाखाली राहून 'पुष्पसंगे मृत्तिकेस वास लागे' अशी आपली भूमिका बजावतात, तेव्हा या कृतार्थ भावनेने आपली चरणद्वये केव्हाच

शरमिंदी झालेली असतात. त्यांच्या संवेदना बोथट झालेल्या असतात, त्यांचे जिणे पाषाणासारखे कठोर झालेले असते. त्यांच्या संवेदना क्षणजीवी असतात. त्यांना आपल्या क्षणभंगुर जीवनाची भूमिका पेलत नाही. पण ज्यांचे उभे जीवन हीच एक संवेदना असते ती नेहमीच एक मुलायममान धुंदीत असते. ही धुंदी सह-वेदनेची असते व तिला मिळालेला गंध हा पारिजाताचा असतो.

तुम्ही दुःख देवापाशी सांगण्याऐवजी पारिजाताशी सांगा. तो हे दुःख आपलेसे करून तुम्हाला स्वतःचा गंध देईल. त्याने कधीकाळी आपल्या सुकुमार पाकळ्यांवर ठेवलेला दवबिंदू तो तुमच्या अश्रूत मिसळून आपली कृतार्थता व्यक्त करील. आपल्या देठात असलेला रंग तुमच्या भावनेत असा काही कालवून देईल की तुम्ही क्षणभर थक्क व्हाल! तो आपल्या पालवीने तुमच्यावर मायेचा वर्षाव करील. आपल्या स्नेहपूर्ण हाकेने तुम्हाला पदराखाली घेऊन वात्सल्यरसाचा तुम्हावर वर्षाव करील. कोणासही आपल्या प्रीतीने जवळ करावे, नंतर त्यास आपल्या उदात्त भक्तीत चिंब भिजवावे व मुक्तीच्या पंखावर बसवून त्यास स्वर्गाच्या नंदनवनात भरारी देत सोडावे, ही या पारिजाताची अपूर्व किमया आहे. दुःख ऐकताना तो तुमचा वकील असतो व दुःख सांगण्याचे संपल्यावर आपण ही केस जिंकलेली असते, विजयाची पताका घेऊन आपण घरी यावे. तुमच्या दारात स्वागतास पुन्हा पारिजात तयार आहे. तुमच्या नजरेत तो आपली नजर अशी काही मिसळून देईल की सारे अभिजात संकेत या अपूर्व मीलनात रसातळाला जावेत. इथे पारिजाताची नजर नजरेची नजर काढील वेड्या गंधातून.

माझी बाग माझ्या घराला एक आंदण आहे. तीत बहरून आलेला पारिजात "मम सुखाची ठेव" म्हणून नांदतो. मी त्याच्याजवळ जातो. त्याचे पानन् पान् कितीतरी वेळा गोंजारतो. माझ्या स्पर्शाच्या पालवीने त्याची समग्र काया अंगावर मूठभर मांस चढवून घेते. त्याला आपल्याजवळ ठाण मांडून बसलेले आवडत नाही. पण एका विसाव्याच्या ठिकाणी क्षणभर बसून आपली पूर्वपुण्याई जीवाशी निगडित करावी अशी त्याची नेहमीची धारणा. आपल्या अंगावरील फुलांना स्पर्श केलेला त्याला आवडत नाही. आपल्या पालवीवरची फुले हे त्याचे वैभव व त्यास पाप्याची नजर लागू नये, याकडे त्याचा कटाक्ष. त्याचप्रमाणे खाली पडलेला फुलांचा सडा तुम्ही डावलून पुढे जा. पारिजातास हे कार्पण्यही सहन होत नाही. राग आणि अनुराग यांच्या बहरातून प्रफुल्लित झालेली ही फुले मानवी मनाचे दोन पैलू अलगद व्यक्त करतात पारिजात

समरसतेने.

तुमच्या कर्तृत्वाने तुम्हास स्वत:चे घर बांधावयाचे असेल तर ते तुम्ही जरूर बांधा. मात्र कर्जबाजारी झाल्याचे दु:ख विसरण्यासाठी या घराला एक बाग करा. जिच्या मधोमध एक पारिजाताचे रोपटे असावे. चंद्राची कला दिवसें-दिवस वाढत जाईल तसे तुमचे कर्ज पैशापैशाने कमी होत जाईल. देणेकरी तुमच्या पुढच्या दाराने आला की तुम्ही मागील दारी पारिजातामागे लपा. तो तगादा विसरून 'उद्या' म्हणून समजेल! हा क्रम तुम्ही तसाच ठेवा. तुम्हाला कर्ज कधी फिटले याचा अंदाज लागणार नाही. स्वर्गात कल्पवृक्ष असेल. पृथ्वीवर पारिजात हा एकच वृक्ष असा आहे जो भवताप हरण करतो, चिंताव्याधी दूर करतो व सर्वांच्या सुखद विरंगुळ्याचे ठिकाण होऊन बसतो. सकाळी तुम्ही पारिजात पहा. कोवळ्या सूर्याने त्यास आपली कांती बहाल केलेली दिसेल. दुपारी तो करारीपणा दाखवून तुमच्याशी हितगुज करील. सायंकाळच्या संधिप्रकाशात आपल्या कापऱ्या भावनेने दृष्ट काढेल, तर रात्रीच्या चांदण्यात आपल्या गंधाची अभिसारिका तुम्हाला सहर्ष सादर करील. त्याची ही विविधता घराच्या चारही दिशांना पुण्याई म्हणून बांधून ठेवावी. तुम्ही जेव्हा भूतकाळाचे सहारा वाळवंट बुडवून वर्तमानकाळाच्या हिरवळीवर क्षणभर बसाल, भविष्यकाळाचे क्षितिज समोर पाहाल, तेव्हा त्यावर शुक्राच्या चांदणीप्रमाणे पारिजात बहरास येऊन दिलासा देत तुमच्या आमच्या मनात घर बांधताना दिसेल.

# ६ / कडूलिंब

असं का होतं ते कळत नाही. या अंगावरून त्या अंगावर व्हावं. अस्वस्थ मन, सुन्न सुन्न डोकं, थकलेलं शरीर. सारं काही फेकून द्यावं, अगदी अलगद झटकावं, झुरळासारखं. अंगाखाली असलेलं अंथरूण आणि डोक्याखाली असलेली उशी पार झुगारली जाते. नकळत दोन हातानं, दहा बोटानं अन् नजर टकमक बघत असते शून्याच्या भयाण परीघाकडं, पावलांना चाल नसते. असते ती फक्त हालचाल अंगणातील कडूलिंबाच्या वाळलेल्या पानांसारखी. या पानांचा केव्हाच तुटलेला असतो दुवा आपल्या सलग फांद्यांपासून, खोडापासून.

माझ्या घराला अंगण हे एक भूषण आहे, आणि अंगणात कडूलिंब हे एक वैभव आहे. लहानपणापासून कडूलिंबाच्या लिंबोळ्या गोळा करून खेळ खेळण्यात मी औरच मजा लुटली आहे. याच लिंबोळ्यापायी अनेकांची भांडणं मी विकत आईच्या पदरात ओतली आहेत. याच लिंबाची फांदी घ्यावी आणि स्वच्छ मनाने आकाशाकडे बघत बघत तिचा मुक्त आस्वाद मी घेत असे. लिंबाला मोहर आला की वसंतऋतूला बहर आला, असे मी समजत असे. गुढीपाडव्याचे शुभ्र तोरण आणि जेवणातील या मोहराची कोशिंबीर सारं काही भारतीय संस्कृती अजून आपल्या उराशी जपून आहे. शेजारच्या नखातेबाई मला हटकून विचारतात, ‘ गुढीपाडव्याचं काय केलं होतं जेवायला ? ’ आणि मी तितक्याच जोरात त्यांना म्हणायचं, ‘ लिंबाच्या मोहराची कोशिंबीर. ’ शरीरातील नाना व्याधी याच कोशिंबिरीने मुळासकट काढल्या, हा काय तिचा थोडा गौरव ! मिरवणुकीच्या वेळी एखाद्या राजावर अलगद चवऱ्या फिरवून

चालावे त्याप्रमाणे अंगणात कडूलिंब आमच्या घराला ताजेतवाने करून सोडतो ना !

परंतु हाच कडूलिंब आपल्या साऱ्यां आठवणी झटकून सुना सुना उभा आहे. जणू काय स्थितप्रज्ञ – पण याने आपल्या प्रज्ञेला केव्हाच झटकले आहे. युद्धात स्थिर असलेला युधिष्ठिर आणि अंगणात स्थिर असलेला तो कोण ? अनामिक का नामापलीकडचा ? मला अजूनही आठवतं. मी जेव्हा चांदण्यात कडूलिंबाशी संवाद घालीत असे तेव्हा तो आपली सारी क्षितिजं दूर दूर सारीत असे. अगदी... पार आमच्या रेशमी नात्यासह. मी रुसावे आणि त्याने तितकाच रुसवा काढावा. मी हसावे आणि त्याने आपल्या 'लोलका'तून या हसण्याचे विविध रंग फैलवावेत, असा प्रकार कित्येक दिवस चालत होता. आज हे सारं काही विरघळून गेलं आहे. धुक्यात लपून गेलं आहे. अन् कडूलिंबाचे टांगते मोहळ, त्याच्या असंख्य माश्या केव्हाच उडाल्या आहेत, आता फक्त मोहळाची पोळी उरलेली आहे-मध नसलेली कोरडी साफ. कडूलिंबावर चिमण्या बसतात अन् भुरकन् उडून जातात. कावळे येतात आणि आपल्या कर्कश आवाजाने पाने गाळीत असतात, सहज वर हात करून एखादी फांदी खाली घ्यावी तो तिला एकही पान नसते, फक्त असते ते एक पिंजलेले कोळ्याचे जाळे. मधाचे पोळे जाऊन अशी कोळ्यांची जाळी जवळ बाळगणारा असा हा कडूलिंब पाहून मला पोटात कसंतरी होतं, शरपंजरी पडलेला भीष्मच ना ! माझी अस्वस्थता आणखी किती ताणली जाईल कोण जाणे ! थोड्या वेळापूर्वी आकाश तारकांनी भरून गेले होते, एका मिनिटात या तारका कडूलिंबाच्या पानासकट उल्का होऊन जमिनीशी एकरूप झाल्या. आता तेच आकाश दाट काळोख पांघरून कडूलिंबाला आंदण आले आहे. थंड गारठा अधाशी वृत्तीने गाळित बसले आहे. वाऱ्याचा त्याला रोखठोक निरोप आला की आपल्याला इकडे येण्यासाठी सवड नाही. छे ! मुळीच आवड नाही त्याला.

मी एक प्राध्यापक आहे. मराठीचे काव्यशास्त्र शिकविणारा. याच कडूलिंबाने मला काव्यातले जीवन व जीवनातले काव्य सांगड घालून एका काळोख्या रात्री शिकवले होते. आज तोच कडूलिंब काव्यशास्त्राचे 'गाईड' होऊन पुढे खडा आहे. मुले केव्हाच परीक्षा उत्तीर्ण झाली आहेत. अगदी सरळ, सोप्या, साच्या-साच्यातून. मला कविता करण्याचा ध्यास. मला अजून आठवते, एका कवितेतील जिवंत प्रतिमा याच कडूलिंबाने व्यापून टाकलेली होती. माझ्या भावानुभवाचा तो एक अनिवार्य घटक होता. अलगद कोशातून

फुलपाखरं उडत सुटावीत तशी ही प्रतिमा माझ्या मनात घिरट्या घालत होती. माझे डोळे जेव्हा अश्रूंनी चिंब होत, पापण्या जेव्हा अश्रूंचा सडा ओतीत तेव्हा हाच कडूलिंब मला शुचिर्भूत अंगाने मला खुणावीत असे. आज तेच डोळे अश्रू गोठून बसले आहेत. पंखावाचून पाखरू, प्रतिभेशिवाय कविता असे! आणि प्राध्यापकी फक्त धंदा उरला आहे, पोट भरण्यासाठी. कडूलिंबास निदान वर्षातून एकदाच पतझड येते, पुन: नवी पालवी येण्यासाठी. सापाने जुनी कात फेकून द्यावी आणि नवे जीवन स्वीकारावे, अगदी तसेच. मग मला माझ्या व्यवसायाला असे नवेपण का येऊ नये? अशा वेळी माझाच कडूलिंब मला धीर देतो. 'जीवन हा एक मोठा प्रश्न आहे. उत्तरावाचून, या प्रश्नाचे तुम्ही उत्तर मागाल ना, तेव्हा पुन: अनेक प्रश्नच तो तुमच्या ओंजळीत ओतील.' आज माझी ओंजळ तुडुंब भरली आहे, हे अर्घ्य कुठे ओतू?

याच पावली मी असाच एकाकी बाहेर पडलो. लांबसडक रस्त्यावरून लांबच लांब चाललो. हे कडूलिंबाने नकळत पाहिलं होतं. एखाद्या सावली-प्रमाणं तो माझ्या मागं येत होता. मी चालत असे अन् हा कडूलिंब माझा पिच्छा घेत असे. थकलेल्या पायांना तडतड बोलण्याचा मूड होता. इतक्यात मी मागे वळून पाहिले तोच कडूलिंबाची प्रतिमा साळसूदपणे बाजूला लपलेली दिसली. मी अस्वस्थ नजरेने आकाशापासून जमिनीपर्यंत पाहिले. वाऱ्याची झुळूक मंदपणे माझे केस पिंजत होती. जणू काही कडूलिंबाशी वैर साधूनच. लपलेल्या कडूलिंबाने केव्हाच माझ्या मनात चांदण्यात घर केले होते.

अजून मी अंथरुणातच आहे. झोप केव्हाची उडून गेली आहे, दूरवर पाखरांसाठी पहुडलेला देह आपले ओझे जवळ बाळगून अस्वस्थ आहेच, ही अस्वस्थता जीवनाचा एक प्रदीर्घ गुंतावळाच ना! आणि मी एक पिंजारी, अस्वस्थता पिंजणारा. अंगणातला कडूलिंब हा सारं काही पाहात आहे, अगदी अंधाऱ्या आकाशातील शुक्राच्या तोऱ्यात. लिंब आपला कडूपणा माधुर्याने टिपतो. अन् माझे जीवन आपले 'माधुर्य' कडवटपणे गिळते, नाही का गंमत!

# ६ / मोगरा फुलला

माझ्या बागेत एका कोपऱ्यात मोगऱ्याचे रोपटे आहे. ते जसे जसे वाढू लागले तसे तसे मी त्याला नित्यनेमाने हेरू लागलो. चंद्र आपल्या कलेकलेने वाढावा तसे हे रोपटे मोठे होत होते. भर पावसाळ्यात मोगऱ्याची वाढ पुष्पहीन असते व सारा उन्हाळा ते फुलं देत उन्हाची लाही शांत करते. इतर रोपटी उन्हाने करपतात. मोगरा मात्र ऊन अंगात मुरवून आपला पुष्पभार प्रफुल्लित करतो. म्हणूनच कुठेही मोगऱ्याचे रोपटे पाहिले की, मी त्याचा व ते माझे होते. आमची परस्परांची नजर देण्याघेण्यासाठी आसुसलेली असते. आपली पापणी आणि मोगऱ्याची पालवी क्रमाक्रमाने आलटूनपालटून घ्यावी-द्यावी. पापणीचा थेंब आणि पालवीचा बिंदू एकमेकांस आसरा देणारा वाटतो.

कमलपुष्प विष्णुचरणी गजेंद्राने अर्पण केले म्हणून ते अजरामर झाले. भारताचे पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू आपल्या अंगावर गुलाबपुष्प खोवून मिरवत. असे असूनही मोगऱ्याची फुले तुम्हाला नजरेआड करून चालणार नाही. नुसता नजरेचा खेळ म्हणून त्यांच्याकडे पाहू नका. ही फुले तुमच्यावर असा काही कटाक्ष टाकतील की त्यात कासवीची आर्तता असेल. माझी खात्री आहे. मृच्छकटिकातील चारुदत्त जेव्हा 'दारिद्र्यात व्यथा मोठी' म्हणून तक्रार करतो तेव्हा तो मोगरा विसरला असेल. कारण हीच व्यथा त्याने प्रत्येक मोगऱ्याजवळ सांगितली असती तर ती केव्हाच विरघळून नामशेष झाली असती. कुणाच्याही आयुष्यात सुखदु:खाचा लपंडाव हा असतो. कधी सुख मचूळ तर दु:ख रुचिहीन असते. अशा वेळी तुम्ही मोगरा जवळ करा. तो तुमचे आयुष्य बहुरंगी आणि बहुरूपी करील.

मोगऱ्याची फुले तोडण्याचेही एक शास्त्र आहे. ही फुले कधीच ओरबाडायची नसतात. एक एक फूल अलगद घेत आपली ओंजळ भरायची असते. फुले तोडताना पानांना धक्का लागणार नाही याची काळजी घेतली पाहिजे. पाकळी कुस्करली जाणार नाही यावर भर दिला पाहिजे. दोन-तीन फुलांचा गुच्छ तुम्ही एकदम तोडा. ही फुले घायाळ होतील, कारण प्रत्येक फुलास तुमचा स्पर्श हवा असतो. जणू काही तुमच्या स्पर्शेंद्रियातील संवेदना ही फुले टिपण्यास उत्सुक आहेत. मोगऱ्याची फुले जेव्हा तुमच्या ओंजळीत येतील तेव्हा ही भरलेली ओंजळ प्रथम तुम्हीच पहा. ती ओंजळीत अशी काही पहुडलेली दिसतील की तुम्ही क्षणभर थक्क व्हाल. ज्या हस्तलाघवातून ती तुमच्यापर्यंत आली. तो प्रवासशीण घालविणारा असतो.

मोगऱ्याचे फूल ही एक तरल संवेदनक्षम कविता असते. ही कविता ज्या प्रतिभेतून अवतरली ती प्रतिभा नित्यनूतन सौंदर्य देणारी वाटते. या प्रतिभेच्या काव्यातले केवळ डोळ्यांनाच नव्हे, तर सर्वच संवेदक शक्तींना दिपविणारे वैभव त्याच्यापुढे अत्यंत तरल, सूचक, ध्वनिसंकुल अशा आविष्कारात प्रकट झालेले आपणास दिसते. यामुळेच मोगऱ्याच्या फुलाला व्यापक, सूक्ष्म असे गंधित सामर्थ्य आलेले असते. समग्र मोगरा अलौकिक भासतो, तो यामुळेच. त्याची संवेदनशक्ती इतकी सूक्ष्म बनली की त्याला अमूर्त-कल्पनामय अशा भावविश्वात लीलया संचार करता आला.

मोगरा हा तुमच्या डोळ्याला एक निष्ठावंत साधक दिसावा एवढा तो अधिकारी आहे. त्याच्या गंधात सामावलेले आध्यात्मिक अनुभव म्हणजे त्याच्या फूलसृष्टीचे उदात्तीकरण मानले तरी त्याच्या संज्ञाशक्तीची झेप विस्मयकारक नक्कीच भासते. अशा वेळी तो आपल्या भौतिक मर्यादा ओलांडून संज्ञामय अशा अलौकिक पदवीला पोचतो. येथे त्याच्या गंधात सामावलेली पृथकता वेगळी होतच नाही. त्याच्या या परमानुभवाचे अमृत खरोखर कुठे सापडत असेल तर ते त्याच्या गंधमय काव्यात होय. आपल्या फुलातून तो इतरांना देत असलेला अनुभव व यातूनच त्याला अवगत झालेला विश्वात्मक भाव त्याच्या या समग्र संवेदनशक्तीचे एकत्र झालेले दर्शन असते.

मोगरा या साधकाची आतुरता, उत्सुकता, हुरहूर आणि व्याकुळता त्याच्या फुलाफुलातून दिसून येते. मोगऱ्याच्या कळीचे जेव्हा विकसित फूल होते तेव्हा हा आविष्कार आपले ' मोगरेपण ' घेऊनच साकार झालेला असतो. अशा वेळी तो तुम्हाला आनंदाचा एक अपूर्व झराच वाटेल. ज्ञानेश्वरांनी आपल्या

प्रतिभेतून जो मोगरा गायिला त्याने मराठी वाङ्मयाचे सोने तर केलेच; पण समग्र निसर्गात या फुलास अद्वितीय असा डौल प्राप्त करून दिला. ज्ञानेश्वरांनी आपल्या त्या अवीट गीतात मोगऱ्याचा वेल लावण्यापासून त्यावर कळ्यांचा भरिभार उमलून तो बहरून जावा व त्याचे झेले गुंफून प्रिय व्यक्तीला अर्पण करावे या लौकिक गोष्टीचा अनुपम उपयोग आपला आत्मानुभव सांगण्यासाठी केला. ज्ञानेश्वरांना इतर फुलांऐवजी केवळ मोगऱ्याचे फूल का दिसावे ? कारण आपले अनुभूती विश्व जे या प्रतिभावंतास शब्दात पकडता आले नाही, संवेदनेत येता आले नाही. नेमके ते मोगऱ्याच्या फुलातून व्यक्त करता आले. इतर फुले कवितेत प्रतिमा म्हणून येतात तेव्हा ती आशयरचित होतात. मोगरा हा एकच असा की तो कवितेत आशयाला आवाहन देतो. म्हणूनच मोगऱ्याकडे पाहणे, त्याच्या फुलाचा गंध घेणे ही क्रिया भावसमाधीतून अवतरली पाहिजे. जणू काही हा भावानुभव इंद्रियाकडून घेऊन इंद्रियापलीकडे न्यायचा असतो. ज्ञानेश्वरांनी मोगऱ्याचे निमित्त करून नव्हे, त्या मोगऱ्यात विरघळून आपल्या मनातल्या संवेदनांमधून विणलेले तलम पोत, भावनेची वीण ज्या धुनेतून अपूर्व झाली तिला या सृष्टीत तोड नाही.

मोगरा हा तुमच्या राठ वैखरीला कधीच जुमानत नाही. तो नेहमीच 'पराहुनी पराते' साठी आसुसलेला असतो. तो जेव्हा कवितेत प्रतिमा म्हणून येतो तेव्हा 'सायुज्यता' घेऊन त्याने रसिकांशी नाते जोडलेले असते. ज्या मातीतून त्याचे नवथर रोपटे हळूहळू वृद्धिंगत होते व आकाशाशी जवळीक जडू पाहते, त्या रोपट्याची फुले वरील चांदण्याशी 'उन्मनी' पावलेली असतात. अंगणातील स्वच्छंद चांदण्यात वर पाहत आकाशातील तारका मोजत मोगऱ्याची फुले, परातारे, फुले एकमेकांत तदाकार झालेली असतील. एखाद्या साधकास अनाहूतपणे साध्य प्राप्त व्हावे तसा मोगरा अप्रूपपणे यावेळी सविकल्प समाधीत आलेला असेल.

मोगऱ्याची लौकिक पातळी देखील अशीच नजरेत भरण्यासारखी आहे. मोगऱ्याचा गजरा प्रेयसीला भूल पाडतो. पत्नीला लडिवाळपणा आणून देतो. तुमची कितीतरी गूढे या गजऱ्याने क्षणात सोडवली असतील. प्रियकर ज्या ऊर्मीतून प्रेयसीला गजरा बहाल करतो ती ऊर्मी कधीच ओसरत नाही. परीक्षेला जाताना हाच गजरा तुम्ही प्रेयसीला द्या. तिला हॉलमध्ये तुमच्या पुढे बसवा. या फुलांच्या धुंदीत तुमचा सारा पेपर सुटलेला असेल. जणू काय प्रत्येक प्रश्न या फुलाने उत्तरासहित तुमच्यापर्यंत आणून दिला. पेपर लिहिताना ही

फुले जशी सुकुमार गंध देतात, तशीच पेपर तपासताना देखील आपल्या गंधाने परीक्षकाचे हृदयपरिवर्तन करून जातात. आपपरभावाचे नाते या फुलात कधीच नसते. आणि तेच नाते गंधाद्वारे त्यांनी या पृथ्वीवर रुजवलेले असते.

निर्माल्य झालेली मोगऱ्याची फुले तुम्ही हुंगा. ती आपल्या गंधाने तुम्हास ताजेतवाने करतील. आपले पांढरेशुभ्र शुचित्व त्यांनी देवाकडे समर्पण केले असेल व उरलेले सौंदर्य घेऊन ती तुमच्याकडे येतील. अशावेळी या फुलांचे स्वागत उत्कट भावनेने करा. अन्यथा ती कोमेजून जातील. मोगऱ्याचा रुसवा हा गंधाप्रमाणेच साऱ्या आसमंतात पसरत जातो. इकडे तिकडे पाहात जाता जाता सर्वांनाच डिवचतो व त्याचा अनुराग जीवन प्रफुल्लित करतो, तर त्याचा राग जगण्याचे मर्मच घेऊन जातो. तुम्ही आपला रुसवा मोगऱ्यावर कधीच काढू शकणार नाही. तुमच्या तळपायाची आग मस्तकापर्यंत जेव्हा जाईल तेव्हा समोरचे मोगऱ्याचे झाड तुमच्याशी हितगुज करीत तुम्हाला शांत करील. अशा वेळी तुम्ही मोगऱ्याचे एक फूल नाकाजवळ न्या. ते अलगद तुम्हास सांगेल, ''तुझे आहे तुजपाशी परि तू जागा चुकलासी.'

मोगऱ्याच्या फुलांनी भरलेली परडी देवघरात ठेवताना सगळे देव या फुलाकडे नजर देऊन उत्सुक झालेले असतील. 'पत्रं-पुष्पं-फलं-तोयं' या तंत्रातील ही फुले ज्या पूजेतून या देवाकडे येतात त्यात त्यांनी आपले समर्पण दिले असते. ती ज्या देवावर वाहिलेली असतात तिथेच ती ऐक्य पावतात. ही भेट जिवा-शिवाची असते. त्यांचा हा प्रवास सान्ताकडून अनंताकडे जाणारा असतो. मोगऱ्याचे फूल हे भक्तीचे साधन असते. पण ते ज्या माध्यमातून 'कृष्णार्पण' होते त्यात साध्य-साधन द्वंद्व नामशेष झालेले असते. नवविधा भक्तीतील शेवटची आत्मनिवेदन करणारी भक्ती मोगरा घेऊनच यावेळी एकाग्र झालेली असते. मोगरा हे फूल असे आहे की जे उत्कट प्रीतीलाही सामोरे जाते व आर्त भक्तीला देखील आपलेसे करते. सत्यभामा आणि रुक्मिणी यांचा सांधा पारिजातकाऐवजी मोगऱ्याने साधला असता तर सारे कृष्णचरित्र आज नव्या रंगातून आपण पाहिले असते. मोगरा आपल्या प्रीतीने 'समीपता' हेरून घेतो . तो भक्तीने आपली 'सरूपता' ओळखून घेतो आणि निर्माल्य मुक्तीतून 'सायुज्यते'चे रहस्य उकलून इतरांना दाखवतो.

तुमचे घर बांधायचे स्वप्न दारात मोगऱ्याचे रोपटे असल्याशिवाय साकार झाल्याचे समाधान देणार नाही. तुम्ही दिवसभर थकूनभागून जाल तेव्हा मोगरा हा तुमचा विरंगुळा असेल. क्षणभर तुम्ही त्याच्याजवळ बसा. समग्र रोपट्यावर

आपली नजर फिरवा-तोही तुमच्याकडे अपूर्व दिलासा म्हणून पाहील. त्याच्या स्पर्शातील कोमलता, त्याच्या गंधातील आतुरता तुमच्या 'जीवीचे जीवन' झालेले असेल. तुम्ही बाहेर महत्त्वाच्या कामास जाताना खिशात दोन मोगऱ्याची फुले ठेवा, हे कार्य केव्हाच सिद्धीला जाईल. लग्नसमयी मंडपात वधू-वरांना मोगऱ्याचा हार दृढ बंधनाचे महत्त्व तर पटवून देईलच, पण येणारा-जाणाऱ्यास जो गुच्छ द्याल त्यात असलेले फूल तुमच्या मनाचे मोठेपण दाखवून देईल. संस्कृतीचा गंध आणि दर्प ज्या मोगऱ्याने आपल्या पाकळ्यांत जपून ठेवला तो आजपर्यंत तरी केवळ जोडण्याचे कार्यच करीत आला आहे.

अलीकडे मला रेडिओवरील सर्व मराठी गाणी मोगरामय झालेली दिसतात. बालगंधर्वांच्या गळ्यातून आलेले 'मम सुखाची ठेव' हे नाट्यगीत ऐकताना माझ्या नजरेसमोरून मोगरा जाता जात नाही. संत रामदास यांना पंढरपूर येथे पांडुरंगाऐवजी समोर रामाची मूर्ती दिसली. तसा 'बी' कवीचा सुमधुर 'चाफा' ऐकल्यानंतर मी पुन्हा पुन्हा मोगराच ऐकतो. तांबे यांच्या प्रतिभेतून 'नका कुस्करू ही सुमने' ही कविता लिहिली गेली त्यावेळी या कवीपुढे केवळ मोगऱ्याची फुले तर नसतील ना? एखादा राग मैफलीत आळविताना गायक मोगऱ्याचे फूल मधून मधून हुंगत असलेलाच मी पाहतो. एखादी नर्तिका आपल्या नृत्यातून समेवर येताना तिने आपल्या वेणीत मोगऱ्याचा गजरा खोवलेला मला दिसतो. चित्र रेखाटताना चित्रकाराला जी भावसमाधी लागते तेव्हा त्याचा कुंचला मोगऱ्याच्या फुलांनी बहरलेला असेल याची मला शंका नसते. मोगऱ्याचे विश्व चराचर सृष्टीला आवाहन करीत त्यात मिसळलेले असते.

मृत्यूने मानवी जीवनाची समाप्ती होते. तरीसुद्धा या पार्थिव देहावर जी मोगऱ्याची फुले उधळलेली असतात, त्यात शरीरातून निसटून गेलेल्या आत्म्याचे चिरंतनत्व दिसते. ज्या मातीतून जन्म होतो, ज्या मातीला शेवटी जाऊन मिळायचे असते, तीच माती मोगऱ्याचे रोपटे रुजवते. तोच मोगरा तुम्हाला भिजवतो. तोच मोगरा तुम्हाला गंधित करतो. पर्वताएवढे दुःख आपल्या पाकळीवर पेलण्याचे सामर्थ्य व जवाएवढे सुख आपल्य परागातून गंधयुक्त करून साऱ्या जगावर पसरविण्याचे माहात्म्य केवळ या स्थितप्रज्ञाजवळ आहे. नूतन आणि जीर्ण, चैतन्य आणि निर्माल्य ही द्वंद्वे मोगरा सुगंधाद्वारे एकाक्षणात अद्वैताप्रत नेतो. एवढी त्याची अपूर्व किमया आहे.

समग्र जीवन आणि जगत् एका अद्भुत सौरभाने भरून जाते ते मोगऱ्याकडे

पाहून. म्हणून मोगऱ्याचा 'गगनावेरी' गेलेला वेल पाहून किंवा अंगणात समृद्ध झालेले रोपटे पाहून मी आपले 'पुण्य फळास' आले याचे समाधान मानतो. मानवी जीवनात अशाश्वततेला कायमचा थारा आहे. पण तिच्या धारदार वळणातूनच शाश्वततेला पुढे जायचे असते. आणि हे सारे करीत असताना त्यात सुगंधमय मोगऱ्याची फुले ओवावयाची असतात. हा शेला समर्पणातूनच कृष्णार्पण करायचा असतो. मानवी जीवनात शेवटी जाणे किंवा येणे हे निमित्तमात्रच असते. मात्र फक्त एकच एक अपूर्व सुगंधमयाची जाणीव शिल्लक उरते व आपली वाणी उद्‌गारते :

'मोगरा फुलला ऽऽ मोगरा फुलला'

# ७ / लागेबांधे

आपले स्वत:चे घर असावे. घराभोवती एक सुंदर बाग असावी. या घराला तुमची एक अभ्यासिका असावी. तिच्या बाजूलाच तुमची अशी ' खास ' खोली राहावी. या खोलीच्या खिडकीतून रातराणीचा सुगंध साऱ्या खोलीभर दरवळत असावा. पौर्णिमेच्या मंद चांदण्यात हा सुगंध असा काही चांदण्यात मिसळून जावा, जसे साखर विरघळलेले दूध खोलीभर सांडावे. रातराणीचा गंध आणि चंद्राचे चांदणे परस्परात मिसळताना एकमेकांनी हातचे न राखता आपल्या ' स्व ' ला विरघळू द्यावे; ही एक अपूर्व किमया आहे.

माझे जसे घराचे एक स्वप्न आहे तसेच बागेचेही एक स्वप्न आहे. हे स्वप्न माझे म्हणूनच माझी त्याला मर्यादा आहे. त्याला ना महत्त्वाकांक्षा, ना अपूर्व मनीषा. अगदी साधी इच्छा आहे. मी हे स्वप्न झोपेत पाहिले. जागेपणी पाहिले. नको तेव्हा अनुभवले. माझी बाग जेव्हा मी स्वप्नातून वास्तवात आणली तेव्हा तिचा चेहरा माझ्या व्यक्तिमत्त्वासह तिला मिळाला. या बागेत कुठलाच फापट पसारा नाही. पांथस्थांना घनदाट सावली मिळावी असे येथे वृक्ष नाहीत. किंबहुना वृक्षांच्या उंचीपर्यंत वाढणारी झाडेच मला नको आहेत. मी रोपटे लावतो तेव्हाच ही खूणगाठ बांधून घेतो की ते आपल्याच उंचीचे असले पाहिजे. मला वनराई पाहण्यासाठी आवडते, पण तिचा अनुभव मला कधीच अपूर्व वाटला नाही. घराभोवती बाग असावी, बागेत झाडी असावी, पण ती जंगलात वाढतात तशी नव्हे. जंगलात ती बंधने तोडून वाढतात. म्हणूनच आकारहीन असतात. बागेत ती बंधने घेऊनच येतात आणि वाढतात. रोपटी आणि झाडे मला नेहमीच परस्परांपासून दूरवर असलेली दिसतात. एक

लावताना तुमच्या मनात घर बांधून जाते, तर दुसरे लावताना बांधलेल्या घराला अडचण निर्माण करते. रातराणी मला हवी आहे, पण चाफा नको. कविवर्य 'बी' यांच्या कल्पकतेतून शेवटपर्यंत मुखस्तंभ राहिलेला चाफा ज्या तू- मी च्या बोलण्यातून 'उन्मनी'पर्यंत पोचला, तेव्हा माझे अंगण रातराणीच्या सुगंधाने उतू आले होते.

जंगलातील झाडे शिकार करण्यासाठी वातावरणनिर्मितीचा एक भाग म्हणून उभी असतात. दुष्यंत शिकारीसाठी जंगलात आला तेव्हा त्याची नजर ज्या शकुंतलेकडे वळली, ती आश्रमातील बागेतली शकुंतला होती. या दोन प्रियकरांची नजरबंदी केली ती जंगलातील झाडांनी नव्हे, आश्रमातील चाफ्याच्या फुलांनी! शकुंतला आपल्या प्रियकराच्या नजरेने लाजली नि घरात लपली. तिच्या मैत्रिणींनी तिला पुन:पुन्हा एकच प्रश्न विचारला, 'आज तुला असे का होते? लाजाळू शकुंतला या प्रश्नाचे उत्तर ते काय देणार? शेवटी ती वैतागून उत्तरते, 'जा, त्या चंपकाला विचार.' मला शकुंतलेने दाखविलेल्या चंपकाचा हेवा वाटतो. पण लगेच मनाला धीर येतो की हा चंपक घराच्या बागेतला आहे. म्हणजेच तो आपला आहे. जो मदनाचा पुतळा म्हणून फुलतो आणि प्रणयाची धुंदी म्हणून सुगंधतो. जे शकुंतलेला सांगता आले नाही ते तिला आम्हाला चंपकात दिसले. या एकाच वैभवाचा तो वारसदार आहे. त्याच्या या प्रणयसाम्राज्यात तो सार्वभौम म्हणून वावरतो. अजिंक्यभूमी हस्तगत करतो. तुम्हाला पाहतो आणि जिंकून घेतो. गुलाब सर्व फुलांचा राजा असेल, पण तो प्रणयवीरांचाही बादशहा आहे. म्हणूनच बागेचे स्वप्न त्यात गुलाब असल्याशिवाय फुलणार नाही.

ज्ञानेश्वरांच्या मोगऱ्याचा वेल इवल्याशा रोपट्यापासून गगनापर्यंत पोचला तो 'मोगरा फुलला' 'मोगरा फुलला' या अपूर्व धुनेतून. ज्ञानेश्वरांसारखी थोर मंडळी 'विश्व स्वधर्मी सूर्ये पाहो' पर्यंत जातात. म्हणून त्यांना आपल्या गवाक्षातून सारे गगन कवेत घेता येते. ज्ञानेश्वर 'हे विश्वचि माझे घर' या भूमिकेवर वावरत म्हणून त्यांची बाग 'व्योम गवसले' या भावनेत फुलत होती. माझ्या बागेतला मोगरा संतांची पुण्याई घेऊन आला पण त्याचे दरवळणे मात्र 'बहुत सुकृताच्या' जोडीतून' आमचीच 'आवड' म्हणून शिल्लक राहिले आहे. माझ्या बागेत तो एका कोपऱ्यात फुलतो आणि त्याला पाहताच माझ्या काळजाच्या कोपऱ्याचे सार्थक होते. तुम्ही कुठलाही शीण अंगात घेऊन या आणि फुलांनी बहरलेल्या मोगऱ्यावर नजर द्या. तुम्ही तन्मय व्हाल. त्यात एक वाऱ्याची

झुळूक यावी. एक एक मोगऱ्याचे फूल अलगद खाली पडावे. सारे झाड हलकेफुलके व्हावे. तुम्हीही या क्षणी शीण फेकून मोकळे झालेला असाल. हा शीण फुलांनी घेतला असेल. तुम्हाला सुगंध तेवढा दिला असेल. ही पांढरीशुभ्र फुले तुमच्या स्वप्नाला सत्याचा आकार देतात. त्यातील सुगंध या स्वप्नाच्या सौंदर्याला मूर्तरूप देईल. 'आणि या दोन्हींचा समन्वय शिवा'ची भूमी पावन करील. सत्य, शिव आणि सुंदर यांच्या मुशीतून वाढलेले मोगऱ्याशिवाय दुसरे झाड नाही. बागेला त्याच्यामुळे शोभाच नाही. मोगराही निरंतर बागेच्या शोधात असतो.

बालकवी निसर्गवेडे होते म्हणूनच संवेदनक्षम होते. त्यांनी जे श्रावणमासाचे गीत गाईले ते इतरांना ऐकू येणार नाही. यासाठी एक प्राजक्त फुलला पाहिजे. माझे मत मला नेहमीच सांगते की बालकवी हे स्वत:च एक प्राजक्ताचे फूल होते. संवेदनक्षम कवी कमालीचे हळवे असतात म्हणूनच प्राजक्तासम लवकर सुकतात. वारादेखील या झाडाभोवती घुटमळत, रेंगाळत नाही, तर आपल्या चंचल प्रवासात लगेच या फुलांच्या सुगंधाला घेऊन जातो. रात्री क्षणात चांदण्या फुलून सारे आकाश चांदण्यामय व्हावे तशी ही फुले सकाळी सारे अंगण आपल्या सड्यात शुचिर्भूत करतात. एकदा मी एका नाजूक फुलावर दवबिंदू रेंगाळताना पाहिला. जवळ जाऊन पुन्हा पाहतो तो तो स्वत:च फूल होऊन गेला होता. दु:ख देवाला सांगावे यापेक्षा प्राजक्ताला सांगा. तो तुम्हाला 'गंधित सुख' बहाल करील, या क्रियेत तो स्वत: कोमेजून जाईल. पण तुमचे सुख मात्र शाश्वत राहील. पुराणात सत्यभामेच्या अंगणातील प्राजक्त शेजारच्या घरात फुलांचा सडा टाकत असे. ही घटना 'भामारोष' जागा करण्यासाठी वर्णिली असेल. पण यामागे संवेदनक्षम प्राजक्ताचे मन कृष्णास सांगून गेले असेल की, 'हे मधुसूदना, सत्यभामेचा राग हा अनुरागाचाच एक भाग असल्याने ती देखील आमची एक सहवेदना आहे.' आपल्या वेदनेची पाळेमुळे जमिनीत खोलवर रुजवून वरच्या प्रत्येक फुलासह आपली संवेदना सुकुमार गंधाने वसुंधरेवर चातुर्मासभर फैलावत ठेवणे, केवळ याच कारणासाठी प्राजक्ताचा तुमच्या बागेत जन्म झालेला असतो.

बोरकरांच्या समग्र कवितेतून विलसत जाणारी अबोली तुमच्या बागेत फक्त कवितेतूनच बोलते. मात्र तिच्या दृष्टीत आणि तुमच्या नजरेत रसिकता असली पाहिजे. कलावंत आणि भोक्ता यांचा जोपर्यंत समसमान संयोग नाही तोपर्यंत सारा मामला रसिकहीन असतो. हृदयाची व्यथा हृदयालाच कळते,

हृदयच ती हलकी करते. तुमच्या बागेतील अबोलीशी व्यवहार करताना हीच एकमेव न्याय्य बाजू तिला मानवते. देणे आणि घेणे तिला मंजूर नाही. सजवणे आणि फुलणे तिला हक्काचे वाटते. तिचे अंगचे रंगकौशल्य ज्या वेणीला मार्दवता बहाल करते ती वेणी 'भगवी रतन अबोली'च असली पाहिजे, अशा अबोलीजवळ तुम्ही क्षणभर जा, तुम्ही आपल्या दृष्टिक्षेपात मंत्रमुग्ध व्हाल. तुमची सारी इंद्रिये जिभेवर खुंटलेली असतील. तुम्ही तिच्या सान्निध्यात डोळ्यावाचून डोळ्यापलीकडचे पाहाल, कानाशिवाय कानापलीकडे ऐकाल आणि शब्दाविना संवादिजेचा भावपूर्ण प्रत्यय तुम्हाला आलेला असेल. चार दिवस पत्नीशिवाय सारे घर सुने सुने व्हावे तशी बाग अबोलीसाठी बेचैन झालेली असते.

कडेकडेने बहरात आलेली पांढरी शेवंती तुमच्या बागेचे एक भूषण आहे. गोविंदाग्रजांनी आपल्या कवितेस 'वाग्वैजयंती' म्हणून संबोधताना त्यांच्या समोर शेवंतीच असेल. त्यांनी जी फुले वेचलेली असतील ती देखील शेवंतीची असावी. शेवंतीचे एक फूल तुम्हाला समाधान देणारे नसते. ओंजळभर शेवंती तुम्हाला न्याय देते. नव्हे, तरच तुम्ही तिला न्याय देऊ शकता. भंगलेली हृदये शेवंतीने भरवा. त्यांना योग्य ती वाट दिसेल. तुमचे क्षितिज विस्तारण्याची किमया शेवंतीनेच करावी. समुद्रातील लाटांचा खेळ अंतरंगी पटावा तो तिच्याच नजरेने. तिची नजर कासवाप्रमाणे दूर राहून सार्थकी होणारी. तिला आपल्या प्रेमाचा वर्षाव करता येत नाही, याचा अर्थ ती प्रेमाचा बाजार मांडत नाही की प्रदर्शनही करीत नाही-जाग्यावर राहून ती आलिंगन देते - जसे नराने नारायणास दिले. माझ्या बागेत शेवंतीसाठी नेहमीच रिझर्व्हेशन असते. तिथे इतरांना वाव नाही व इतरही तिथे चुकून जाणार नाहीत.

जाई-जुईचे का बागेला वावडे असते? ज्या फुलांचे निर्माल्यदेखील मर्मबंधाची ठेव म्हणून जपून ठेवावी ती जाई-जुई बागेच्या वैभवाचा कळस म्हणता येईल. जाईजुई ही बागेतील एक अद्वैत जोडी आहे. जाई-जुई या जुळ्या बहिणी जन्मभर एकत्रच नांदून बागेची शोभा वाढवितात. दोघींचा आकार एक. विकारही एक. दोन डोळे शेजारी, भेट नाही संसारी. तसे या दोघींचे नाही. लक्ष्मी आणि सरस्वती यांचे वैर या दोघींत नाही. साऱ्या बागेला सत्त्व गुणातील एकरूपता या बहिणींनी शिकवावी एवढा त्यांचा अधिकार आहे. ज्या वेलीवर या दोघी फुलतात, पहुडतात त्यांना आपल्या या अपत्यांचा केवढा अभिमान! पुत्रप्रेमाचे, पुत्रप्राप्तीचे समाधान देखील येथे गौण आहे. कन्याप्राप्ती

झाली की तुम्ही या आनंदात एखादे जुईचे की जाईचे फूल वाटा. ते घरोघरी तुमच्या पुत्रीचा सुगंध घेऊन जाईल. मृगात कस्तुरी जशी लपून बसते तशी जाई-जुई बागेत लपलेली असते. जणू काही या दोघींना जागा चुकलेल्या. जगास 'तुझे आहे तुजपाशी'चा मंत्र सांगायचा असतो. जाई-जुईची फुले वेचता वेचता कंबर मोडते. वेचताना शीण येतो. पण भरलेली परडी पाहून तुम्ही पुन्हा ताजेतवाने होता.

आणि याच बागेत मधोमध तुळस तुरा खोवून उभी असते. तिचा डौल तासन् तास पाहावा. न बोलता तिला ऐकावे. काय ऐकले ते कुणालाच सांगू नये. जे हृद्गत तिने एकनिष्ठ होऊन केवळ गिरिधारीला सांगितले तिच्याशी आपण एकनिष्ठ राहिलेच पाहिजे. कुठल्याही निष्ठेला पर्याय नसतो. ती आपल्या घरकुलात समाधानाने नांदते, एवढे की तिला इतरांची नजर लागावी. लग्न झालेल्या स्त्रीचे कुंकू हे सौभाग्य तसे बागेला तुळशीचे सौभाग्य आहे. सौभाग्य आणि निष्ठा या तुळशीने कवचकुंडले म्हणून जपून ठेवल्या आणि बागेला व्रतस्थ केले. सूर्याची दाहकता आणि चंद्राची शीतलता ती ज्ञानी भक्ताप्रमाणे एकाच मापाने मोजते आणि तेही बागेतच.

माझ्या बागेतील हा सारा परिवार माझ्या जीवाचे जीवन होऊन राहिला आहे. मी मोकळ्या वेळेत बागेत जात नाही तर जाणे माझ्या अंगचे एक वळण झाले आहे. पंढरीच्या देवळात संतांना आपले गणगोत दिसले तसे या बागेत मला पावलापावलावर माझीच हृदये मला दिसतात. इतरांना ती दिसू नये इतकी ती मला पाहण्यात मग्न आहेत. आपुलकीच्या डोळ्यांनी पाहताना या साऱ्यांचे मला जे दर्शन घडते ते केवळ अपूर्व आहे. साऱ्या जगण्यात मला तुकारामाचा 'जोडोनिया धन उत्तम व्यवहारे'चा अंदाज घेता आला नाही, त्या तुकारामाच्या, 'वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरे'चा भावप्रत्यय मी बागेत पाय ठेवताच मला येतो. म्हणूनच मला जवळचे असेल तेवढे सोने मोडून या बागेची सोयरीक जोडावी वाटते. सुख, दुःख, तसेच शाश्वत आणि अशाश्वत या द्वंद्वाने मानवी जीवन जर व्यापलेले असेल तर त्यालाही या संघर्षातून एक आगळे वेगळे नंदनवन बनवणे भाग आहे. शेवटी इंद्रदेखील एका नंदनवनातच रमलेला होता. आणि इतर देवांचा झगडा देखील या नंदनवनासाठीच होता. माणूस जन्मतो तोही एक नंदनवन घेऊन आणि मरतो तेव्हा नंदनवनाकडे जाण्यासाठी. आत्मा अमर आहे. म्हणजेच तो एक नंदनवन आहे. मला माझी बाग एक नंदनवन वाटते. ती माझी आहे आणि माझीच

राहावी हा माझा अट्टाहास. इतरांनी तिच्यात, डोकावले तरी ते मला सहन होणार नाही, इतकी माझी वेव्ह लेंग्थ तिच्या रक्तात, आसवात आणि उमाळ्यात जुळून गेली आहे.

❁ ❁ ❁

# ८ / वळण

प्रत्येक प्राणी हा जीवनमार्गावरचा एक वाटसरू आहे. म्हणूनच या प्रवासात वळण हे अटळ आहे. ध्येयाप्रत मार्गक्रमण करणारे पुष्कळ, पण या ध्येयाचे पैलतीर गाठणारे फार थोडे. आपल्या वळणावर उभे राहून मागे पाहता येते. पुढे नजर जाते आणि अवतीभवती देखील पाहता येते. वळण हे असे काही मोक्याचे ठिकाण आहे की ज्यावर तुम्ही क्षणभर थांबूनच पुढे गेले पाहिजे. आयुष्यात आपल्या चालण्याला सीमा नाही, पण वळण मात्र आहे. मोक्षाप्रत जाण्यासाठी जशी पूर्वसुकृताची जोड हवी तसे आपल्या वळणापर्यंत पोचण्यास संचिताचे गाठोडे जवळ असले पाहिजे.

माझे वळण मला स्वल्पविराम वाटते. नव्या हुरूपाने पुढे धाव घेण्यासाठी हा स्वल्पविराम नवा उत्साह देतो. तुम्हाला ज्या ठिकाणी पूर्णविराम द्यायचा आहे त्याअगोदर हा स्वल्पविराम पाहिला पाहिजे. तसे पाहता आयुष्यातील सगळी विरामचिन्हे अशी काही मोक्यावर येऊन बसतात की, ज्यांना मिटवणे कठीण ! पण या सगळ्यांना स्वल्पविराम पुरून उरतो. आपल्या या अधिकाराने इतरांच्या जीवाचे सोने करून जातो.

प्रियकराने आपल्या प्रेयसीला स्वल्पविरामाचे वेड लावावे; का की ती त्याच्या जीवनाचे एक सहजसुंदर वळण असते. आपली प्रीतमुग्धा जेव्हा जेव्हा या वळणावर थांबेल तेव्हा तेव्हा तिचे अस्फुट प्रेम प्रफुल्लतेकडे धावेल. जेव्हा तिची नजर क्षितिजाकडे जाईल तेव्हाही तिचे पाय वळणाखालीच असतील.

तारुण्य हे आयुष्यातील एक प्रभावी वळणाचे गमक नव्हे काय? बालपणाला मागे सारून चैतन्यपूर्ण जीवनाचा तो एक थरथरता उत्साह आहे.

या वळणावर कधीच थांबायचे नसते. सतत धो धो वाहावयाचे असते. उसळत्या लाटेतून किनाऱ्याला धडक द्यायची असते. कधी चुका करायच्या असतात. तडजोडीशिवाय त्यांना धक्का देत पुढे जायचे असते. तारुण्याचे वळण हे विकसित फुलांच्या पाकळीवर कधीच दवबिंदूना आंदण देते. जणू काय त्या क्षणभर, मोत्याच्या चकाकीतून आपलेच तेज जीवनभर वाहते व्हावे.

आयुष्याच्या या टप्प्यावर आपला विसावा भरपूर असावा. इथे पापण्यांचा खेळ ओलाचिंब होईल. थरथरत्या ओठांना शब्दांचे बुडबुडे येतील. आपले पाऊल वारा होऊन धावते होईल. मंद झुळूक बालपणाच्या दिशेने येथे घर करून राहिल्यामुळे या वळणावरचा मुक्काम 'सुख आले माझ्या दारी' सारखा होईल. तारुण्याची हाक कुणाला नसते? पण वळणागणिक येणारे तारुण्य वेगळे व तारुण्यागणिक येणारे वळण वेगळे. दोन्हींच्या सीमा एकच.

बालपणाने तारुण्याला खो द्यावा आणि आपण वार्धक्य वळणावर अलगद पडावे. येथे शैशवातील प्रौढत्व व प्रौढत्वातील शैशव एकाच मापाने मोजायचे असते. आयुष्यभर आपण साचवलेला पाचोळा या वळणावर एकत्र करायचा असतो. सारे हिरवेपण तृप्तीच्या उपभोगातून परिपक्वतेकडे आणायचे असते.

हे वळण थांबून थोडे अंतर्मुख होणारे आहे. इथे विचारांची देवाण-घेवाण असावी. सिंहावलोकनाचा अंदाज राहावा, विहंगमावलोकनाने सारा परिसर जाणून आपलासा करावा. बालपणाचे वळण आणि तारुण्याचे वळण दोन्ही या वळणावरील संगमावर आलेली असतात. जणू या त्रिवेणी संगमाचा या वार्धक्याने मक्ताच घेतलेला असतो. येथेही विस्तारलेले क्षितिज पाहायचे असते. डोळे झाकून पुन्हा पुन्हा अजमावयाचे असते. या वळणावर खरे म्हणजे तुम्ही किनाऱ्यावरच असता. पण तो एकदम पैल असतो. पैलाच्या टापूतून तो आला असल्याने त्याचा अनुभव नेहमीच कित्ता गिरवण्यासारखा असतो.

आयुष्यातील तिन्ही वळणागणिक जगण्यासाठी हातचा एक एक घ्यावा व तो खुल्या दिलाने वार्धक्यासाठी बहाल करावा. इथे काहीच संवेदना बोथट होत नाही. अश्रू कधीच गोठत नाही. शब्द कधीच मिटत नाही. किंवा जीवनाची कधीच पानझड होत नाही. सारे कसे अलिप्त-तटस्थ असते. म्हणूनच येथे पूर्णविराम आठवतो.

नागमोडी पायवाटेने जाताना वळणच पायवाट होऊन जाते. इथे आपण सहजगत्या आपली पावले मोजावीत. एकटेपणातून आपली साथ आठवून घ्यावी. इथे तुम्ही परके असाल पण पोरके नसाल. तुम्हाला छान ऐकू येईल

पण प्रतिध्वनी शोधता येणार नाही. इथे चालताना तुमच्या पावलांना एक लय सापडेल. धावण्याचे वावडे असल्याने तुमच्या संथ चालीस एक लय राहील. इथेच तुमच्या ‘वळत जाई पायवाट’ चे कोडे सुटेल. या वाटेने तुम्ही अनवाणी जाल तर तुमचे पाय पृथ्वीमातेस स्पष्ट खुणा जुळवून देतील. ‘अजुनि चालतोचि वाट’ या कवितेस याच वळणावर भवितव्य सापडेल. आशा आणि निराशा, तसेच सुख आणि दु:ख या द्वंद्वाची येथे उकल होऊन आपण ‘झपूर्झा’ होऊ.

माणसांना जेव्हा चालायचे त्राण नसते. तेव्हा त्याने आपली सगळी वळणे ओंजळीत जमा करून अर्घ्य देण्यास सिद्ध व्हावे. दोन्ही डोळ्यांच्या पापण्या घट्ट मिटवून अंधार आठवावा. इथे प्रकाशाचा एकही किरण दिसता कामा नये. साऱ्या मनाचा थकवा आपल्या पावलात विरघळू द्यावा. क्षणभर थांबून इथेच बसावे. तेव्हा पुन्हा तुम्हास वळणच आठवेल. मिटलेले फूल आणि नसलेले वळण हा एकाच क्षितिजाचा विस्तार. एक गंधाळ होऊन आपला परिसर मोहविते तर दुसरे पंखाळ उड्डाणाकडे टक लावून पाहते. तुम्ही जेव्हा जेव्हा चालून चालून थकाल तेव्हा या वळणाचा शोध घ्याल. अर्घ्य दिलेल्या प्रवाहातून ते तुमच्यापर्यंत येईल. तुम्हाला जरासे थांबवून धीर देईल. सांत्वनासाठी आसुसलेले डोळे येथेच अश्रूंच्या वाटेने या वळणावर पुन्हा येतील. जगण्याचा अर्थ आणि चालण्याचा भावार्थ आपले त्राण अजमावून प्रकाशाकडे डोकावेल. ‘तम अल्प द्युती बहु’ या भावप्रत्ययापर्यंत तुम्ही पोचाल. तेव्हा पुन्हा एकदा चालणेच अटळ होईल.

ऋतुपरत्वे वळणे बदलत जातात आणि निसर्ग आपले एक वळण मांडून जातो. वसुंधरेला हे वळण अप्रूप असते. यास सहनशीलतेने ती आपलेसे करते. कृतीच्या नाजूक कुंचल्याने ती या वळणावर मायेची वेलबुट्टी काढते. तिजवर हा नयनरम्य देखावा नेहमीच वळणदार झालेला असतो. पाखरांच्या स्वरांनी ती यास लय देते. नव्या पालवीखाली ती यास झाकून घेते आणि अपूर्व वात्सल्यरसात ती ओथंबून ठेवते. इथे सगळीच मुक्तता! म्हणून सैरावैरा धावणे! इथे कधीच धाप लागणार नाही की पाप आठवणार नाही. तुम्हास धीर असेल तर मोकळेपणाने तुम्ही या वळणाशी हितगुज करा. सारा निसर्ग आणि तुम्ही सायुज्य व्हाल.

अखेर मानवी जीवन तरी काय ? जीवन आणि मरण या दोन वळणांचाच लपंडाव आहे. डोळे झाकून एकाला शोधायचे तर उघड्या डोळ्यांनी दुसऱ्यास

लपवायचे. ही दोन्ही वळणे एकमेकांना पूरक आहेत म्हणून जगण्याला अर्थ. एरवी ती दोन्ही तुसडेपणाने एकटी होतात. या दोघांची झेप दोघांसह पेलणारी व एकट्यास पाडणारी.

मानवी जीवन अनंत वळणाचे एक जाळे असेल तर मानवी मरण हा एक अनंत पदरांचा गुंता आहे. दोघांच्या जंजाळात मानव अडकलेला आहे. मोठे वर्तुळ लहान वर्तुळास आपल्यात सामावून घेते तसे जीवन मरणास आपल्यात मिसळून घेते.

आकाश आणि समुद्र एक व्हावेत. पुन्हा समुद्रातून आकाश व आकाशातून समुद्र व्हावा तसेच काहीसे जीवनमरणाचे आहे. थेंबाथेंबातून सिंधू पावन व्हावा. प्रवाहातून जे आपले पात्र रुंदावते ते जीवन व किनाऱ्यालगत पोचते ते मरण. अशा वेळी ऐलतीरी व पैलतीरी सांधा जोडणारे एक वळणच असेल. ज्यावर आकाशातील इंद्रधनुष्य तोरण म्हणून बांधलेले दिसेल.

# ९ / किनारा

समुद्रकाठी क्षितिज पाहताना अलीकडे मी गांगरून जातो. सूर्यास्ताचा देखावा मनाला भीती देतो. लाटा-लाटांची चढउतार काहूर माजविते. आपण ज्या किनाऱ्यावर खडे आहोत तोच मुळी पायाखालची वाळू घसरविण्यास समर्थ ठरतो. आजवर वळणावळणाने चालताना नवा हुरूप यायचा. पावले मनाशी संवाद घालीत. आता तेच पाय किनाऱ्यावर बोलू पाहतात. क्षितिजसमांतर जाणारी नजर अंधुक होऊन अंधारी होते. स्वत:चे अस्तित्व नको तेवढे जड होते. हळुवार पंखासारखा आकाशाकडे धाव घेणारा मी स्वत:चे अस्तित्व फेकून आज किनाऱ्यावर शून्याकार झालो आहे. वर आकाश असून पाहवत नाही. दिसत नाही. समोरचा समुद्र उचंबळून देखवत नाही. अवतीभवती माझे मलाच काही जाणवत नाही. सूर्यास्त आणि चंद्रोदय ज्या नयनरम्य पापण्यांत मी एकाच वेळी साठविला त्या पापण्या आपआपल्या देठात तिष्ठत आहेत. जणू काय थेंबांचे आंदण गोठून जावे.

लहानपणी वर्गात 'जन्म' हा जोडअक्षराचा शब्द मला लिहिताना फार अवघड वाटे. या शब्दाचा अर्थ त्या वेळी कळाला, पण त्यातील सार आज जेव्हा आकळून घेतो, तेव्हा ज आणि म यांतील जनन आणि मरण यांची रस्सीखेच अधिकच ताणली जाते. इतिहासातील आनंदीबाईने ज्या धूर्ततेने 'ध' चा 'मा' केला तितक्या सहजतेने 'ज' आणि 'म' परस्परांशी छेदतील का, या प्रश्नाने मी फारच गांगरून जातो. जेव्हा जन्म अटळ असतो तेव्हा मरण अटळ असते. मानवी जीवनाच्या नाण्याच्या या दोन बाजू असूनही त्यातील मरणाची बाजू स्वत:चे नाणे खणखणीत वाजवून दाखवित नाही. जे बावनकशी

सोने वाटावे त्याचेच पितळ बाहेर पडावे व सारा सौदा फोल ठरावा या अनुभवाने मी वरचेवर हैराण होत आहे. ' जगायची पण सक्ती आहे, मरायची पण सक्ती आहे, ' या उक्तीतून मर्ढेकर मानवी जीवनाची मूलभूत भयाणता व्यक्त करतात. तेव्हा ' सक्ती ' या शब्दाचे नाते केवळ ' मरायची ' या शब्दाशी निगडित आहे व ते ' जगायची ' या शब्दाशी फटकून आहे याची साक्ष पटते. अंधाऱ्या ढगास रुपेरी किनार असते यातील मर्म आयुष्याच्या किनाऱ्यावर उभे राहून कळत नाही की दिसत नाही. अनंताची विविध रूपे अजमावताना सान्ताच्या किनाऱ्यावर सारेच धूसर व्हावे, लाटांच्या शुभ्र मंथनात डोळ्यांना काहीच दिसू नये. ऐलतीरावर उभे राहून पैलतीरावर केंद्रित व्हावे एवढेच ना!

कुसुमाग्रजांचा कोलंबस ' किनारा तुला पामराला ' या शब्दात समुद्राची निर्भर्त्सना करतो. ध्येयासक्तीने धुंद झालेले एक व्यक्तिमत्त्व - केवळ समोर पाहणे, जाणे त्याला परवडते. पण आजूबाजूला पाहणे त्यास जमत नाही. पण जो केवळ समोर पाहतो तो एकसूरी नव्हे का? एकाच दिशेने प्रवास करणारा पांथस्थ उरलेल्या दिशा जेव्हा सोडून देतो तेव्हा त्याची ' अनंत ध्येयासक्ती ' भावविवशतेने अंतर्मुखतेला पारखलेली असते. ज्याला किनारा दिसत नाही त्याला किनारा मिळत नाही, व ज्याला किनाऱ्यावर थांबता येत नाही त्याला पुढील टप्पा गाठता येत नाही. आयुष्य ही काही सातत्याने चालायची वाट नाही. काही वेळा ते मैलाचे दगड म्हणून हिशोबाचे ठिकाण होते. ऐलतीरावर उभे राहून पैलतीराकडे पाहताना समुद्र अथांग आहे याचा अंदाज कळूनही क्षितिजावरचा सूर्य विस्तारण्याचा विचार येतोच ना! ' आला किनारा ' सारखे यशोगीत गाणारे कुसुमाग्रज हेही जाणून असावेत. म्हणून मला सातत्याने दिसणारा किनारा विसाव्याचे ठिकाण किंवा मर्यादा देणारे स्थळ वाटत नसून ती एक ' चिंतनभूमी ' वाटते. अपार समुद्रात हवे तेवढे थैमान घालावे. ध्येयधुंदीने वाहवत जावे व अलगद किनाऱ्याजवळ येताना सिंहावलोकन ' पुनश्च हरि: ॐ ' करावे. एका वळणातून दुसऱ्या वळणाकडे झेप घेताना क्षणभर अजमावण्याचे ठिकाण जोपर्यंत तुम्हाला अवगत होत नाही तोपर्यंत पुढचे वळण तुम्हाला शोधता येणार नाही की चालता येणार नाही. समुद्राला जेव्हा भरती येते तेव्हा तो किनाऱ्याला आपल्या कवेत घेतो. त्याच क्षणी संथपणाची आठवण त्याला किनाऱ्याने दिली असते. अदम्य आकांक्षा जेवढी जगण्याला आवश्यक, तेवढीच तिला सामोरे जाण्याची तटस्थ तृप्ती महत्त्वाची. जी धावून मिळत नाही, थांबून मिळते. पूर्णविराम जीवनाची गती थांबवेल, तर स्वल्पविराम

त्याच गतीची इतिकर्तव्यता तुमच्या कक्षेत आणून देईल. असे कितीतरी 'स्वल्पविराम' किनाऱ्यागणिक तुम्हाला हाताशी आलेले दिसतील.

तांब्यांची महाप्रस्थानपर गीते वाचताना, अभ्यासताना 'लागले नेत्र रे पैलतिरी' एवढाच मंत्र तुम्हा आम्हाला हलवून जागे करतो. तांब्यांना आपल्या आजारात मृत्यूची चाहूल लागली एवढं निमित्त पुरे झाले, पण या अभिजात कलावंताने महाप्रस्थानास 'आव्हानशृंग' फुंकले. यानंतर तांबे वीस वर्ष जगले. या जगण्यात 'सक्ती' नव्हती, तर एक वेगळी 'थ्रिल' होती. परिपक्व फळ त्यांना गोडी देऊन गेले, ज्यामुळे सारा जीवनरस ओथंबून स्रवत होते. तांबे ऐलतीरावर चिंतनमग्न होऊन पाहते झाले म्हणून पैलतीरावरचे 'सुंदर ते ध्यान' त्यांनी आवडीने पाहिले. तीरावर उभे राहणे किंवा किनाऱ्यावर थांबणे साऱ्यांच्याच वाट्याला येते. किंबहुना किनारा सर्वांनाच अवगत होतो. पण किनारा मात्र थोड्यांनाच अजमावता येतो. सहजतेने क्षितिज पाहावे व ताकदीने ते विस्तारावे लागते. म्हणूनच समुद्राचा किनारा त्यास नेहमीच लखलाभ असतो. स्वतःस तपासण्यासाठी. इतरांना मोजपट्टी देण्यासाठी. याच मोजपट्टीने तांब्यांनी आपली महाप्रस्थानपर गीते पुन्हा पुन्हा तपासून लिहिली. त्यात जीवनाचा अर्क ओतला. सान्ताकडून अनंताकडे धाव घेताना 'खरे घर ते' स्वतःच्या दृष्टिक्षेपात घेतले. तांबे स्वतःच्या किनाऱ्यावर ना येते, ना थांबते तर आपण कितीतरी अजरामर कलाकृती हरवून बसतो. जीव आणि शिव यातील ऐक्य ज्या आत्मपरीक्षणांतून तुम्हाआम्हास आकळते ते किनाऱ्याशिवाय मिळणे कठीण आहे. साऱ्या संतांनी 'दर्पणी पाहता रूप न दिसे वो आपुले' अशी जी स्वतःची अवस्था करून घेतली त्या आयुष्याला शेवटी किनारा हा असतो. या आविर्भावातूनच. आणि सायुज्यतेचे श्रेय जे 'संचिताचा ठेवा' म्हणून स्वीकारले, तेही पैलतीराला स्वतःच्या कक्षेत घेऊन. 'चिंता करितो विश्वाची' हा ध्यास रामदासांना किनाऱ्यालगत लागला व 'म्हणुनि कळवळा येतो मना' या भूमिकेतून रात्रंदिवस युद्धभूमीस संमुख जाणारे तुकारामांचे मन चिंतनमग्न झाले तेही धवल अशा किनाऱ्यावरच. शुचिर्भूत मनाने निर्गुणास पाहावे अन् चिंतनशील पावित्र्य हेरावे या दोहोंचा सुवर्णमध्य किनाऱ्यावर दिसावा यासारखे दुसरे भाग्य नाही.

वसंतऋतूची नवी पालवी मृत्यूमुळे अंगास येते, असे असूनही 'मना वृथा का भीश मरणा' असा धीर कळताक्षणी वळविता येत नाही. 'दार सुखाचे ते हरि करुणा' हा टप्पा जेव्हा किनाऱ्याच्या रूपाने आपल्याजवळ येतो तेव्हा या वसंताची पालवी जाणवू लागते. उन्हाळ्याची रखरख

जाणवल्याशिवाय पावसाळ्यातील हिरवळ आल्हाद देऊ शकत नाही, किंवा हिवाळ्याचा थंड गारवा सुखद करीत नाही. हे तिन्ही ऋतू आपआपल्या किनाऱ्यांनी एकमेकांस जखडलेले आहेत. एकातून दुसऱ्यात व दुसऱ्यातून तिसऱ्यात पाहताना पहिला आणि तिसरा ऐलतीर व पैलतीर व्हावा व द्वैतातून अद्वैताकडे जावे, ही देखील किनाऱ्याची उतराईच आहे. का? तर जो जगतो तोच मरतो. व मरणामुळेच जगणे परवडते, या वैचारिक पातळीवर किनारा तरंगत असतो. सारा वेदान्त शब्दच्छल करून पिंजता येईल. शुष्क अर्थाचे बुडबुडे त्यातून विरघळत जाताना दिसतील. ज़शा समुद्राच्या लाटा किनाऱ्याशी पिंगा घालू पाहतात, येतात, जातात; अंतर्मुख होऊन पुन्हा समुद्रमय होतात. तुम्ही-आम्हीदेखील अशाच अधिकाराने जगावे आणि शेवटी समुद्रात थोडा वेळ उभे राहून दोन्ही हात पसरून किनाऱ्याला हा 'अधिकार' आंदण म्हणून मागावा. अनंत रूपे अजमावून पाहणारा किनारा 'देता किती घेशिल दो कराने' या थाटात तुमचा पाठिराखा होईल. अर्थहीन जगणे मरणामुळे अर्थवाही बनेल व किनाऱ्यावरून अर्थापलीकडचा शोध घेईल.

जगण्याला अंत आहे व समुद्राला क़िनारा आहे, एवढेच तत्त्व विश्वाच्या बुडाशी सत्य म्हणून चपखल बसले आहे.

सारी पृथ्वी गोल असून जरी गतिमान असेल तर तिचा केंद्रबिंदू किनाऱ्यालगतच स्थायी होणारा आहे. असे कितीतरी पांथस्थ या किनाऱ्यावर येतात, येतील. कोणास किनारा विसावा वाटेल, कोणास तो विश्वाचा पसारा वाटेल. उसासा आणि दिलासा देणारा तो प्रपंचही वाटेल. चालताना हुरूप यावा म्हणून तो विरंगुळाही वाटेल. समुद्रातील पाण्यास जो रंग देता येईल त्याचे बिंब हमखास किनाऱ्यावर उमटलेले दिसेल. आणि आजवर जी तुम्हाला मिळाली नाही, जी तुम्ही शोधत आहात ती वस्तू येथे तुम्हाला सापडेल. 'परि तू जागा चुकलासि' याची जाण जेव्हा तुम्हास कळेल तेव्हा तुमची नजर जवळच्या किनाऱ्याकडे वळेल आणि याच भेदक नजरेतून तुम्ही समुद्रात पर्यायाने तुमच्यात डोकावू शकाल. या क्षणी तुमचे डोळे तृप्त होतील. कानास ध्वनीतून प्रतिध्वनीची वलये पाचारण करतील व क्षणात तुमच्यासह सारी इंद्रिये किनाऱ्याकडे झेप घेतील. वर आकाश चांदण्यातून स्वच्छ पाहावे. असंख्य तारकांचा क्रीडाविभाग तळपून जावा. याच आकाशाने सोनेरी किनाऱ्यासह खाली समुद्रास आंदण द्यावे. अवतीभवती अशा वेळी किनारा, किनाऱ्यावर पंखपिसारा विसावा घेतेवेळी सारा आसमंत एका मंत्रमुग्ध देखाव्याने पुन्हा

किनाऱ्याप्रत यावा. अशा वेळी मला अडलेला ‘जन्म’ हा शब्द आपला अर्थवाही प्रवाह उकलून देतो. आज मी चिंतामग्न आहे. माझी पावले माझ्या किनाऱ्यालगत जात आहेत. उद्या जर मला चिंतनशील व्हायचे असेल तर किनारा हाच पर्याय आहे. म्हणून आयुष्याचा सुखान्त शेवट किनाऱ्याचे ऋण मानण्यातच आहे.

# १० / अंधार

शब्द जेव्हा मावळून जातात तेव्हा अंधाराचे राज्य वैभवावर चढू लागते. क्षितिजावरची सारी किरणे विस्तारली जाऊन अंधारसागरात एकामागून एक क्रमश: विसावली जातात. अंधार आणि प्रकाश यांचे लपंडावाचे नाते. यावेळी सारा प्रकाश अंधारमय होऊन स्वत:च्या अस्तित्वास अलगदपणे सुपूर्द करतो. आपल्या राजसत्तेची हुकूमत साऱ्या भूतलावर अंधार पावलाने चालावी. या आविर्भावात सारी अधिकारसूत्रे अंधाराने एखाद्या जाळ्याप्रमाणे फेकावीत आणि बिचाऱ्या दिवसाने गुपचूप रात्रीच्या शिकारीला बळी पडावे हीच अंधाराची फुशारकी ! नक्षत्राशी अंधाराचे नाते रक्ताने बांधले जाते, याची सुजाण शशिराजास अवगत असल्यामुळे की काय, बिचारा काळ्या वैभवास फशी पडून अडकला जातो व स्वत:च्या रुपेरी वैभवाचे आंदण राजरोसपणे अंधाराकडे गहाण ठेवतो. पौर्णिमा अमावास्येच्या नजरकैदेत यावी आणि आपल्या दाट चांदण्याची क्षणात काजळी किमया व्हावी, एवढेच आज शिल्लक उरले आहे.

लहानपणी आई मला दिवेलागण झाली की बागुलबुवाची भीती दाखवून घरात कोंडून घ्यायची. मला नेहमी बाहेरच्या अंधाराचे कुतूहल वाटायचे. चार भिंतींच्या आत कधीच न मावणारा अंधार साऱ्या आकाशात कसा गच्च भरून असेल याचा अंदाज मला येत नसे. माझे निरागस मन बागुलबुवास कधीच भिणारे नाही. उलट या भीतीपोटी आपण 'पंखातला काळोख' पाहण्यास मात्र मुकलो याचे शल्य घायाळ करणारे आहे. वडिलधारी मंडळी झोपली की, मी हळूच चोरपावलाने दाराच्या फटीतून अंधाराकडे नजर द्यावी व आपल्या नाजूक संकेताने त्यास जवळ करून घ्यावे. ' अंधेरी नगरी चौपट राजा ' यामधील

राजबिंडा वृत्तीचा माझा 'राजा' मला नेहमीच लखलाभ आहे. कारण त्याची 'नगरी' त्या केवळ अंधाराने मन:पूतं समाचरेत् होते. त्याचे कौतुक करण्यास माझ्याजवळ प्रतिभा नाही. लोकशाही वृत्तीतून कोणीही या नगरीत यावे व अंधाराच्या अफाट प्रवाहात आपली चिमुकली ओंजळ अर्घ्य म्हणून सांडावी. स्वयंभू गगनी नाथ मुक्तहस्ते तुम्हाला आशीर्वाद देण्यास मागेपुढे पाहणार नाही. काळोख पिंजणे यातील खरी जादू येथेच अनुभवावयास मिळेल.

वसुंधरा जेव्हा काळी चंद्रकळा परिधान करते तेव्हा तिचे अंगभूत सौंदर्य अभिजात प्रतिभेच्या सीमा ओलांडून आरपार गेलेले असते. तिच्या सहनशीलतेतून हाच अंधार कर्तव्यपूर्तीचा ब्रह्मानंद लुटत असतो. तिच्या गतिमानतेचे चक्र सातत्याने अंधाराभोवतीच अडखळत जाते. आणि उरला सुरला काळ ज्योतीभोवती असलेल्या काजळीने 'प्रज्वलितो ज्ञानमय: प्रदीप:' या थाटात झेप घेतो. 'कृष्णाकाठी कुंडल' या गडकऱ्यांच्या काव्याची अपूर्णता केवळ या अंधारी जादूने मधल्याच टप्प्यावर रेंगाळत ठेवली. केशवसुतांचा सच्चा चेला 'शब्दसृष्टीचे ईश्वरा' पर्यंत पोहोचला. तोही या अंधाराच्या बळावरच. प्रतिभा ही मोठी लहरी असते. याचा शोध याच अंधारकिमयेने आपल्यापर्यंत आणून सोडला. आणि आपले नवे नवे उन्मेषही अंधाराच्या पाकळी पाकळीतून आंधळ्या भक्तीने ओथंबून काढले. कलावंत आगळावेगळा अंधार पोचवून आपला साहित्यप्रवाह धो धो सोडीत साऱ्या प्रकाशावर मात करतात. समुद्रात जेव्हा अंधाराच्या लाटा उंचावर झेप घेतात तेव्हा वरचे आकाश रत्नाकराला आलिंगन देण्यासाठी खाली लवून साळसूदपणे बगळ्याप्रमाणे आपल्या समाधिविश्वात एकएक लाट सामावून घेते. समुद्रात आकाशाचे प्रतिबिंब आजवर मी अनेकदा पाहिले. पण आकाशच जेव्हा समुद्रास आपल्या कुशीत घेऊन जाते तेव्हा त्याची रेशमी माया 'डोळस' होऊन कळेल काय ! तुकारामाची नेहमीची खंत 'आम्हासी डोळे दृष्टी नाही' या वृत्तीची. वस्तुत: अंतर्भेदी दृष्टीऐवजी अंतश्चक्षूतील अंधार आपल्या पापण्याखाली मोलाचे भांडवल म्हणून साठवून ठेवणे, हेदेखील येरागबाळ्याचे काम नाही. मिल्टन आंधळा होता म्हणून एका अप्रतिम काव्याचा जन्मदाता झाला, किंबहुना इतर कवींना जे जमू शकणार नाही ते नेमके चुटकीत त्याने वाजवून दाखविले. त्याही पलीकडे मला मिल्टनचा अभिमान एवढ्यासाठी वाटतो की, काठोकाठ भरलेला अंधाराचा प्याला तो मीराच्या भक्तीने ओठात उतरवू शकला म्हणून 'लॉस्ट' झालेल्या 'पॅरडॉईज' चे त्यास आकलन झाले. अन् बालकवींच्या नादब्रह्माचे वळण

देखील अंधार खळाळत होते, यापलीकडे जाणारे नव्हतेच ना!

काळोखातली रजनी आणि रजनीतला काळोख यांनी माझे काळीज केव्हाच आपलेसे केले आहे. सूर्यास्तानंतर हळूहळू नीलांबरात अवतरणाऱ्या काळोखाने मानवाच्या एकदम काळजाशीच सूर जमवावा यातच त्याचे सामर्थ्य आणि कौशल्य अपूर्व वाटते. अंधाऱ्या पावलाने चोरी करताना देखील पुरुषार्थाची अभिमानी नाव आठवावीच. काळोख पिंजून शेवटी काळोखच हाती येतो, हे शहाणपण कळायला देखील अंधाराशी कंपायमान होण्यावाचून गत्यंतर नाही. धुंदावलेल्या रजनीचा गंध असलेला हा अंधार, रातराणीच्या कळीचे फूल झालेला हा अंधार, आपला सारा आसमंत जेव्हा पुलकित करू पाहतो, तेव्हा नंदनवनाच्या झोपाळ्यावर पहुडलेली रजनीगंधा वाऱ्याच्या मस्त स्पर्शाने पृथ्वीतलावरील अंधाराचा घोट आपल्या धुंदीत घेऊन जाते आणि माझ्या - पुढील सारी अंधारक्षितिजे एकजात विस्तारली जातात. क्षितिजवेडे झालेले मन पुन: एकदा क्षितिजाकडे डोळे लावून पाहते आणि मिटल्या पाकळीने सारा काळोख आतल्याआत तुडुंब करते. प्रकाशाशी वैर करण्याची मला छाती नाही. पण अंधार वगळून प्रकाशास जवळ बाळगण्याचे मला धैर्यही नाही. एका डोळ्याने अंधार व दुसऱ्याने प्रकाश पाहता आला असता तर! पण पुढ्यात असलेला अथांग अंधारच जेथे दोन्ही डोळ्यांनी टिपता येणे कठीण तेथे एकाची काय गत ? समुद्रमंथनातून प्रथम अंधाराच्या लाटांवर लाटा उधळल्या गेल्या आणि त्यातून अमृताचे तुषार कारंजाप्रमाणे उंचावत आकाशाकडे धाव घेऊ लागले, जणू पुन: काळोखाशी एकरूप होण्यासाठी. हलाहल पचविणाऱ्या नीलकंठाची सारी ही अंधारकिमया आहे.

अंधार आणि दु:ख ही जुळी भावंडे एकाच मातृत्वातून ओथंबलेली. दु:खाला सामोरे जाणे आणि अंधारास मुठीत कुस्करणे ही एक जगण्याची कृतार्थ कमाई आहे. रापलेला काळोख जेव्हा 'आवडीने भावे' आपलासा होतो तेव्हा पिंजलेले दु:ख काळजापर्यंत भिडते. वरचे आकाश जेव्हा कोसळते तेव्हा त्यास पेलण्यासाठी त्यातील एकमेव काळोखच ताकद देतो. आपल्या घरट्यात मिटल्या पंखातून आकाश पाहणे वेगळे आणि पापण्यांनी भरून आलेले आकाश विस्तारणे वेगळे. वस्तुत: या दोन्ही क्रिया एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. पण यांना सांधणाऱ्या काळोखाने तो एक बंदा रुपया झाला आहे. आपल्या आयुष्यात त्याला तुम्ही कितीही वाजवा, त्याची मोड म्हणून अपुरी पडणार नाही. महाभारतातील धृतराष्ट्र आणि गांधारी याच काळोखाने

एकमेकास जखडली होती. म्हणूनच या उभयतांना व्यासांची प्रतिभा शब्दापलीकडे ठेवू शकली. किंबहुना महाभारतातून हा काळोख वजा करा, बाकी केवळ शून्य उरेल. द्रौपदी याच काळोखाची केंद्रबिंदू होती म्हणून तिने व्यासांच्या प्रतिभेस भुरळ पाडली आणि 'तिमिरातून तिमिराकडे' चा आदर्श सिद्धांत आपल्यासाठी हातचा राखून ठेवला. धरणीमातेचे अंधाराशी नाते जडले म्हणून मानवी जीवनाचा प्रवाह धो धो वाहणारा झाला. अंधाऱ्या स्वायीभावातून किती म्हणून रसांचा् परिपाक करावा? फक्त रसिकतेने काळोख आपलासा करता यायला हवा, एवढेच!

आयुष्याच्या भरल्या बाजारात काळोखाचा सौदा चुकून करू नका. कारण अंधार ही काही चव्हाटचावर मांडण्याची वस्तू नाही. माकडाने आपले पिल्लू पोटाशी धरावे तसा हा अंधार तुमच्या भावजीवनाचा अतूट धागा आहे. कस्तुरीमृगाच्या सुगंधाने त्याला उमजावे लागते. नाजूक पाकळीने त्यास हुंगावे लागते. वज्रासारखी ताकद अंगी आणून मऊ मेणाच्या हृदयात त्याला बंद करावे लागते. रोजच्या रोज आत डोकावून तो सहीसलामत आहे का याची खात्री करून घ्यावी. जगण्याची इतिकर्तव्यता मरणाकडे जाताना नेमक्या हातचलाखीने त्यास अंतिम क्षणापर्यंत अंगभूत ठेवावे. जणू काय तो कर्णाची कवचकुंडले आहेत. येथे देखील आपले दातृत्व कर्णासारखे नसावे. कवचकुंडले सूर्यापासून साधनेने प्राप्त झालेली व काळोख सूर्याशी हाडवैर करणारा, एका परी प्रतिस्पर्धीच. दोघेही स्वयंभू व तेजस्वी. त्यातही पुन्हा एकाच आकाशात आपल्या वैभवाने तळपणारे राजाधिराज. तरीसुद्धा अतितेजाने कधी कधी डोळ्यांना अंधारी यावी आणि तेजापोटी शेवटी काळोखच दिसावा, यातच मला काळोखाचा अपूर्व विजय दिसतो.

ते पहा! बाहेर आकाश भरून आले आहे. चंद्र नभीचा ढळला आहे. क्षितिज किनाऱ्यापल्याड गेले आहे. सारे कसे अंधारून आले आहे. माझ्या थेंबात केव्हाच वरचे आकाश आले अन् अंगचा अंधार पिंजून गेले. अंधाराशी जडले नाते!

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
नोंद ३.५.०८
दा. क्र. २६६८९
९१५८२

# ११ / पानझड

माझ्या घराच्या अंगणात एक लिंबाचे झाड आहे. मी रोज सकाळी या झाडाखाली उभा राहतो. मला सारी पाने गळालेली दिसतात. ओंजळभर पाचोळा मी दररोज बाजूला सारतो. पुन्हा पुन्हा ओंजळीने पाचोळा फेकण्याचे माझे कार्य नित्यनियमाचे झाले. काल माझी या वृक्षाकडे वर नजर गेली. सारा वृक्ष वठलेला, सुनसुना दिसला. असे का ? वसंतऋतूला सामोरे जाण्यासाठी जीर्ण काया निर्मूलन करून नव्या वैभवाचे आंदण या वृक्षराजास हवे असते. नागाप्रमाणे जुनी कात फेकून नवी परिधान करण्याचाच हा प्रकार आहे. वृक्ष नव्या सृष्टीत प्रतिवर्षास याच नियमाने मार्गक्रमण करीत असतो. पाचोळ्याच्या जागी नवी पालवी येणे व पुन्हा नव्या पालवीचा पाचोळा होणे, हा नित्यक्रम लिंबाचे झाड, 'पडिले वळण इंद्रिया सकळा' या वृत्तीतून आखीत असते. लिंबाची ही पतझड म्हणूनच मला नव्या जीवनाची स्वागतपूर्ण नांदी वाटते.

ह्या पानझडीतून अखेर तुम्ही आम्ही हाताशी काही घेऊ का ? माणसाचे जगणे असेच लिंबाच्या झाडासारखे असल्यास या पानझडीचे तुम्ही आम्ही मनमोकळेपणाने स्वागत करावे का ? माझे आजचे जगणे जर या पानझडीच्या स्वरूपाचे असेल तर मला आपल्या ओंजळीत असलेल्या पाचोळ्याचे स्वरूप समजले पाहिजे. आमच्या जगण्याच्या ज्या विविध अवस्था आहेत त्यांचा क्रम आखलेल्या मार्गाने नियमित जाणारा आहे. पण या विविध अवस्थांचा स्तर नेहमीच कुठेतरी घसरलेला असतो. आम्ही उंचावलो आहोत याची जाणीव होते न होते तोच आमचे घसरणे चालू राहते. लिंबाचा वृक्ष आपल्याच तालात आपल्याप्रमाणे जगण्यातील चढ-उतार उपभोगू शकतो. परंतु आमचे भागणे

मात्र कोणाच्या तरी आधीन असते. इंद्रिये आमची, फक्त ती इतरांच्या क्रियांचे अनुकरण करतात. एका अर्थाने आमची सततची पानझड चालते तिला जणू नव्या पालवीचा दिमाख नाहीच. वठलेल्या झाडाचे नव्याने आलेले चैतन्य जेव्हा दृष्टीस नयनरम्य वाटते तेव्हा आम्हाला आमचे जीर्णत्व नको तेवढे बोचते. सातत्याने चाललेली पानझड आज नको तेवढी अंतर्मुख करणारी आहे.

आयुष्याला वर्तमान काळाशी नेहमीच संघर्ष द्यावा लागतो, परंतु गेलेल्या भूतकाळाच्या हुरूपातून त्याचे समरप्रसंग दिव्य ठिणगीतून तेजस्वी झालेले असतात. या जगण्याचा भावार्थ जेव्हा भविष्याचे कोडे उलगडू पाहतो तेव्हा या दोन्ही काळांची बेरीज या भविष्याशी लागेबांधे बांधते. माझे घोडे नेमके याच तत्त्वाशी आज अडू लागले आहे. माझ्या दिव्य आणि भव्य इतिहासाची परंपरा जेव्हा वर्तमानाशी सांधा जुळवू पाहते तेव्हा आमची होत असलेली पानझड भविष्याच्या दालनाने नव्या पालवीचे आव्हान स्वीकारीत नाही. किंबहुना आमची पानझड तिन्ही काळांच्या उदरातून एकाच क्रमाने वाटचाल करीत असल्याने तिला वळणावळणाचे ध्येय नसून केवळ धोपटशाहीचा मार्गच पुढे आहे. मर्ढेकरांनी एका कवितेत ‘ जे ना जन्मले मेले ’ अशी माणसाची स्थिती वर्णन केली आहे. अगदी तसेच. जो खऱ्या अर्थाने जन्मतो त्याला मरणाकडे धाव घेताना धुंदी येते. आणि जन्म-मरणाच्या दोन टोकांतच जगण्याची हिम्मत असते. जन्मतानाची पालवी आणि मरतानाची पानझड ह्या क्रिया परस्परांस पूरक आहेत. ह्या दोन्ही क्रियांनी मानव जीवन जगण्याचे वेड घेत असतो. आज जे मला असह्य होते त्यातून जर उद्या सुसह्य मिळणार असेल तर मला अगतिकतेचे भय वाटत नाही. पण असह्याच्या भोवऱ्यात जगण्याची सारी इतिकर्तव्यता होत असेल तर पानझडीतून पालवीकडे झुकणारा लिंब तुम्हा-आम्हापेक्षा कडवट असूनही माधुर्याचे जीवन जगणार असेल. जगण्याचे एवढे अवमूलन यापूर्वी कधी झाले होते का ? सृष्टीची पानझड ‘ नेमेचि येतो मग पावसाळा ’ या पद्धतीची असते. उन्हाळ्याच्या तीव्र दाहकतेत पावसाळ्याचा धो धो वर्षा साचलेला असतो. हे सारे मला प्रकृतिमातेच्या नव्या नव्या उन्मेषात दिसू लागते. फक्त मानवी जीवनाच्या संदर्भात याचा अर्थ मात्र उमजू शकत नाही.

मला वारंवार क्षितिजे धुंडाळण्याची खोड आहे. ‘ क्षितिज विस्तारित जीर्ण ’ या कविकल्पनेचा मला अलीकडे नको तेवढा तिटकारा येत आहे. आकाशातील उंच झेप घेऊ पाहणारी हिरवे राने माझ्या वृत्तीस नवा हुरूप

देत नाहीत. घरच्या पिंजऱ्यात अडकलेला पोपट मी जेव्हा पाहू लागतो तेव्हा मला जगण्याची किमया त्याच्या वृत्तीशी घट्ट बांधून ठेवावी लागते. असाच मी परवा एक स्वच्छ पिंजऱ्यातील हिरवागार पोपट पाहिला. त्याला क्षणभर पिंजऱ्याबाहेर काढले. त्याच्या उबदार पंखातून त्याला गोंजारले. अंगणात त्याच्याशी गप्पा करीत करीत हळूच ओंजळीत घेऊन वर सोडले. तो पुन्हा उपडा होऊन खाली पडू लागला. मी पुन्हा त्याला उडवू पाहतो तो काय, तो पुन्हा खालीच यायचा. माधव ज्यूलियनच्या 'मुक्त पक्षी' ह्या कवितेतील तर हा नव्हे ना? लगेच माझे मन मला सांगू लागले, पोपटाच्या पंखाची पडझड होण्याची वेळ आली असेल. परंतु त्याचे उबदार पंख मला हाताशी मऊ लागत होते. मग ही पंख असलेली पडझड? स्वतःच्या पंखांना आपली मूलभूत क्रियाच जेथे विसरण्याची सवय लागते तेव्हा पोपटाचा 'पिंजरा' हा स्थायीभाव बनतो आणि पिंजऱ्यातील 'पोपट' उडण्याच्या भावनेशी गतिशून्य होतो. झाडाची पानझड पुन्हा नवे जीवन स्वीकारते. नव्या पालवीचा दिमाख बाळगण्यासाठी वठणेपण अंगी मुरावे लागते. पण ज्या पोपटाला पंखाचा उबदार पिसारा असूनही उडण्यावाचून अडकणे सोयीस्कर पडते तेथे 'कालाय तस्मै नमः' या सुभाषिताची आठवण होते. आकाश जसे स्वच्छ चांदण्यासाठी आणि दिलदार चंद्राच्या रुपेरी वैभवासाठी मुक्तदार आहे तद्वतच ते उंच भरारी घेणाऱ्या पक्षांच्या स्वागतासाठी आतुरही आहे. पण या दारातून नेहमी प्रवेश झाला पाहिजे ना! पंढरीच्या विठोबाचे मंदिर सर्वांसाठी सर्वकाळ खुले ठेवावे आणि दर्शनोत्सुकांनी मात्र अडसर म्हणून दूरस्थ राहून त्याचे 'सुंदर ते ध्यान' पाहावे. परंपरेच्या श्रद्धाळू मुळ्या एवढ्या खोलवर रुतल्याने येथे कसलीच पानझड होत नाही. म्हणूनच की काय नित्यनूतन आम्हाला केव्हाच गवसत नाही. आम्ही कागदोपत्री 'काळे' झालो आहोत, परंतु त्यातून 'पांढरेपण' मूलतःच हरवल्याने सारे कसे 'कोरे'च वाटते. निसर्गसौंदर्यातून आकाशाला कवेत घेणारी पाखरे ही माणसाळली याचे आम्हाला भूषण वाटते, पण त्यामुळे ती आपल्या पंखसामर्थ्यास मुकली याचे पाप कसे जाईल?

आणि म्हणूनच की काय, पंखवेड्या पण पंख झडलेल्या पोपटाशी मला आताशी मैत्री करावी वाटते. पिंजऱ्यातला पोपट केवळ पोपटपंची करतो म्हणून तो आपला नाही. तो वेगळ्या अर्थाने आपल्याशी हृदय-संवाद घेऊ पाहतो म्हणून जिवलग आहे. दोन जीवश्च कंठश्च मित्र स्वतःच्या हितचिंतनातून काय बरे साधणार? स्वार्थवेड्या माणसाने पंखवेड्या पोपटापासून घ्यावे तरी

काय ? दोन वृत्तीतील सुख परस्परांस कधीच आकर्षू शकत नाही. तेवढे दुःख एकमेकांचे सख्यत्व सांधू शकते. पोपटाचे पंख असूनही जेव्हा ते मला झडलेले दिसतात तेव्हा मी कंपायमान होऊन स्वतःची जाण अधिक ताणून आपले समाधान करून घेतो. साने गुरुजींची 'धडपडणारी मुले' नेहमीच धडपडत होती म्हणून गुरुजींना त्यांचा अभिमान वाटत असे. आज गुरुजी जिवंत असते तर 'पडझड' झालेली मुले पाहून त्यांना मरणापलीकडचे प्रायश्चित्त घ्यावे लागते. किमान गुरुजींजवळ प्रायश्चित्त घेण्याची ताकद तरी होती. तुम्ही आम्ही 'ताका'वर जगणारी माणसे कसली म्हणून ताकद घेणार ? आयुष्यात जगणे आणि मरणे हीच मुळी दोन क्षितिजे आहेत. या दोघांना विस्तारीत जाणे यालाच जीवन नाव द्यायचे असेल तर या दोहोंतील अंतर 'पानझडी' तून नव्या हुरूपाने निर्माण केले पाहिजे, पण या विचारमंथनाचे स्वरूप तरी काय ? जेथे विचार-विचारांचे काहूर आहे तिथेच मंथनाची क्रिया असते. म्हणूनच मला पुन्हा-पुन्हा उन्हातला अंगणातला लिंब डोळ्यांत सलताना दिसतो. लिंबाला पाने असतात. नव्याने येतात म्हणून त्यांची पानझड स्वागतार्ह वाटते. जिथे पानझडीची सातत्याने एकमेव क्रियाच चालू असते त्या पामराची पडझड दैनंदिन शोकांतिकेकडे झुकल्यास नवल काय ?

भारतीय संस्कृतीत लिंबाच्या नव्या पालवीचे स्वागत गुढीपाडव्यास केले जाते. माझा पानझड झालेला लिंब मला या दिवशी आदर्श वाटल्यास माझ्या ओंजळीत तसे एकेकाळी साठलेली पाचोळासमान पाने हवेबरोबर उडताना, पक्ष्याच्या पंखातील उपजत क्रियेचे बळ आमच्या पडझडीतील चंचलतेस आंदण देतील काय ? तरी मला तुमची-आमची प्राणिसृष्टी दृष्टीसमोर काही देऊ शकत नाही. म्हणूनच लिंबाची होत असलेली रोजची पानझड मला मोलाची वाटते.

# १२ / आकाश

आज आकाश थेंबात उतरले आहे. डोळ्यांतील बाहुल्यांशी त्याचे नाते दृढ झाले आहे. पापण्यांच्या किनाऱ्यावर ते तरंगू पाहत आहे. मोरपंखी पावलाने ते आले व कळत नकळत आपला प्रयास सांगून गेले. आसवांत सामावून घेण्याचा त्याला केवढा सोस! प्रथम त्याने थेंबात स्वत:चे प्रतिबिंब पाहिले; त्याला आपलेसे केले. नंतर त्यात ते विरघळून गेले. आपला आंदण म्हणून घेतलेला अंधार आसवांत मिसळताना अंतर्बाह्य ते ढवळून आले. किंबहुना अंधाराच्या लाटांनीच त्याने आपले कृष्णकमळ येथे मिटवून घेतले. अशा वेळी पापणीकडेवर तरंगणारा थेंब आकाशाशी नाते जोडत जातो.

आपले नाते नक्षत्राशी जोडताना आकाशास आचपेच राहात नाही. पौर्णिमेचा चंद्र प्रथम मुक्तहस्ते आपले चांदणे आकाशाला बहाल करतो, व नंतर त्याचा नजराणा वसुंधरेकडे येतो. वेलबुट्टीच्या वस्त्रावर होत असलेला लपंडाव आकाश मुग्धपणे टिपून घेते. जणू ती त्याची आत्मक्रीडाच असते. अशा वेळी चंद्राला सामोरे जाताना त्यालाच उधाण-भरती यावी. त्याची ही आत्ममग्न वृत्तीच पुढे अंतर्मुखतेला शरण जाणारी होते. निरागसता आणि परिपक्वता या दोन्ही पैलूंतून ते एकाच वेळी लुप्त आणि अलिप्त झालेले असते. कृष्णपक्ष आणि शुक्लपक्ष ही रूपे त्याचीच; पण कलेकलेने चंद्राचे स्वागत करताना त्याने दाखवलेले औदार्य व त्याच कलेकलेने अस्तंग होतेवेळी त्याची होत असलेली तगमग, त्याच्या उन्मादाचे दोन मानबिंदू आहेत. मुक्त अशा डोळ्यांनी समुद्राची भरती पाहताना जेवढी त्याच्याजवळ अलिप्तता असावी, तेवढीच ते चंद्रिकेशी समरसता देते. आपला कार्यभाग संवेदनक्षमतेने टिपावा व

राजहंसवृत्तीने जगाकडे नजर द्यावी, एवढीच त्याची धारणा असते.

अंधाराच्या लाटा उंचात उडताना आकाश धीरगंभीर होते. अशा प्रसंगी ते आपल्या रक्तात नक्षत्राचे नाते भिडवून घेते. आपल्या साऱ्या शरीराचे कारंजे व्हावे व नक्षत्रांकडून मौक्तिकाचे लावण्य घेऊन सारा आसमंत रुपेरी कणांनी उजळून सोडावा ही त्याची ओढ. सारा अंधार पिऊन प्रकाश पाझरताना हलाहल आणि अमृत त्याने पचवलेले असते. अमृताची अक्षयवृत्ती व हलाहलाची विषबाधा आलटूनपालटून स्वीकारताना ते तितकेच धीरगंभीर व उतावळे झालेले असते. नक्षत्रांशी हितगुज करीत मेघालयातून मुसमुसलेला अंधार मुक्तहस्ते उधळीत ते येते. चांदण्याचे मुलायम स्वप्न पाहात किर्र रात्री आत्ममग्नतेचा उसासा देत भल्या पहाटे साखरझोपेतून अरुणाचलाकडे डोकावून बघते. त्याला हे सौंदर्यशोधनातून झालेले सौंदर्यदर्शन अप्रूप वाटावे असेच असते. पुन्हा सौंदर्यपिपासू वृत्तीने हे दर्शन त्याच्या ठायी असलेली नवनवोन्मेषशालिनी प्रतिभा जागृत करून जातेच.

आकाशाच्या सीमा जेव्हा रुंदावतात तेव्हा क्षितिजे बांधावर आलेले असतात. एकाच वेळी क्षितिजविस्तार आणि आकाशविस्तार पाहताना अगम्य वाटते. दोघे परस्परांना कोडे घालतात. ते स्वत: उकलत बसतात. त्या एकमेकांचे प्रश्न, एकमेकांची उत्तरे असतात. येथे आकाश अंधारून येताना क्षितिजसमांतर असते, व क्षितिजभार हलका होताना आपले डोळे आकाशाकडे लागलेले असतात. जड अंत:करण व हलकी पावले चालावीत ती आकाशानेच. क्षितिजाकडे गती व स्वत:कडे प्रगती या दुहेरी चालीतून ते अश्रूंशी नाते जोडत असते. आपल्या सीमा रुंदावत, अदृश्य करत त्याला उधाण यावे व क्षणात ओहोटी यावी असे ते चांचल्य असते. केवळ ते आकाशाने घ्यावे, आपलेसे करावे. बांधावरची क्षितिजे पाहताना संकेतमग्न आकाश कितीतरी वाकलेले असते. आपला आकृतिबंध क्षितिजाकडे पाहताना ते बहाल करते. आणि प्रसंगी कितीतरी क्षितिजे आपल्यात सामावून घेते. त्याचे हे देणे उधळ्या वृत्तीचा ठपका, व त्याचे घेणे उदार मनोवृत्तीतील शालीनता.

मला आकाश हा एक विरंगुळा आहे. त्रिविध तापाची बांधिलकी जेव्हा मी स्वीकारली, तेव्हाच आकाशाशी विसावा बांधून घेतला. लहानपणी गच्चीवर चांदण्या मोजताना मला हे आकाश त्या कधीच मोजू देत नसे. विजेचा गडगडाट पाहताना उजळून आलेले आकाश माझे एक मनोधैर्य झाले आहे. आकाश काळवटून आले असे मी कधीच पाहत नाही; उलट त्यातील काळोख अलगदपणे

घेताना मी माझा राहतच नाही. जणू काय अंधाराशी नाते जोडताना आकाश आणि मी एकमेकांचेच असतो. चांदण्याचे आकाश त्यातील औदार्याने अतीत होते तेवढे ते अंधाराने व्यतीत झाल्याचे मी पाहतो. दिवसाढवळ्या नजरेने मी जेव्हा आकाश टिपतो तेव्हा माझी सविकल्प समाधी लागलेली असते. एका अर्थाने अस्तित्वहीन झालेला मी आकाश होऊनच उरलेला असतो. आपले हे विरघळलेले व्यक्तिमत्त्व आकाशरूपाने पाहताना आपण इंद्रियातीत झालेले असतो. डोळ्यांनी डोळ्यापलीकडचे पाहावे, हातानेच हातपलीकडचा स्पर्श घ्यावा व गंधवतीने आपली घ्राणेंद्रिये साऱ्या आकाशापलीकडे न्यावीत. आपल्या जिवाचा विसावा शोधताना पुढे आकाश दिसावे व जगण्याला स्वल्पविराम देत आकाश तेवढे पूर्णविराम करावे. त्यातील पावसाची रिमझिम पापण्यांगणिक टिपावी. त्याचा सूर्योदय व सूर्यास्त तृप्ती व मुक्ती म्हणून घ्यावा. त्याची चंद्रप्रभा उज्ज्वलतेचा अंश म्हणून कपाळावर लावावी व रुपेरी किनार जगण्याची आसक्ती होऊन जावी. जेव्हा विरक्तीने ते उदास झालेले असते तेव्हा विविध विभ्रमांतून त्याचे संकेत काळजाला जाऊन भिडतात. आपल्या पदरात अंधार आणि प्रकाश बांधून ते करीत असलेला प्रवास आपल्याच मार्गदर्शनाने घडलेला असतो.

सूर्य माथ्यावर येताना आकाश आपल्या उत्कर्षबिंदूवर पोचलेले असते. लीनतेने तल्लीनता त्याला आलेली असते. हे दृश्य मला नित्यनूतन आहे. उत्कर्षबिंदू हा पतनाचा प्रारंभबिंदू आहे. पण आकाश येथेही क्षणभर रेंगाळून अंतर्मुख झालेले मी पाहतो. सीमेवर येताना त्याला हुरूप येतो व समेवर जाताना आपल्या परिपक्वतेने त्याचा कायापालट झालेला असतो. भरतीच्या लाटेने किनाऱ्यालगत जावे व पुन्हा किनाऱ्याने लाटालाटांचा खेळ पाहावा ही त्याची वृत्ती हेही दृश्य मला नवी प्रेरणा देणारे आहे. मी जेव्हा खुल्या मनाने तृप्त असतो तेव्हा आकाश अतृप्ती ओसंडत असते. स्वत:च प्रज्वलित केलेली ज्योत तटस्थ राहून पाहावी तसे मी आकाश पाहतो. त्याच्या अतृप्तीत स्वत:ची तृप्ती कालवून देतो. आकाशाचा उत्कर्षबिंदू जेव्हा आपला अपकर्षबिंदू होतो तेव्हा जगण्याला आकार आलेला असतो, तर चालण्यात अर्थ भरलेलाअसतो. फुललेला गुलमोहर दोन्ही डोळ्यांत घट्ट मिटवून घ्यावा तसे सारे आकाश मी मिटवून घेतलेले असते.

आकाशगंगा पाहतानाही नयनोत्सवात सीमा उरत नाही. तिची दूधप्रभा वसुंधरेला नवे बारसे बहाल करते. ती आपली हळुवार स्वप्ने हळुवार पापण्यात

मिटवीत असते. येथे गंगेचे पावित्र्य, तिची शीतलता, तिची शुभ्रता व निरागस वृत्ती आकाशमय झालेले असते. स्वर्ग जर धरेला चुंबायला आलाच तर या वेळेलाच येईल. निसर्गाची अपूर्व वस्तुनिर्माणक्षम प्रतिभा याच वेळी जागृत होईल. झंकारलेली सतार माधुर्य गुणाने आकाशगंगाच गुणगुणत येईल. मैफलीला रंग चढावा व भैरवीच्या मादकतेने आकाश खुडावे. मी जेव्हा या सीमेवर आलेला असतो तेव्हा माझा पैलतीर दृष्टिक्षेपात आलेला असतो. मी जेव्हा या सीमेवर नसतो तेव्हा माझा ऐलतीर आकाशाशी बांधलेला असतो. एखाद्या खिडकीतून पाहिलेले आकाश जेवढे भव्य, तेवढे एखाद्या कवडशातून पाहिलेले आकाश दिव्यत्वाची प्रचीती देणारे आहे. इंद्रधनुष्याच्या तोरणामुळे ते मंगलमय झाले असेल; पण आकाशगंगेतील शुभ्र प्रवाहामुळे त्याचे ओघवते चिंतन सुसह्य जीवनाचा विरंगुळा झाला. या प्रवाहाबरोबर मागे न वळता पुढे जावे व पुन्हा या प्रवाहाबरोबरच टप्प्याटप्प्याने सौंदर्याचे चिंतन करीत यावे. आपले मरगळलेपण त्याला देताना आकाशगंगा साक्ष म्हणून घ्यावी; तर आपले उधळेपण बहाल करताना त्याची अथांग काया आपल्याला बांधून घ्यावी.

आकाश जेव्हा पंखानी भरून जाते तेव्हा आपला पिसारा फुलून आलेला असतो. या वेळेस आकाश कवेत घेणे हिताचे असते. अशा वेळी गरुडझेप पचवून आलेले आकाश साऱ्या पृथ्वीला 'पंगुं लंघयते गिरिम्' करून सोडते. लहानपणी वाऱ्यावर सोडलेले आकाश पतंग होऊन आपल्या हातातील दोर तोडू पाहते. विमुक्ततेच्या या राज्यात ढासळत गेलेली बंधने अटकेपार झालेली असतात. पक्ष्यांना ही एक नवी पर्वणी असते. आकाशाला नवी कात परिधान केल्याचा हा आनंद असतो. वसुंधरेचा प्रतिनिधी म्हणून मयूर हीच वेळ साधून या विमुक्ततेचा अविभाज्य घटक झालेला असतो. उन्हाने होरपळून आलेले आकाश, पावसाने भिजलेले आकाश व थंडीने गारठून गेलेले आकाश आपल्या अंगभूत सहनशीलतेला बाजूला फेकून या पंखाशी नाते जोडून घेते. नक्षत्रांशी नाते जोडताना त्याला विचार करावा लागतो. अंधार हा त्याचा एक विभ्रम; तर आकाश हा त्याचा स्थायीभाव. यातूनच ते पंखाशी जेव्हा आपले नाते दृढ करते तेव्हा त्याचा उतावळेपणा शिगोशीग भरलेला असतो. आपण जेव्हा पक्ष्यांचा किलबिलाट पाहतो तेव्हा हेच आकाश त्यांच्या पंखावर आरूढ झालेले असते. पानझड आणि पालवी पंखांवर बसून पाहावी ती आकाशानेच. ऋतुपरत्वे आपले विलोभनीय परिवर्तन घडवावे तेही यानेच.

मानवी जीवन आणि मरण यांच्या सीमेवर आकाश नेहमीच ठाण मांडून

बसलेले आहे. ओठावरील हसू आणि पापणीवरील आसू टिपताना त्याची कधीच त्रेधा होत नाही. जिवाचे जीवन होताना, तसेच मरणातील अमरपण घेताना त्याचा सोस चिंतनीय वटतो. सहजगत्या त्याचे होणारे सौंदर्यदर्शन दोन डोळ्यांना अपुरे, म्हणूनच त्याचे भिजलेपण पापण्यांपलीकडे आहे. अशा वेळी आकाश थेंबात येत नसून थेंबच त्याला आंदण म्हणून जातो. आकाश जेव्हा थेंबात येते, तेव्हा त्याची चाहूल लागत नाही; पण थेंब जेव्हा आकाशात जातो तेव्हा त्याच्या गर्जनेने सारे आकाश भरून यावे. तापल्या धरित्रीने डोळे लावून वर पाहावे. मयूरपिसाऱ्याने गाभारा भरून यावा. क्षणभर चिद्‌घनचपला प्रभावी सामर्थ्याने उजळून यावी. सारा आसमंत 'घनांबु न पडे मुखी उघडल्या-विना पाखरे' या निर्भरवृत्तीने उतावळा व्हावा. चराचरसृष्टी जुनी कात टाकून नव्या कातेला सुसज्ज राहावी. गुरांचा आर्त हंबरडा उफाळून वर यावा. ही घटिका आकाश डोळ्यांत मिटवण्यासाठी सुमुहूर्त देणारी आहे. येथे डोळसपणे आंधळेपण अव्हेरलेले असते व आंधळ्याने डोळसपण भोगलेले असते. अशा वेळी थेंबच आकाश होऊन पापण्यांकडे नजर देऊन पाहतो. पुन्हा एका नव्या थेंबात उतरून आकाशाने आपले आवर्तन पूर्ण केलेले असते.

## १३ / एकला नयनाला विषय तो झाला

गुलमोहर घट्ट डोळे मिटून पाहावा. ओल्याचिंब पापण्यांत त्याला साठवून ठेवावे. साऱ्या इंद्रियांना डोळ्यांच्या संगमात आणून त्यात गुलमोहर मिसळावा. आपल्या डोळ्यांना सारेच काही दिसते अशा नजरेने गुलमोहर कधीच पाहू नये. या वेळी तो लपलेलाच बरा. आपली नजर जेव्हा त्यास भिडेल तेव्हा तो साधा असेल, पण त्याचा 'आशय' आपल्याला मोठा झालेला दिसेल. आपले नित्याचे अवलोकन जणू काय 'आंधळ्याशी डोळे-दृष्टी नाही' असे त्यास वाटावे – म्हणूनच तो उघडचा डोळ्यांनीही दिसत नाही व मिटलेल्या डोळ्यात मावत नाही.

भरल्या उन्हात गुलमोहरास नजर लागते. कडक उन्हात तो फुलतो. यामुळेच आपण त्याचे 'घेणे' लागतो. भिजपाऊस त्यालाही हवा असतो, पण दुपारचे ऊन त्याच्या जीवाचे जीवन असते. हृदयीचा उन्हाळा जपून ठेवताना त्याच्या पानात कधीच पावसाळा साचलेला नसतो.अंतरीचे फूल फुलताना आपल्या अंगावरील थेंब थेंब त्याने गोठवलेला असतो. गुलमोहराची ही प्रतिमा प्राचीनांपासून अर्वाचीनांपर्यंत सर्वांनाच मोहिनी घालते. भावकवीशी ती नेहमीच पिंगा घालते. त्यात अनेकांना विविधतेचा 'झपूर्झा' अनुभवलेला दिसतो. 'फुले फुलात गुलमोहर' ही भावना मनाला भुरळ पाडते. यावेळी तो आपला नसतो. आपण त्याचे झालेले असतो. भाग्यविधाता उन्हात लपलेला आहे. याचा अर्थ तो गुलमोहरमय झालेला आहे. लहान मुलांना यावेळी उन्हातान्हात खेळण्यास पाठवावे व गुलमोहराशी त्यांचा सांधा जुळवून द्यावा. बालसृष्टीला धीर देण्यासाठी आजवर उन्हात कितीतरी घरे बांधलेली आपण पाहतो. पण

त्याच उन्हात खडा पहारा करणारा गुलमोहर युगानुयुगे आपण पाहत नाही, नव्हे तो आपणाला दिसत नाही.

लहानपणी आई गोष्टीत नेहमी सांगायची की, भक्त प्रल्हादाचा नारायण सगळीकडे भरलेला आहे. फक्त त्याला पाहता आले पाहिजे. याचा अर्थ गुलमोहर- सहज दिसतो असा नव्हे. नारायण जसा फक्त प्रल्हादाला दिसायचा तसा गुलमोहर देखील फार थोड्यांनाच दिसतो. जगात चुकलेली माणसे भरपूर आहेत. त्यामानाने मोक्यावर उभी असलेली फारच थोडी आहेत. त्यातही पुन्हा वळणावरील मोक्यावरून गुलमोहर पाहणारी भाग्यवंत अपवाद म्हणूनच वावरतात. आपल्या प्रवासाला जसे वळण असावे लागते, मध्येच मैलाचा दगड जसे अचूक मोजमाप करतो तसेच या वळणागणिक एक एक गुलमोहर असावा. जेणे करून आपला सारा प्रवास सुखकर व्हावा. एवढेच नव्हे, तर आपल्या प्रत्येक थांबण्याचे ठिकाण केवळ गुलमोहर असावे. या झाडाखाली विसावा घ्यावा. आपले हरवलेले गीत याखाली आठवून पाहावे. दारिद्र्याच्या सीमारेषांचे गणित येथेच सोडवावे. जीवनाच्या वजाबाकीत हातचा आलेला एक याखालील बेरजेत मिसळून द्यावा. गुलमोहर आपला म्हणून त्याला सुखदु:ख सांगावे. यावेळी त्याचे काहीही ऐकू नये. कारण तो आपल्या प्रवासाचा साथी नाही, तर प्रवासातील धीर आहे. सांत्वन आहे.

क्षितिज विस्तारताना गुलमोहर नक्षत्रासारखा दिसतो. अशा वेळी रुंदावलेले क्षितिज त्यावर रेंगाळताना पाहायला मिळते. आपले क्षितिजवेडे मन याच्या पानापानावर स्थिर व्हावे, फुला-फुलांची पाकळी गंधवत्या स्पर्शाने आपली पालवी व्हावी, आपला सारा आसमंत या गंधवार्तेने भरून यावा. केवढी ही पुण्याई! आपली की गुलमोहराची? नव्हे, या अभेद्यतेला सीमाच नाहीत. ज्या डोळ्यांनी आपण अथांग दर्या पाहिलेला असतो, जे नयन विशाल नभाकडे रोखलेले असतात, त्याच डोळ्यांचे पारणे गुलमोहर फेडतो. येथे क्षितिज विस्तारण्याची क्रियाच गुलमोहर विस्तारीत जाते. एखाद्या पाखराने आपले अपूर्व पंख जसे विस्तारून सारे आकाश त्याखाली झाकावे, तसे गुलमोहराखाली यावे व आईच्या मायेची ऊब अनुभवावी. आपल्या अंगावरील मांस त्यास बहाल करावे. जुनी कात टाकून नवेपण अंगावर घ्यावे. जगण्यासाठी केवळ गुलमोहर व्हावे.

गुलमोहरास चांदण्याचे वावडे नसते. तोही मोत्याप्रमाणे चांदणे टिपून घेतो. तापते ऊन हा त्याचा ध्यास आहे, तर फुलते चांदणे हा त्याचा भास

आहे. तो चांदण्यावर कल्पकतेने राज्य करतो. आपली सारी स्वप्ने त्यात धुऊन काढतो. आपल्या अंगभूत पानाची रुपेरी कडा जेव्हा अंधारात खुलून दिसते तेव्हा गुलमोहर याच चांदण्याने वेडा झालेला असतो. माध्यान्हीचा सूर्य तो नेहमीच आपलासा करतो. पण पौर्णिमेचा चंद्र देखील त्याने जीवाभावे जपलेला असतो. तेव्हा त्याच्या अंतरीच्या कळा दिव्यानुभवात विरघळलेल्या असतात. यावेळी त्याने 'चकोरा चांदणे'चा अनुभव घेतलेला असतो. गुलमोहराचे फूल चंद्र नभीचा जेव्हा पाकळीवर टिपते तेव्हा त्याच्या देठापर्यंत चांदणेच सजलेले असते. हा देठ कधीच खुडू नये. फुलासह त्याला हातात घ्यावे आणि आपल्या घ्राणेंद्रियाचे तर्पण करावे. यावेळी आपल्या बेंबीच्या देठाला जाग येईल व आयुष्यभर सार्थकतेचे राज्य पुरून उरेल. कृतार्थतेला कुठलीच सीमा नसते, हा थरथरता अनुभव आपला होईल.

आपण कुठलाही भावप्रत्यय गुलमोहराच्या कलेने घ्यावा. बोलणे खुंटण्याची किमया, स्वरातीत ऐकण्याची जादू व दृष्टीपलीकडचे पाहण्याचा हव्यास केवळ गुलमोहर देऊ जाणे! इथे ज्ञानेशाची अपूर्व अशी कोमलता साऱ्या संतांच्या अलौकिक व्यक्तिमत्त्वासह गुलमोहर आपल्या नजरेसमोर आणून देतो. जे काही 'शब्दाविण संवादिजे' ते सारे 'नजरेवीण अनुभविजे' असा गुलमोहराचा डौल असतो. जेव्हा अंगावर काटा उभा राहतो तो क्षण प्रीतीने फुलून आलेला असतो. जेव्हा आपली पाचावर धारण बसते तेव्हा आपण भीतीने व्याकुळ झालेले असतो. हे दोन्ही भावप्रत्यय गुलमोहर आपली पाने फडफडून जमिनीवर उधळून देतो. या वेळी जमीनदोस्त झालेला पाचोळा, उडता उडता पुन्हा गुलमोहर होऊन पुरूचे तारुण्य घेऊन जातो. त्याचे हेही रूप कामांध झालेले नसते, तर अभिसारिकेसाठी स्वागत म्हणून पुढे शिंपलेले असते. हा भावप्रत्यय शब्दाने चितारण्यासारखा नसतो. इंद्रियगम्य होऊन तो अतीत भावनेने रुजवायचा असतो.

कुठल्याही कोपऱ्यात फुललेला गुलमोहर स्थितप्रज्ञ म्हणून पाहावा. त्याच्याजवळ कधीच जाऊ नये. त्याची भावसमाधी भंगलेली कधीच पाहू नये. उलट त्याला आपल्या काळजाच्या कोपऱ्यात आणून सोडावे. येथे त्याची मानसपूजा बांधावी. त्याचे फूल न् फूल पूजावे. पान न् पान कपाळाशी बांधावे. त्याच्या खोडाशी आपले आलिंगन द्यावे. बुंध्यापासून ते शेवटच्या अग्रापर्यंत त्याला सलग असे उभेच पाहावे. आपल्या हृदयीचे बोल त्यास आंदण म्हणून द्यावे. या सगळ्याच क्रिया कळत नकळत जोपासताना साक्ष म्हणून गुलमोहर

घ्यावा, आणि श्रद्धेच्या परिघास त्याच्याच त्रिज्येने व्यापक करावे. ही बाब डोळसपणे घ्यावी व आंधळेपणे द्यावी. तुम्हाला चिंतनमग्न गुलमोहराची चिंता बाळगण्याचे कारण नाही. का, तर तो नेहमीच अंतर्मुख होऊन फुललेला असतो. त्याची पालवी अनुभवानेच हिरवी असते. ऊन पिऊन तो होरपळत नाही. उलट शंकराप्रमाणे अमृतमय असतो. पूर्वी सांदिपनींच्या आश्रमात गुलमोहराखाली विद्यार्जन करताना प्रत्येकजण आपल्या अंतरीचे बोल त्यास बहाल करीत. याच हृदयसंवादातून एक अंतर्मुखतेचा परिसर निर्माण होई, ज्याचा प्रभाव आजही गुलमोहर देतो. सौंदर्यचिंतन आणि तत्त्वचिंतन या त्याच्याच पानाच्या दोन बाजू. एक दवबिंदू टिपते, दुसरी त्यास कुस्करते. कलेकलेचा वाढता चंद्र व कलेकलेचा मिटता चंद्र एकाच डोळ्यांना दिसतो, हे गुलमोहर शिकवितो.

आयुष्याच्या शेवटच्या मजल्यावर गुलमोहराची साथ घ्यावी. तेथे आपली स्वप्नभूमी साकार झालेली असेल. गुलमोहराची धुंद लय आपल्या लाडिक गोडव्यांनी आपली शेवटची सीमारेषा अधोरेखित करील. येथे साऱ्या संवेदना बोथट होऊन गुलमोहर ही एकच वेदना कुंतीच्या मागण्यातून इतिकर्तव्यापर्यंत नेता येईल. क्षय आणि अक्षय, तसेच जय आणि पराजय या द्वंद्वांना येथेच छेद मिळेल. अद्वैताचा मूलमंत्र गुलमोहराखाली घ्यावा; तोही याच्या पानापानानेच जपावा; व फुलाफुलातच मिसळावा. याच्या अंगावर चितारलेली नक्षी डोळ्यांनी पाहताना आपले सगळे अवयव डोळ्यातच जमा करावीत. कोवळ्या निरागसतेने यावेळी यास चुंबावे. त्याचे पान न् पान आपले नेम व्हावेत. आपले अंतःकरण याच्या फुलाफुलास वाटून द्यावे. रिक्त होऊन त्याशी सायुज्यता सांधावी. ध्येयवेड्या अर्जुनास बाण मारण्यासाठी जसा केवळ पक्षी दिसला तसा आपला गुलमोहर व्हावा. मूर्त म्हणून तो पाहावा. अन् अमूर्त म्हणून घ्यावा. वाऱ्याच्या झुळकेने त्याच्या अंगचे मार्दव आणि पानाचे माधुर्य एकाच वेळी अलगद टिपावे आणि नवे नवे उन्मेष आपल्या चालीत पावलागणिक बांधावे. गुलमोहरच मावळलेल्या दिवसास उगवत्या दिवसाचे कोडे समजावून देतो. म्हणूनच तो नजरेआड ठेवून नजरेत भरवावा. त्याच्या अंगच्या नाना कळा पाहून शेवटी तोच एकला आपल्या डोळ्यांचा विसावा व्हावा.

# १४ / देणाऱ्याने देत जावे

अनुभव मोठा बोलका आहे. मी वर्गात कवी विंदा करंदीकरांची ' घेता ' ही कविता शिकवीत होतो. जो देतो तो दाता या अर्थाने जो घेतो तो घेता अशी कवितेची मूळ कल्पना करंदीकरांनी निर्माण केली आहे. देणाऱ्याने देत जावे आणि घेणाऱ्याने घेत जावे. यात देणाऱ्याची एक खूण आहे, ती म्हणजे हे दान अमाप आहे आणि आपण देतो आहोत या जाणिवेशिवाय दिलेले हे निर्मळ दान आहे. अशा निर्मळ वृत्तीने जर देता आले तर माणसाचे जीवन कृतार्थ होईल असे कवीला सुचवायचे आहे.

माझ्या वर्गात मोजकीच मुले होती, पण मी अशा आविर्भावात ही कविता शिकवीत होतो की जणू काय वर्ग भरून गेला आहे. करंदीकरांच्या एकेक कल्पना उलगडून देताना आपल्यासमोर कोणत्या पातळीवरील विद्यार्थी बसले आहेत याचा विचार न करता मी कविता उलगडीत होतो. एकापरी मी स्वत:लाच समजावून घेत होतो. कवितेतील माळ, सह्याद्री, ढग आणि पृथ्वी या प्रतिमा अशी काही अर्थवलये निर्माण करतात की ती समजावून देता देता आपण स्वत:च्या प्रतिमांचे एक लागेबांधे लावून घेतो. आणि तरीदेखील ' देणाऱ्याने देत जावे ' चे कोडे मात्र तसेच राहून जाते.

लहानपणी कित्ते गिरविताना एक सुभाषित आम्ही पोपटपंचीतून नेहमी गिरवीत आलो आहोत; ' अनंत हस्ते कमलावराने। देता किती घेशिल दो कराने ' असे ते सुभाषित आहे. पुढे वयाबरोबर जशी विचारक्षमता वाढू लागली तसे यातील अर्थमाधुर्य मनाला कोड्यात टाकू लागले. देणारा ईश्वर जर अनंत हाताने माप पदरात टाकत असेल तर घेणारा मानव आपल्या या दोन हाताने

का बरे थकावा ? देणे आणि घेणे या जर एकाच नाण्याच्या दोन बाजू असतील तर एक बाजूच सरस का ठरावी ? ईश्वराची अलौकिक पातळी आणि मानवाची लौकिक पातळी या शेवटी परस्परांनाच घडविणाऱ्या नाहीत का ? व्यर्थ घटनेतही अर्थ भरलेला असतो तसा नश्वर घटनेत ईश्वर जर असेल तर दान घेताना तो थकला न पाहिजे. परंतु आपली संस्कृती ईश्वराकडे नेहमीच श्रेयस म्हणून पाहत असल्याने या दृष्टीला मानव बळी पडला हेच खरे आहे.

दुसरा एक कवी आपल्या कवितेत, दान देताना भल्याने हिशोब पाहू नये, असे सांगून गेला. जी संस्कृती आदानम् विसर्गायची महती सांगते तिला गुप्त दानाचे महत्त्व निश्चितपणे कळले असले पाहिजे. तुम्ही अध्यापन करताना जोरजोराने शिकविता याचा अर्थ तुमचे ज्ञानदान गुप्तपणे दिले जात नाही असा घ्यायचा का ? तुमच्या या अध्यापनास एक घंटा शिकविण्याची मर्यादा आहे, मग तुमचा हिशोब एवढाच का ? अशी प्रश्नमालिका तुमच्यापुढे निर्माण होऊ शकते. पण या सर्वांमध्ये 'देणाऱ्याने देत जावे' चे सूत्र कुठेच तुटलेले नाही हे विशेष. आसक्ती आणि विरक्ती या दोन्हींतून ही देण्याची प्रक्रिया जात असल्याने कुठे ती वळण घेते तर कुठे ती वळणाबाहेर जाते एवढेच ! दिवसा सूर्य सहस्रकरांनी प्रकाश देतो. तसेच रात्री चंद्र देखील सहस्रकरांनी प्रकाश देतो. एकाची दाहकता आणि दुसऱ्याची शीतलता आपल्या देण्याशी निगडित असूनही तिच्या अंगी असलेला गुणधर्म 'देणाऱ्याने देत जावे' या सूत्राशीच नाते जोडतो. ढग पाणी देतो, झाड सावली देते ही व्याकरणशुद्ध वाक्ये जो कार्यकारण भाव निर्माण करतात त्याला देणाऱ्याचे महत्त्व कळलेले असते.

देणारा देताना घेणाऱ्याची क्षमता पाहत असेल तर देणे-घेणे ही एक व्यवहाराची सांगड राहील. आणि मग जिथे व्यवहार तिथे बाजार असेल. कुठलाही बाजार बेरीज-वजाबाकीचेच राजकारण करतो. राजकारण नेहमीच मुक्तीपासून दूर आणि बंधनाकडे झेप घेणारे असते. येथे सामर्थ्यापेक्षा मर्यादाच महत्त्वाची असते. तुम्ही जेवढे मोजाल तेवढेच आम्ही देऊ. अशा ठिकाणी देता आणि घेता स्वत:ला विसरू शकत नाही. तुमचा सारा व्यवहारच मुळी या दोन टोकांनी ताणून धरलेला असतो. अशा वेळी फक्त तुमच्या यंत्राची दोन चाके फिरत असतात. ज्याची धून 'देणाऱ्याने देत जावे घेणाऱ्याने घेत जावे' अशीच असते. यंत्रे संवेदनाशून्य असतात म्हणून हे फिरणे, आणि ही धून ही तितकीच निर्विकार असते. जेव्हा तुमचे देणे कोणावर तरी लादलेले असते, तेव्हा घेणेदेखील परतफेड म्हणूनच स्वीकारलेले असते. देणे आहे,

म्हणून घेणे आहे. देणे संपले की घेणे संपते.

देणाऱ्याने देत जावे या कल्पनेभोवती सारे मातृत्व जखडून गेलेले आहे. लहानपणी आई स्तनपान देते. किशोरवयात ती भाषा व संस्कृती देते. तारुण्यात ती निसर्गप्रकृती देते. संसारात ती परिवर्तन देते. माहेर आणि सासर या दोन्ही सीमारेषांवर ती अधूनमधून वावरत असल्याने तिच्या या देण्याच्या त्रिज्या नेहमीच विस्तृत झालेल्या असतात. असे असूनही मातृत्वाच्या परिघाला जो क्रमप्राप्त आकार आलेला असतो त्याचे गणित आपणास मांडता येत नाही. आईचे देणे ऋण म्हणून तुम्ही स्वीकारा, ते व्याजरहित असेल, नव्हे ते परत फेडायचेदेखील नसते. एवढे एकच ऋण असे आहे की जे आपल्या भावनेत सदैव सुस्नात होत असल्यामुळे ते केवळ अनुभवजन्य झाले आहे. असे ऋण जितका काळ तुमच्या डोक्यावर असेल तितके तुम्ही भाग्यवान असाल. कारण ते तुमच्याकडे येत असताना मातृत्वाने 'देणाऱ्याने देत जावे' चा कानमंत्र घेऊन आलेले असते. गुरू जेव्हा आपल्या शिष्यास हे अपूर्व देणे देतो तेव्हा त्यालाही एक शिस्त असते. येथे देणे म्हणजे अध्ययन आणि घेणे म्हणजे अध्यापन झालेले असते. महाभारतात द्रोणाचार्यांचे देणे अर्जुन आणि एकलव्य या दोघांनी घेतले. हे दोन्ही शिष्य घेता म्हणून अजरामर झाले आहेत. त्यांचा गुरू मात्र आपल्या देण्यातून हातचा राखून राहिला म्हणूनच घेणाऱ्याने देणाऱ्यावर मात केली.

अध्यापनाचे क्षेत्र मी जेव्हा निवडले तेव्हा देणाऱ्याने देत जावे एवढेच मी जाणले होते. यालाच मी पुढे ध्येय म्हणू लागलो. जे मला माझ्या गुरूने दिले तेच मी इतरांना देत होतो. एखाद्या सागरातून ओंजळभर पाणी बाहेर फेकावे तसे माझे होते. पण हे करताना मला काळ, काम, वेग आठवत नाही. समोर किती विद्यार्थी बसले आहेत याचेही भान नसते. विद्यार्थ्यांची पातळी मी कधीच लक्षात घेऊन शिकवीत नाही. याचे कारण माझे देणे आणि घेणे एकमेकांत इतके मिसळून गेले आहे की या दोघांनाही येथे स्वतंत्र अस्तित्व नाही. मी एखादी कविता समजावून देतो याचा अर्थ ती मी एकापरी समजावून घेतो. बालकवींचा 'औदुंबर' गेली कित्येक वर्षे माझ्या अध्यापनाच्या देण्या-घेण्याशी लागेबांधे जोडून आहे. अमृतानुभवातील 'आमोद सुनाशी आले' हे प्रकरण मी शिकविताना अजूनही मला, मी काय देतो आणि काय घेतो हे सांगू शकत नाही. गडकऱ्यांचा 'एकच प्याला' माझ्या देण्याने भरलेला असतो, तर घेण्याने रिकामा झालेला असतो. हरिभाऊ आपट्यांची यमू माझ्या देण्या-घेण्याच्या व्यवहारात स्वत:ला कधीच डांबून घेत नाही. मी विद्यार्थ्यांना

काव्यशास्त्रातील नेमके काव्य देतो की शास्त्र हे अजूनही उमजत नाही. हाडाचा अध्यापक हा क्षणाचा शिक्षक आणि अनंत काळाचा विद्यार्थी असेल तर त्याच्या देण्याचा व्याप नेहमीच घेण्यापेक्षा कमी असला पाहिजे. पण एवढ्यावरच तुमच्या 'देणाऱ्याने देत जावे'चे मोल सांगता येते. माणसाचे जगणे ज्या पातळीवर असते तीच तुमचे जगणे मूल्यवान ठरवते. तसेच अध्यापनात देण्याची पातळी जी असते तिलाच महत्त्व आहे. तुम्ही अध्यापनात जेव्हा स्वत:ला विसरता, तेव्हाच तुम्ही देणे विसरलेले असता. जो देणे विसरतो त्याला घेण्याचीही पर्वा नसते. रणांगणावर श्रीकृष्णाने धनुर्धारी अर्जुनास शिगोशीग तत्त्वज्ञान दिले. आणि तेवढेच शिगोशीग अर्जुनाने घेतले. यातून शिल्लक राहिले काय ? जिथे योगेश्वर कृष्ण आणि पार्थअर्जुन आहे तिथे हमखास जय आहे. तरीसुद्धा हा जय कोणाचा ? अर्जुनाचा की कृष्णाचा ? याला उत्तर नाहीच. कृष्ण जेव्हा 'मामेकं शरणं व्रज' म्हणतो, तेव्हा तो स्वत:बरोबर समोरचा अर्जुनही विसरलेला असतो. आणि अर्जुन जेव्हा 'नष्टो मोहा स्मृतिर्लब्धा' म्हणतो तेव्हाही तो असाच विसरलेला असतो.

जोपर्यंत तुम्हाला देणे विसरता येत नाही, तोपर्यंत घेणे तुमच्या आठवणीत राहते. कुठलीही आठवण पोखरणारी गोष्ट आहे, म्हणूनच या देण्याच्या प्रक्रियेत स्वत:ला विसरणे, घेण्याच्या प्रक्रियेत स्वत:ला विसरणे अगत्याचे आहे. अनुभव विसरण्यातच अपूर्व समाधान आहे. ज्ञानेश्वरांनी आपल्या भावार्थदीपिकेद्वारे आपल्या देण्यातून श्रोतृवर्गाला 'व्योम कवळले'चा भावपूर्ण प्रत्यय घडवून दिला. हे देणेच मुळी 'इये हृदयीचे तिये हृदयी घातले' असे होते. माऊलीचे हे दान सत्पात्री असल्यामुळे त्यांचा श्रोतृवर्गही तितकाच अधिकारी होता. म्हणूनच या देण्या-घेण्याचे मोल एकाच मापाने मोजले गेले. ज्ञानदेव देताना स्वत:ला विसरले आणि श्रोतेही घेताना स्वत:ला विसरले. उरले ते अनिर्वचनीय शब्द 'देणाऱ्याने देत जावे.'

निसर्गातील पंचमहाभूते देण्याची किमया अपूर्व करून सोडतात. आणि बिचारी वसुंधरा! ती सतत देतच आली आहे. तिला घेणे माहीतच नाही. तिन्ही ऋतूंत, बारा महिने आणि तिन्ही काळ ती आपली सोशिकताच देते. जणू तिचा वेदमंत्र 'देणाऱ्याने देत जावे' एवढाच आहे. शिवाय हे देणे अपूर्व मातृत्वाने भरलेले आहे ते वेगळेच. तिच्यापासून पामराने किती म्हणून घ्यावे! ती जेव्हा बहरलेल्या निसर्गातून नवथर लावण्य घेऊन येते, तेव्हा तिचे नवे नवे उन्मेष धारण करणारे प्रेम उफाळून येते. आणि मादकता देऊन जाते.

उन्हात रखरखलेली वसुंधरा आपल्या अंगच्या दाहकतेतून वर्षाऋतूला पाचारण करते. आणि शिशिरात गोठून गेलेली पृथ्वी घरटच्या घरट्यात पाखरांना ऊब मिळवून देते. तिच्या या स्थित्यंतरात निसर्ग आपले पैलू फुलवितो, तोही एका देण्यासाठीच. मग येथे एखादा वृक्ष पांथस्थाला अलगद सावली देतो. एखादे फूल आपल्या परिमलाचे साम्राज्य फैलावून देते. सागरातील लाटा एकमेकांना आव्हान देतात. क्षितिज आपली विस्तीर्णता दाखवून जाते. दूरस्थ असलेला माळ आपल्या उदासीनतेचे रहस्य उलगडून देतो. पक्षी आपल्या उड्डाणातून सामर्थ्याची झेप देतात. काळे आकाश आपल्या अंगभर चांदण्या फेकून देतात. हा सारा नयनरम्य देखावा पाहताना वाटावे की, वरचा स्वर्ग खाली देण्यासाठीच वाकला आहे; आणि वसुंधरा त्याला घेण्यासाठी तितकीच त्याच्याकडे झुकून गेली आहे. तुमच्या या कक्षेतील स्वप्नभूमीवर हा देण्याघेण्याचा लपंडाव अविरतपणे कुणी तरी खेळत असते. येथे जय-पराजय भाव खाऊन जात नाही तर दोन्हींचा सुवर्णमध्य साधलेले; स्वत:ला इतरांत झोकून विसरलेले निखळ रूप 'देणाऱ्याने देत जावे' एवढेच!

मी माझ्या समाजाचे काही देणे लागतो याचा अर्थ तुम्ही जेव्हा पडताळून पाहाल तेव्हा तुमचे देणे 'अपुल्यामध्ये विश्व पाहुनी पूजितसे मी विश्वाला' इथपर्यंत पोचलेले असेल. तुम्ही जेव्हा आईचे देणे देता तेव्हा तुमच्या मातृप्रेमास उधाण येते. तुम्ही जेव्हा कुटुंबाचे देणे देता तेव्हा तुमच्या आकांक्षेला धार चढलेली असते आणि तुम्ही जेव्हा समाजाचे देणे देऊ पाहता तेव्हा तुमचा ध्येयवाद उजळून गेलेला असतो. शेवटी माणूस जगतो तो इतरांना देण्यासाठीच ना! पण इतरांअगोदर त्याला स्वत:साठी देता आले पाहिजे. आत्मपरीक्षणाचा उगमच मुळी आत्मनिरीक्षणातून होतो. गाभाऱ्यात मंद गतीने प्रकाश देणारी समई इतरांसाठी जळते म्हणून प्रकाश देते. तिच्या या जळण्यात तिला सुख मिळते म्हणून ती प्रकाश देंते. अशा या देण्याच्या चिरंतन प्रक्रियेतूनच जगण्याला अर्थ आलेला आहे. मी एकटा जगतो म्हणजे तरी काय? माझे हे जगणे दुसऱ्यासाठी देणे झालेले असते. ते दुसऱ्याचे घेणे जे पहिल्याचे देणे झालेले असते. मला इतरांची पर्वा नाही ही मस्तीदेखील तुमच्या देण्याच्या धुंदीतूनच निर्माण झालेली असते. रूढार्थाने ज्ञानेश्वर आणि रामदास एकटेच होते; पण या दोन एकट्याचे देणे एकमेकांतून परंपरा व संस्कृती अखंडित करणारे आहे. मी जन्मलो तेव्हा एकटाच रडतो, पण जन्मभर आपल्या देण्याच्या कामगिरीने मरताना मात्र अनेकांना रडवितो. असे हे लौकिक आणि अलौकिक एकमेकांना

विसरणारे, आठवणारे द्वंद्व आहे. ज्या मानवी जीवनात ते ठाण मांडून बसले आहे, तेथे त्याला अजूनही एकच धृपद ऐकू येते : 'देणाऱ्याने देत जावे.'

# १६ / मैत्र जीवाचे

घराला जशी खिडकी असते, तसा आयुष्यात मित्र असावा. खिडकी उघडताच स्वच्छ प्रकाश यावा, बंद करताच थंडी, पावसापासून रक्षण व्हावे. पुन्हा रात्री उघडताच मंद चांदणे घरात झिरपावे. तसा मित्रदेखील विविध पातळींवरून तुमच्या जीवनात नाना कळा करून जातो. रामदास सहजगत्या सांगून गेले की, 'वेष असावा बावळा। अंतरंगी नाना कळा.' परंतु यामागे मैत्रीचे सुसूत्र धोरण बांधलेले दिसेल. ज्या नाना कळा अंतरंगात धारण करून, मित्र तुमच्या जीवनात येतो ते जीवन पाण्याप्रमाणे स्वच्छ ठेवणे, गढूळ ठेवणे, मचूळ ठेवणे आणि वेगवेगळ्या रंगांतून त्याला बहुरंगी करणे ही केवळ मित्राची किमया आहे. माणूस स्वत:साठी जगत नसतो, तो इतरांसाठी धडपडतो. हे 'इतर' आप्तांपेक्षा मित्रच अधिक असतात. जे तुमच्या जीवनाला आकार देतात, विकार देतात. तुम्ही तुमच्या जगण्यातून मित्र वजा करा. शेष जे काही उरेल ते शून्य असेल.

माझे वडील धार्मिक वृत्तीचे आहेत. ज्ञानेश्वरी, भगवद्गीता, भागवत, विष्णुसहस्रनाम, संतांचे अभंग ही मंडळी त्यांच्या जिभेवर खेळतात. श्रीधरांचा हरिविजय व भक्तिविजय हा देखील त्यांच्या नित्य पठणाचा विषय आहे. हरिविजयातील पोथीतील कृष्णमहिम्याने ओथंबलेला प्रत्येक अध्याय ते आपल्या रसाळ वाणीने असा काही सांगत की आम्ही घरातील मंडळी जणू कृष्णचरित्राचा एक घटक बनून जात असू. त्यातील एका अध्यायात सुदामा-कृष्ण मैत्रीचा महिमा वर्णन केला आहे. हा अध्याय ऐकताना श्रोते 'सुदाम्याचे पोहे' घेऊन येत व अध्याय संपताच या पोह्यांचा गोपाळकाला सर्वांना मिळत असे. मीदेखील

या सुदामा-कृष्ण मैत्रीचा साक्षीदार होतो. ही कथा ऐकताना मला सतत वाटे की, ज्याच्या घरी अठराविश्व दारिद्र्य आहे, तो सुदामा आपल्या पत्नीच्या सांगण्यावरून कृष्णाकडे जातो काय ? त्या कृष्णाकरिता जवळ पोहे घेतो काय ? कृष्णाने या मित्राचे केलेले वैभवशाली स्वागत, नंतर मोठ्या सन्मानाने परंतु त्याला न कळताच त्याची सुदामनगरी सोन्याची केली. हे सारे ज्या एका मैत्रीचा महिमा सांगण्यासाठी वर्णिले ते कितपत खरे असेल ? पुराणातील कथा या सोयीने वाचाव्यात आणि गैरसोयीने विसरून जाव्यात अशा तर नाहीत ना ? असे जर असेल तर सुदामा-कृष्ण कथा सोयीत बसते की गैरसोयीत राहते ? मी जेव्हा ही कथा वडिलांकडून ऐकली तेव्हा मला या प्रश्नांचा काहीच उलगडा झाला नाही. आज पुन्हा मी ही कथा वाचतो तेव्हा तिचे विविध पैलू मला उमजू लागतात. या कथेत निमित्त कृष्ण आणि सुदामा आहे– महत्त्व आहे ते निखळ मैत्रीचे. अठराविश्व दारिद्र्य उपभोगणारा सुदामा या मैत्रीपोटीच वैभवात विलसत होता. श्रीकृष्णदेखील पदरी श्रीमंती असूनही केवळ या मैत्रीपोटीच आपले जीवन उजळू देत होता. दोघांच्याही जीवनातील ही मैत्री वजा करा, दोघेही निस्तेज व दुर्दैवी राहतील. महत्त्व सोनेरी सुदामनगरीत किंवा वैभवशाली द्वारकेत उरलेले नाही. तेथे दोन जीवाभावाचे मित्र राहत होते त्याला महत्त्व आहे. कृष्णाची 'अंतरंगी नाना कळा' लक्षात घेताना त्यातील अपूर्व मैत्रीची भावना लक्षात घेतली पाहिजे. आपल्याच सुदामनगरीचे सोनेरी वैभव पाहून कावराबावरा झालेला सुदामा केवळ या मैत्रीपायीच आज लक्षात राहतो. सुदामाचा मित्र तो श्रीकृष्ण आणि श्रीकृष्णाचा मित्र तो सुदामा असे हे दोघे परस्परांत मिसळून गेले आहेत. हरिविजयात लहानपणी जे वाचले, ऐकले तेच पुढे आयुष्यात कायम ठसले. मैत्र जीवाचे !

भागवतधर्मात ज्ञानेश्वरांच्या नेतृत्वाखाली सारी संतमंडळी पंढरपुरात वाळवंटी हरिनामाचा गजर करीत. यात अठरापगड जातीचे संत एकत्र येत. भेदातीत होऊन 'लेकुरवाळ्या विठूशी' एकरूप होत. जे संत एका विठूरायाचे भक्त होते, तेच एकमेकांचे मित्र होते. मुख्य म्हणजे या अगाध मैत्रीचा कळस ज्ञानेश्वरांजवळ होता. दुष्टांनादेखील मित्र बनवायचे ही त्यांची धारणा ! 'जे खळांची व्यंकटी सांडो' यात ते सांगतात ते 'व्यंकटी'विषयी, दुष्टाविषयी नव्हे. समग्र विश्वातील वक्रदृष्टी नाहीशी झाली पाहिजे, असे सांगताना ज्ञानेश्वरांना 'भूतां परस्परे पडो। मैत्र जीवाचे' या भूमिकेवर स्थिर व्हायचे आहे. श्रीकृष्णाला अभिप्रेत असलेला ज्ञानी भक्त व ज्ञानेश्वरमाऊलीला समजलेला आर्त भक्त

शेवटी याच मैत्रीने बांधलेला आहे. जीवातून आलेली मैत्री, जीव ओतून घडलेली मैत्री असे तिचे रूप आहे. वाळवंटी जेव्हा 'नामदेव कीर्तन करती – पुढे तो नाचे पांडुरंग' असे दृश्य रंगत असे तेव्हा या सर्व संतांचा जीव या मैत्रीने जखडलेला असे. लोकशाही मग ती राजकीय, सामाजिक किंवा आध्यात्मिक राहो, तिचे एकमेव सूत्र 'मैत्र जीवाचे' आहे. लोकशाहीचा आत्मा 'लोक' हा नसून मित्र आहे. अनादि काळापासून – 'सर्वेऽपि सुखीनि: सन्तु' चा मंत्र गात तो प्रवाह आजतागायत आलेला आहे, त्यातील 'सन्तु'चा भाव 'मैत्र' या भावनेशी बांधलेला आहे. संतांनी आपपरभाव विसरण्यास सांगितले. रंजल्या-गांजल्यांची सेवा करण्यास सांगितले. अनन्यभावे अनंतास शरण जाण्यास सांगितले. निरपेक्ष मनाने परमेश्वरास भजण्यास सांगितले. या सर्वांचा एकच भावार्थ, तो म्हणजे मैत्र जीवाचे होय. ज्ञानेश्वर जेव्हा 'भूतां परस्परे पडो' असे म्हणतात, तेव्हा त्यांना चराचर सृष्टी अभिप्रेत असते. ज्या विश्वात्मक देवात ते वावरत तेथेही अशीच मैत्री होती. ज्ञानेश्वर एकटे होते, परंतु त्यांचे मित्र अनेक, किंबहुना अपूर्व मैत्रीचा उगमप्रवाह ज्ञानेश्वरांपासूनच झाला.

तुमची बाग फुलांनी बहरलेली असेल. तिथे रात्री येणारा रातराणीचा गंध, त्यात निशिगंधाच्या परिमलातून धुंदफुंद झालेली रात्र. सकाळी भल्या पहाटे प्राजक्ताने आपल्या पुष्पबहारातून अंगणात घातलेला सडा, हिरवळीवर पानापानातून थरथरणारे दवबिंदू, गुलाबफुलांची होत असलेली बरसात, जाईजुईच्या शुभ्र फुलांनी बहरून आलेला आसमंत, कडेला आपल्याच नादात हिरमुसलेली कण्हेरी अशी ही नयनरम्य बाग तुमच्या घराला वैभवाचे कुंपण होऊन जाते. या बागेत तुम्ही थोडा निवांत वेळ काढून फेरफटका मारा; साऱ्या अपूर्व मैत्रीचा देखावा जसा इंद्रधनुष्य आकाशात खुलते तसा दिसेल. जुईचा वेल मोगऱ्याकडे झुकताना जणू तो तिच्या कानात मैत्रीचा महिमा सांगतो. प्राजक्ताचे एखादे फूल जेव्हा शेवंतीवर पडते तेव्हा त्यांची मैत्री दारात उभी असते. कोपऱ्यात कण्हेरी एकटी म्हणून चाफा तिच्याकडे ओढला जातो. मोगरा फुलतो म्हणजे मैत्रीच नटून येते. रातराणीचा गंध रात्रभर दरवळतो, स्वप्नात नको तेवढा लाजवितो व सकाळी त्याची आठवण एका अपूर्व मैत्रीच्या भावनेतून आलेली असते. केशवसुतांना वरचा स्वर्ग पृथ्वीवर 'चुंबन' घेण्यासाठी आला असे वाटले. बालकवींना वरचा निसर्ग खाली 'सुंदरतेच्या सुमनावरचे दव चुंबुनी घ्यावे' यासाठी आला असे वाटते. वस्तुत: वरचा स्वर्ग काय, निसर्ग

काय, वसुंधरेवर मैत्रीची अपूर्व किमया करण्यासाठी आला. तो आला आणि पुन्हा गेला नाही. एवढी मैत्री इथे त्याला भुलवून गेली. मैत्री ज्या पावलाने येते, ज्या स्वरांनी गाईली जाते, ज्या धारेतून वाहत राहते, ज्या किरणांतून प्रकाशित होते तो भाग केवळ अनुपमेय, अतुलनीय व डोळ्यांत ठेवण्यासारखा, मनात खोलवर रुजविण्यासारखा असतो.

मैत्रीला निंदेचे वावडे नसते. एका अर्थाने निंदकच तिचा दाता, त्राता असतो. शिशुपालाची, कंसाची, रावणाची निंदा पुराणात विरोधाभक्ती म्हणून गणली गेली. ज्या राम-कृष्णांची निंदा या महाभागांनी केली ते एका अर्थाने भक्तीचे, नव्हे, मैत्रीचे दाते होते. म्हणूनच त्यांचे मित्र त्राते झाले. व्याजस्तुती किंवा व्याजनिंदा यात आत एक व बाहेर एक असा भेदभाव असतो. परंतु जेव्हा निखळ निंदाच तुमच्याकडे धावून येते तेव्हा ती मैत्रीची पूर्वसूचना घेऊन येते. संत तुकारामास ' निंदकाचे घर असावे शेजारी ' असे जेव्हा वाटले तेव्हा त्याचे मन या मैत्रीपायी कुठेतरी दुभंगले असले पाहिजे. तो जेव्हा आर्तस्वरांनी ' फुटो हे शरीर ' असे म्हणतो तेव्हा त्यांचा ' सखा पांडुरंग ' कुठेतरी लपलेला असतो. संतांनी पांडुरंगास सखा हे विशेषण ज्या निंदेपोटी वापरले, त्याला वाङ्मयात तोड नाही. पांडुरंग जितक्या वेळा मायबाप, बंधुभगिनी या नात्यांनी जखडलेला असतो तितक्या वेळा तो दुरावलेला असतो. जेव्हा तो ' सखा ' म्हणून उरतो, तेव्हा संतांचा, तुमचा आमचा उरलेला असतो. या सख्याशी केलेली निंदा स्तुतीपेक्षा महत्त्वाची असते. अशी निंदा आपण जेव्हा समजून घेतो, तेव्हा ती स्तुती होऊन जवळ येते. निंदा जेव्हा उमज देऊन जाते तेव्हा मैत्रीचे सर्व व्याजव्यवहार गळून जातात. मैत्री नेहमीच निंदा आणि स्तुती यांच्या पलीकडे राहते. तिला जेव्हा या दोघींचे बोलावणे येते तेव्हा ती एकाच वेळी दोघींकडे जाते व क्षणात एकमेकींना एकाच पारड्यात मोजून घेते.

मैत्री व्यवहाराच्या पातळीवर तरंगताना नफा-तोटा कधीच जुमानत नाही. तिचा तोटा तुमच्याभोवती जेव्हा येतो तेव्हा ती तुमची नसते. तिचा नफा जेव्हा तुम्ही मोजता तेव्हा ती तुम्हाला जुमानत नाही. संधिसाधू मैत्री-मित्र निर्माण करतात. त्यांचे अस्तित्व मित्र म्हणून असते. ' मैत्र जीवाचे ' हा शब्दप्रयोग मित्राशी निगडित नाही– तो अमूर्त आहे. विश्वव्यापी आहे. या शब्दाचा अर्थ सांगण्यासारखा नसल्यामुळे तो ऐकून लक्षात येण्यासारखा नाही. परखड व्यवहारात, संकटसमयी जे मित्र पहाडासारखे उभे राहतात त्यांचा महिमा गाईला जातो. असे पहाड आयुष्यात जी मैत्री देतात ती स्थितप्रज्ञ असते. माणसे

जेव्हा माणूस म्हणून जगतात तेव्हा ती माणुसकीने ओथंबलेली असतात. माणसे जेव्हा स्थितप्रज्ञ म्हणून जगतात तेव्हा ती मैत्रीकडे तुसडेपणाने पाहतात. जो अतीत असतो तो मैत्रीकडे डोकावत नाही. पर्यायाने मैत्र जीवाचे हे त्यासाठी नसते. याच न्यायाने ते केवळ व्यवहारात राहतात, त्यासाठीच मैत्री जपतात तेही एका अर्थाने अतीतच असतात. जे ऐल तटावर उभे असतात त्यांचे लक्ष मागे असते. जे पैलतटावर उभे असतात त्यांचे लक्ष पुढे असते. मैत्री मात्र या दोन्हींच्या मध्यावर वावरत असते. ती आपल्यापरी या दोन्ही बिंदूंना पाहते, खेळवते. तुम्ही जर खरे भाग्यवान असाल तर एका हातात ऐल व दुसऱ्या हातात पैल घेऊन मैत्रीला सामोरे जा. इथे ती तुमच्या स्वागतास तत्पर असेल. तुमची आणि तिची भेट होताक्षणी तुमच्या जगण्याचे क्षितिज रुंदावलेले असेल.

संत मीरा, जनाबाई, मुक्ताबाई, कान्होपात्रा या मैत्रीवर तरलेल्या आहेत. मैत्रीच्या प्रवाहात ज्या लाटा खालीवर होतात त्या या सख्यांना तरंगून ठेवतात. सखा म्हणून उरलेला पांडुरंग यांच्यासाठी अहोरात्र सावली होऊन राहतो. मीराने जेव्हा विषाचा प्याला जीवात ओतला तेव्हा तिचा सखा अमृत होऊन अंतरंगात स्थान होऊन बसला. जनाबाईची दैनंदिनी सख्यानेच लिहिली, क्रमबद्ध केली. कान्होपात्रा आर्त किंकाळीतून सख्यालाच आळविते. संतांनी अभंगातून ज्या विराण्या गाईल्या त्या सख्यासाठीच. तुम्ही या सर्वांना मधुराभक्ती म्हणा, ती सखा होऊन, सखया होऊन मैत्र जीवाचे सांगून जाते. सकाळी झाडावर पक्ष्यांची किलबिल मैत्रीचा ओघवता प्रवाह सांडून देते. निर्झरातून झुळझुळ वाहणारे पाणी मैत्रीचे स्तोत्र गात असते. आकाशाला कवेत घेऊन पृथ्वीवर वाहत जाणारा वारा मैत्रीचा महिमा व्यापक आहे हेच सांगून जातो. पंचमहाभूते मैत्रीवरच राहतात. जन्मताक्षणी, बालपणात, पुढे तारुण्यात आणि नंतर वार्धक्यात मैत्री एकाच ओघाने वाहते. मैत्री म्हणूनच अमर व अजर असते. तिच्या अंगी असलेली कल्पकता व तिचे नवे पैलू तुमच्या भावजीवनाची खरी आरास आहे. मैत्रीला वगळा, तुम्हास हे जग सुंदर दिसणार नाही.

मैत्रीला कुठलेच मत नसते. केवळ तिला मन असते. तिची बांधिलकी अंतरंगाशी असते. इथे जो रंग असेल तो तिला मिळेल. रंगारी ज्या पद्धतीने तिला रंगवेल तो तिचा रंग. फक्त अंतरंग तिच्या हुकूमतीचे केंद्र आहे. पाण्यात लाटा खालीवर होतात. नंतर संथ, शांत पाणी तळापर्यंत आपण पाहू शकतो. अशा पाण्याच्या तळाशी खोलवर मैत्री जाते, तिथेच ठाण मांडून बसते. तुमची पत्नी जेव्हा तुमच्या जीवनात प्रवेश करते तेव्हा आयुष्याला एक सुखद प्रवाह

मिळून जातो. पुढे आयुष्यात अपत्य येताक्षणी जगण्याला एक दिशा मिळते. यापुढच्या प्रवासात तुम्ही जेव्हा एकटे जाल तेव्हा तुमची मैत्री केवळ साथीला राहते. जे मित्र वळणावळणावर थांबलेले असतात ते वाटाड्या होऊन तुमचा प्रवास सुखाचा करतात. तुम्ही ज्या कुवतीतून चालू लागता तिला धक्का देते ती मैत्री. मैत्री दृश्य आणि अदृश्य यांना सांभाळणारी असते. ती रात्र आणि दिवस यांना अंधार आणि प्रकाशातून वेगवेगळे करणारी आहे. तिला दारिद्र्य जसे मानवते तसे वैभवही मस्तीला आणून देते. ती जेव्हा थांबते तेव्हा थकलेली नसते. ती जेव्हा चालते तेव्हा भांबावलेली नसते. तिची चराचर सृष्टीतील व्याप्ती प्रल्हादाला जसा भगवंत दिसला तशी असते. तिचे दातृत्व कर्णासारखे महान. षड्रिपूत तिला कुठेच स्थान नाही. उलट या रिपूत ती जेव्हा जाते तेव्हा ते संपूर्णत: बदललेले असतात. मी जेव्हा जगण्यावर प्रेम करतो तेव्हा माझ्यापुढे मैत्रीच असते. मला जेव्हा जगण्याची प्रेरणा मिळते, तेव्हा माझ्याभोवती मित्रच असतात. गर्दीत मित्र हरवतात, मैत्री हरवत नाही. माणूस जेव्हा एकटा असतो तेव्हा मैत्री त्याला चारचौघात नेते, तो जेव्हा समुदायात असतो तेव्हा त्याला जगणे फुलवीत म्हणायचे असते : ‘ मैत्र जीवाचे ! ’

# १६ / आपुलाचि वाद

तृप्तीचे इच्छाभोजन झाल्यानंतर मी शतपावलीसाठी मागच्या बागेत असतो. या वेळी रातराणी आपल्या परिमलाने माझा निरोप घेते. मी तिला निरोप देण्यास तयार नसतो. तिचा परिमल माझ्या अंगात संचारलेला असतो. अशा वेळी माझी शतपावली संपलेली असते. तरीसुद्धा बागेतील साऱ्या वृक्षवल्ली मला परत जाऊ देत नाहीत. ते माझ्यामुळे मी त्यांच्यामुळे तृप्त असतो. आपल्या संस्कृतीत भोजनाला 'उदरभरण नोहे जाणिजे यज्ञकर्म' असे म्हटले आहे. हे 'यज्ञकर्म' तृप्तीसह मला दिसते ते बागेत. मी गर्दीचा कधीच भुकेला नाही. चार माणसे जमवून आपण काहीतरी करावे असे मला स्वप्नातही वाटले नाही. उलट एकटेच राहून आपण काहीतरी करावे असा माझा खाक्या आहे. भले लोक मला माणूसघाणा म्हणतील; परंतु मी माणसापेक्षा वृक्षवल्लींना अधिक जवळ करणारा आहे. मुंबईत मला किती तरी माणसं दिसतात; पण ती एकमेकाची नसतात. माणसं पण माणसापासून दूर दूर गेलेली. मला सारी मुंबई माणूस-घाणी वाटते. वारुळातून मुंग्या शिस्तीने बाहेर याव्यात तशी ही माणसं मुंबईत रेल्वेतून बाहेर पडतात. पण ती एकमेकांना न विचारता अगदी गुपचूप जातात. जणू काय ती आपली कुणीच नाहीत. मला मुंबईतील एकटेपण नको आहे. त्यात रूक्षता आहे. तुसडेपणा आहे. ही माणसं अंतर्यामी दुभंगलेली असतात. ती कुणाची तर नसतातच, पण स्वत:ची देखील नसतात. त्यांचं जगणं हे मरणाच्या भीतीपोटी असतं. त्यांचं मरणं हे जगणं विसरण्यास कारणीभूत झालेलं असतं. ज्यांना घर असतं पण घरपण नसतं, त्यांना घरामागे एक बाग असते, याचं स्मरण राहील काय ? स्मरण झालं तरी वृक्षवल्ली त्यांना समोर दिसतील

काय ? दिसली तरी ते त्यांचे सगेसोयरे होतील काय ? हे सारे प्रश्न उत्तराशिवाय उरणारे आहेत. मला हे सारे मनापासून खटकते. मी माणसाशी सुखसंवादच काय, साधा संवाद देखील घालू शकत नाही. मला वृक्षवल्लीशी संवाद घालावा वाटतो.

चांदण्यांकडे टक लावून पाहण्यापेक्षा फुलझाडांकडे तासन् तास मी टक लावून पाहतो. डोळे लावून पाहण्यासारखं हेच एकमेव ठिकाण. पद्मासन घालून नजर समोर ठेवून पारिजातकाकडे केंद्रित व्हावे. क्षणात मोगऱ्याला समाचार देत, पोटावरून हात फिरवीत ढेकर द्यावा. मध्येच शेवंतीची नवलाई हाताने कुरवाळावी, जाईजुईंना आपलेच गाऱ्हाणे सांगावे. जीवाची पदरमोड करून मी हे सोयरपण जोडलेले आहे. माणसं धुडकावून मी वृक्षवल्लीचा झालो आहे. रातराणी मला खुणावते तेव्हा मी लाजलेला असतो. शेवंतीची हाक माझ्यात ध्वनी निर्माण करते. गुलाबी धून मला पुन:पुन्हा जागविते, तर तुळशीची मंजिरी संस्कृतीचा परिसर उभा करून राहते. हे वैभव डोळ्याला दिसणारे नाही. फक्त उमज देणारे आहे. घरच्या बागेत संत तुकाराम मला आवर्जून आठवतो. त्याने संतपण हे बाजारात मिळत नाही, असे सांगितले. पुढे तो आकाश-पाताळ धुंडूनही ते सापडत नाही याचा दाखला देतो. धनाच्या राशी मोजून ते अवगत होत नाही; ते संतपण आपल्याजवळच आहे याची साक्ष तुकाराम देतो. गंमत अशी की, त्याच तुकारामाला हे संतपण वृक्षवल्लीच्या सान्निध्यात गवसले याचा त्यालाही पत्ता नाही. तुकाराम भागवतधर्मी संत असेल, तो व्यवहार जाणणारा परखड माणूस असेल, रंजल्या-गांजल्यांचा कळवळा येऊन त्याने देवपण स्वीकारले असेल, तरीसुद्धा समाजापासून दूर कुठे तरी वृक्षवल्लीकडे त्याला मनापासून जावे वाटते. संतांनी सामाजिक क्रांती केली, व ते स्वत: मात्र समाजापासून दूर वृक्षवल्लीकडे गेले. तिथेच त्यांना वाद, संवाद व सुसंवाद प्रभावीपणे दिसेल. गुण-दोष, स्तुती-निंदा, आशा-निराशा ही सारी द्वंद्वे विरघळून अद्वैत असते ते बागेतील बहुरंगी फुलाशी, इतरत्र नव्हे.

‘ हे विश्वचि माझे घर ’ म्हणणारे ज्ञानेश्वर आणि ‘ आकाश मंडप पृथ्वी आसन ’ म्हणणारे तुकाराम मला आलटूनपालटून एकच वाटतात. ओवीतून ज्ञानेश्वरांचे व्यक्तिमत्त्व ओवीबाहेर जाते. तुमचे आमचे होते. तसे ‘ अभंगवाणी प्रसिद्ध तुकयाची ’ सार्वत्रिक भांडवल झाले आहे. तुम्हाला या भांडवलाचा हिशोब हवा असेल तर मनाशी संवाद घेत स्वत:कडे यावे लागेल. ज्ञानेश्वरांचे निसर्गवेडे मन ‘ व्योम कवळण्या ’ कडे जाताना वाटेत टप्प्याटप्प्यावर ही वृक्षवल्ली

आहेतच. मुक्ताबाईने ज्ञानेश्वरास ताटी उघडण्यासाठी हृदय पिळवटून हाक दिली. मधे ज्ञानेश्वर अंतर्यामी वृक्षांशी सूत बांधून बसलेले होते. ज्ञानेश्वरांनी आपला वाद आणि मनाचा संवाद इथेच केला. या वादापायीच ताटीचे अभंग प्रसिद्ध झाले आहेत. किंबहुना ज्ञानेश्वरांची ही अवस्था निर्मितीपूर्वीची आहे. ज्ञानेश्वरांचे निसर्गप्रेम 'अवघाचि संसार, सुखाचा करीन' या पालुपदाशी निगडित झालेले आहेत. 'अमृताते पैजा जिंकणारे' शब्द, 'दुरितांचे तिमिर जावो' असे सांगणारी प्रतिभा ज्ञानेश्वरांच्या एकलकोंडचा स्वभावाची जिवंत रूपे आहेत.

'चिंता करितो विश्वाची' असे सांगणारा रामदास सांदीला पडला नाही तर जनसामान्यात स्वत:ची प्रतिमा उजळीत पुन्हा एकटा राहिला. विवाहप्रसंगी पळून जाणारा, प्रभाते मनी राम चिंतीत जावा हे जगण्याचे पालुपद सांगणारा रामदास शेवटी आपुल्याशी वाद घालीत अजरामर झाला आहे. रामदासांचे आनंदवनभुवन रंगीबेरंगी फुलांतून विकसित झालेले आहे. तिथे वृक्ष गार सावली देतात. लतिका येणाऱ्या-जाणाऱ्यास आधार देतात. 'परमदिनदयाळा नीरसी मोहमाया.' रामचंद्र आपले धनुष्य बाजूला ठेवून 'रमे तेथे मन क्रीडा करी'च्या भक्तिभावाने एकरूप झाले ते याच आनंदवन भुवनात. रामदासांचा विवेक, सावधान आणि यत्नमहिमा याच आनंदवनाशी वृक्षवल्लींना घेऊन रामराज्य उपभोगीत असताना दिसेल.

प्राचीन ते अर्वाचीन आणि पुन्हा अर्वाचीन ते प्राचीन या उलटसुलट प्रवाहात जे संत, कलावंत आपुलाचि वाद घालतात तो सृजनात्मक तर आहेच; पण त्याने 'अपुल्या मध्ये विश्व पाहुनी पूजितसे मी विश्वाला' या ध्येयाशी खूणगाठ बांधली आहे. केशवसुतांचा नवा शिपाई 'मळ्यास माझ्या कुंपण पडणे अगदी न मला साहे' असे जरी सांगत असला तरी त्याची ऐकू येणारी धून आहे ती अशी –

**"सावलीत गोजिरी मुले**
**उन्हात दिसती गोड फुले**
**बघता मन हर्षून डुले**
**ती माझी-मी त्यांचा,**
**एक ओघ अम्हातुनि वाहे."**

केशवसुतांनी भले क्रांतीचे धडे गाईले असतील; ते आणि तुकाराम एकाच नाण्याच्या दोन बाजू. तुकाराम सांगतो, 'आकाश मंडप पृथ्वी आसन, रमे तेथे मन क्रीडा करी', तर केशवसुत सांगतात, –

" कोठेही जा, पायाखाली तृणावृता भू दिसते,
कोठेही जा, डोईवरते दिसते नीलांबर ते!"

तुकाराम आणि केशवसुत आपुलाचि वाद एकमेकांशी घालताना दोघांचाही ओघ एक असतो. तुकाराम भागवतधर्माचा कळस होऊन अमर झाले, तर केशवसुत आधुनिक कवितेला स्वत:कडे घेऊन आले.

मर्ढेकरांना 'अशा येथल्या परिस्थितीत, जगण्याचाही चुकला पाढा' या मनोवृत्तीने पोखरून सोडले. परिस्थितीचा गळ्याखाली काढा उतरविताना; मढेकर स्वत:ची ओढ 'कितीतरी दिवसांत नाही चांदण्यात न्हालो' या भूमिकेने स गू जातात. रेगे यांचा कृष्ण आणि राधा एकमेकांचे अद्वैत निसर्गात पाहतात, सारी चेतना विश्वार्पण करतात. हा वाद, संवाद, 'रमे तेथे मन क्रीडा करी' या वृत्तीचा ना! कला उमगते, विकसित होते व शेवटी विसर्जन पावते तीही 'येथ सुखे रुचे एकांताचा वास' असे म्हणतच. ज्ञानदेवांना अभिप्रेत असलेला ज्ञानी भक्त, स्थितप्रज्ञ आणि तुकारामाने 'नाही गुणदोष अंगा येत' असे सांगताना पाया आणि कळस एकातून दुसरा पूर्णत्वाकडे जाताना, सायुज्य होतात. आपुलाचि वाद साधतो तो वृक्षवल्लींच्या सोयरेपणात, हेच सांगितले.

म्हणून मला माणसाचे तत्त्वज्ञान पेलत नाही, परवडत नाही. माझी शेवंती जेव्हा 'जाणिवितो वारा अवसरू' कडे ओढली जाते, तेव्हा ती मग्न असताना मला काही न सांगता किती तरी सांगून जाते. निसर्ग तुम्हाला काहीच शिकवीत नाही आणि कितीतरी शिकवितो. बागेभोवती कुंपण आणि मधोमध गुलमोहर सांगतो की, 'हरिकथा भोजन परवडी विस्तार, करोनी प्रकार सेवू रुची' ही हरिकथा अवतीभवती तृणात जाते, धरतीच्या भेगांतून पुलकित होऊन आपल्या मनात येते. कला सौंदर्यवती असेल तर ती शेवंतीशी लागेबांधे घेऊन निर्माणक्षमता जोपासणारी म्हटली पाहिजे. माणसे जेव्हा तत्त्वज्ञान सांगतात तेव्हा गुण-दोषांचे द्वंद्व नेमके इथे ठेवून जाते. माणसाच्या तत्त्वज्ञानात चर्चा, ऊहापोह, शब्दजंजाळ वृत्ती आणखी कितीतरी असते. शेवंती तुमच्याशी बोलते, कानातून मनात सांगते. ते हितगुज असते. संवाद असतो. सुख-संवाद राहतो. आणि तिने 'आपुलाचि वाद आपणाशी' घालीत आपली कृतज्ञता तुमच्यापर्यंत आणून ठेवलेली असते.

माणसे येतात, जातात. हा क्रम अखंड आहे. झाडे रुजतात, वाढतात, कोलमडून पडतात. या प्रवाहालाही खंड नाही. शाश्वत आणि अशाश्वत सारे काही आलटूनपालटून येते आणि जाते. मग श्रीशिल्लक काय राहते. ज्ञानेश्वर,

तुकाराम आणि रामदास ते आजपर्यंतचे एकजात संत, कलावंत साऱ्या विश्वाची चिंता ' बुडता हे जन न देखवे डोळां ' असे म्हणत ' अवघाची संसार सुखाचा करीन ' पर्यंत येऊन पोचतात. यात नेहमीच ' आपुलाचि वाद ' घातलेला असतो. आणि तोही वृक्षवल्लीच्या सान्निध्यात. म्हणून मी माणूसघाणा आहे, असे म्हणताना कुणीतरी निसर्गवेडा आहे, असे सांगावे. बालकवींची कविता जेव्हा तुमची-आमची, सर्वांची असते तेव्हा तिचे निसर्गवेडे रूप मनाशी संवाद घालीत आपल्यापर्यंत येऊन पोचलेले असते.

मी नित्यनेमाने हरिकथा भोजन घेतो. तृप्त मनाने बागेत शतपावली करतो. मागच्या बागेत इकडून तिकडे फिरत राहतो. माझा शतपावलीचा टप्पा निशिगंध, मोगरा, रातराणी, जास्वंद, गुलाब ते पारिजातक असा लांबचा आहे. मधेच ' वारा अवसरू ' होताना; ' कथाकमंडलू ' रक्षक म्हणून हाती येताना माझे सगे-सोयरे मला बोलावतात. माझ्याशी सुखसंवाद घालतात. मानवी जीवनाचा गुंता सोडविण्यासाठी, देशाची विस्कटलेली घडी सुरळीत करण्यासाठी आणि एकमेकांचा सुपंथ सहकार्यातून विकसित करण्यासाठी तुमच्या घराला एक बाग असली पाहिजे आणि तिथे तुम्ही ' आपुलाचि वाद ' घातला पाहिजे.

❦ ❦ ❦

# १७ / निंदक

निंदक मत्सर करणारा असावा, पण तो नाटकी नसावा. एक तर तो मुखवटे घेऊन वावरणारा नसावा. त्याला व्याजस्तुती किंवा व्याजनिंदा परवडणारी नसते. निंदा ही आपली प्रकृती आहे. तिच्यापासून तो वेगळा नसतो, नव्हे तर असे राहणे ही त्याची विकृती असते. निंदकाच्या सर्व इंद्रियांना निंदेचेच वळण पडलेले असावे. म्हणून त्याने पांघरलेले मुखवटे त्याच्या स्थायी भावात विसंगत असतात. निंदकाची निंदा सहजगत्या बाहेर आलेली असावी. तिचा हव्यास अगदी सहज असावा. तिला कृत्रिमतेचे वावडे असावे. कुणाच्याही दबावाखाली निंदकाचे राज्य आलेले नसावे. आपण आपल्या वृत्तीत सार्वभौम आहोत. त्यामुळे अवतीभवतीचा प्रदेश कधीचाच पादाक्रांत केला आहे, अशी त्याची धारणा असावी. निंदकाने आपली निंदा हातचा राखून कधीच देऊ नये. उलट हे देताना त्याने स्वतःशी कधीच घेण्याचा अंदाज बांधू नये. आपली निंदा 'मम सुखाची ठेव' म्हणून बाळगावी, आणि चंद्र-चांदणे या नात्याने तिचा मनसोक्त वर्षाव करावा.

तुकारामाच्या प्रतिभेने 'निंदकाचे घर असावे शेजारी' म्हणून निंदकाचा गौरव केला आहे. वस्तुतः तुकाराम जे जीवन जगला त्यात पावसाळे आणि उन्हाळे कितीतरी आले आणि गेले. पण या सर्वांना जी निंदेची अंगभूत कडा होती त्यामुळेच त्याचे जगणे बावनकशी झाले. भक्तीत आत्ममग्न असलेला तुकाराम निंदेमुळेच आत्मपरीक्षण करू शकला. जे अभंग इंद्रायणीत तरून 'अभंग' राहिले, त्यांनाही याच निंदेच्या मार्गातून स्वतःला उजळून घ्यावे लागले. मंबाजीमुळे तुकाराम मोठा झाला; हे तुम्हाला विसरता येत नाही.

तुकारामाची देहूनगरीतील निंदा, ज्ञानेश्वर आणि एकनाथ यांची पैठणमधील निंदा या सामान्यांना असामान्य करून गेल्या. विभूतिपुरुषांच्या ज्या जीवनास 'साबण' स्वच्छ करू शकला नाही, ते जीवन निंदकांनी आरपार स्वच्छ केले. फुललेल्या मोगऱ्याचा परिमळ ज्ञानेश्वरांपर्यंत याच निंदकांमुळे गेला. आणि रंजल्यागांजल्यापर्यंत जाण्याची कोमल बुद्धी नाथांना दिली ती निंदकांनीच, हे विसरता येत नाही. नाथ राणू महाराकडे जाताना पैठणच्या लोकांनी तोंडभर निंदा केली, यातूनच आपपरभाव विसरण्याची प्रेरणा नाथांना झाली. सारे संतवाङ्मय आणि माहात्म्य या निंदेने उजळून गेले आहे.

आत्मपरीक्षणाची पातळी माणसाने धारण करावी म्हणजे तरी काय? अशा वेळी तुम्ही शेजारचा निंदक हलवून जागा करा, तुम्ही या पातळीवर आपोआप जालच. तुम्ही एका उत्कर्षबिंदूवर जाता, वैभवाच्या शिखरावर पोचता किंवा विद्वत्तेच्या राज्यात संपन्न होता, तेव्हा तुमच्या निंदकास हे सारे जणू स्वतःच्या कर्तृत्वाचे पैलू वाटतात. निंदक आपल्या निंदेने एक एक शिखर ओलांडून स्वतःचे राज्य तिथे प्रस्थापित करतो. यावेळी तुम्हाला जी अवस्था प्राप्त होते तिलाच आत्मपरीक्षण हे नाव आहे. एखाद्या तुरटीच्या खड्याने अशुद्ध पाणी शुद्ध व्हावे तसे सामान्य निंदक थोरा-मोठ्यांना आपली 'चुकलेली जागा' दाखवून देतो. अंतर्मुखता हा जगण्याचा अतूट भाग असेल तर आत्मनिरीक्षण हे जगण्याचे यशस्वी रूप राहील. आणि या दोन्ही पदरांचा सुवर्णमध्य निंदकाची निंदा असेल. अशा वेळी तुम्ही मनाशी ठाम ठरवा की तुमच्या शेजारी एक निंदक असलाच पाहिजे, नव्हे त्याने तुमच्या जीवनपदराची गाठ बांधलीच पाहिजे. जीवन ही एक अभिजात कलाकृती आहे. तिला भावना, संवेदना, कल्पना आणि विचार अशी चार प्रमुख अंगे आहेत. मला वाटते या सर्वात सुसंगती हवी असते आणि ती निंदकामुळेच घडून येते.

जगण्याचा तोल जातो तो निंदकामुळे. आणि जगण्याला तोल येतो तोही निंदकामुळेच. अशा वेळी निंदकाची परीक्षा करणे हे तुमच्या बुद्धिचातुर्याचे खरे सामर्थ्य आहे. निंदकाचे अजमावणे, त्याला मोक्यावर उभा करणे किंवा त्याला धोक्यापासून परावृत्त करणे ही बाब येरागबाळ्याची नाही. अशा वेळी प्रतिभासंपन्न निंदक तुमच्यापुढे आव्हान म्हणून उभा राहतो. आपुले नवे नवे उन्मेष दाखवून तो तुम्हाला रिझवितो आणि खिजवतोही. सुख आणि दुःख, आशा आणि निराशा, जय आणि पराजय, तसेच निंदा आणि स्तुती ही द्वंद्वे वरवर पाहता वेगवेगळी दिसतील, पण अंतर्यामी ती एकमेकाचीच आहेत.

निंदा ही स्तुतीशिवाय किंवा स्तुती ही निंदेवाचून एकटी राहू शकत नाही. चक्रवाक जोडी ज्या ओढीतून एकमेकासाठी अंधार पिऊन प्रकाशाकडे नजर देऊन असतात; अगदी तसेच निंदा-स्तुती यांना जगण्यात ओढ आहे. जेव्हा तुमच्या शेजारी निंदक असतो, तेव्हा त्याच्या शेजारी स्तुतिपाठक असतो. तुम्ही जेव्हा त्याच्या निंदेला सामोरे जाल तेव्हा त्याने आपला शेजारी स्तुतीसाठी दावणीला बांधलेला असतो. असा हा लपंडाव नेहमीच निंदक खेळत असतो. राज्य कोणावरही यावे. कोणीही तुमच्या भोज्जापर्यंत जावे, निंदक आपली ऐट सोडत नाही.

कुठल्याही निंदेची बेरीज करता येते. वजाबाकी नव्हे. निंदकात तुम्ही कितीही निंदा मिळवा तुमचे गुपित हातचा एक राखून सुटलेले असेल. अशा वेळी पदरमोड करून निंदक जवळ करावा. त्याचे व्रत अजमावून त्याचा वसा घ्यावा. या व्रतासाठी तन-मन-धनाची पराकाष्ठा करावी. जगण्याचा चुकलेला पाढा या व्रतापोटी बरोबर करावा. येथे तुमचे गणित सुटलेले असेल. बेरजेचे राजकारण हा निंदकाचा हेतू नेहमीच तुमच्या पथ्यावर येऊन तुमचे जगणे उजाळून देतो. परदुःख हे शीतळ, तशी परनिंदा सुसह्य असते. पण परनिंदेनेच आत्मनिंदेला आमंत्रण दिलेले असते. आत्मनिंदा ही आत्मपरीक्षणाची पहिली पायरी आहे. आत्ममग्नता ही सायुज्यतेकडे नेणारी बाब असेल तर आत्मनिंदा ही समीपतेला जवळ करणारी आहे. आणि समीपतेशिवाय सायुज्यतेला थारा नाही. एकीमुळे दुसरी असू शकत नाही आणि दुसरीमुळे पहिली दिसू शकत नाही, असे हे एकमेकींचे लागेबांधे जुळलेले आहेत. बेरजेशिवाय वजाबाकी किंवा वजाबाकीशिवाय बेरीज असूच शकत नाही. तसे निंदक या सर्वात डोकावल्यामुळे तुमचे गणित अचूक उत्तराकडे जाते.

सवतीमत्सर हा एक निंदकाचा पैलू आहे. पौराणिक संदर्भ घेऊन आलेल्या सत्यभामा किंवा कैकेयी आपल्या निंदेच्या साम्राज्यात वावरताना स्वतःचे देहभान विसरून जात. ही आत्ममग्नता परनिंदेतून आलेली नव्हती. तिने आपली आत्मकेंद्रित वृत्ती प्रेमापोटी जागृत केली. एखाद्या त्रिज्येने वर्तुळ वाढवावे तसे ही वृत्ती निंदेचा परीघ व्यापक करू लागली. आणि तिने संपूर्ण महाभारत आणि रामायण यांचे आवर्तन वळणदार केले. माणसाळलेली निंदा पुराणात होती म्हणून पुराणे आदर्श होऊन आज वावरतात. इतिहास जेव्हा निंदकाचे दाखले तुमच्यासमोर ठेवतात तेव्हा शूर पुरुषांचा पोवाडा निंदकांनीच गायिलेला असतो. आणि मग वेदांना कृपणता निंदकामुळेच आली याकडे लक्ष जाते.

पण हे कार्पण्य क्षणभंगुर असते. एरवी निंदक कुठेही 'अनंत हस्ते' आपले देणे देत असतो. चंद्र चांदणे देताना किंवा मेघ वर्षताना कधीच हातचे राखत नाही; तसे निंदक मुखवटे फेकून आपले गाठोडे चारचौघात उघडे करतो.

मी स्तुतीने फुगतो आणि निंदेने समधात होतो. मला स्तुती पेलत नाही आणि निंदा सोडवत नाही. युगपुरुषांच्या जीवनधारेतून, पुराणकथांच्या बोधांमृतातून, इतिहासाच्या मंथननिष्कर्षातून शेष म्हणून राहिलेली निंदा हीच सर्वसामान्य माणसाच्या जगण्याची श्रीशिल्लक आहे. मी जेव्हा निंदकाच्या शोधात असतो तेव्हा कस्तुरीमृगासारखा गांगरून गेलेला असतो. तुमच्या हक्काच्या घराला मोठमोठी दारे आणि खिडक्या असाव्यात. यामागे स्वच्छ हवा आणि प्रकाश तुमच्या घरात यावा, हा हेतू असेल. पण त्याबरोबरच या मोठ्या दरवाजातून व तितक्याच मोठ्या खिडकीतून तुम्हाला शेजारचा निंदकही दिसावा हादेखील एक हेतू आहे. तुम्ही दारे-खिडक्या बंद करून अंधारात एकलकोंडे व्हाल, नव्हे स्तुतिपाठक व्हाल. अशा वेळी निंदकाचा एक कवडसा उजाळा देण्यास पुरेसा आहे. विविध फुलांनी बहरलेली बाग, तसे विविध निंदकांनी भरलेली वसाहत ही आजच्या माणसाची नित्याची बाब आहे. पापणीने आपला अश्रू अलगद जपून ठेवावा, किंवा तुमचे कान स्वरांसाठी तिष्ठत राहावेत, अथवा परिमळासाठी नाक आसुसलेले असावे, तसेच पंचेंद्रियांनी परिपूर्ण झालेला शरीरात्मा निंदकाकडे डोळे लावून असतो. माझा निंदक मला लखलाभ असो!

# १८ / कॅथार्सिस

आठवडे बाजारात फिरणं हा एक माझा मनसोक्त विरंगुळा आहे. भाजी - बाजारात तर मी टप्प्याटप्प्याने आनंद लुटतो. वांग्याचा भाव विचारून जरा पुढे जा, कोबीची चौकशी कर, पुढचा पल्ला गाठ. मधेच ' बटाटे जरा शिळे आहेत ' असा अनाहूतपणे शेरा मारून त्याचा भाव कमी कर. भोपळे जरा लहान आहेत म्हणून नाराजी दाखव. शिवाय ते कोवळे नसल्याने फार महाग आहेत, असे म्हण. असे एक नव्हे कितीतरी टप्पे मी या बाजारात ओलांडीत असल्याने आपण बाजारात फक्त फुकट चौकशीसाठीच आलो आहोत असा सर्वांचा समज होतो. परवाचीच गोष्ट पहा ना, मी एका भेंडीवाल्याकडे गेलो. त्याला मालाविषयी विचारले. तो अगदी आपुलकीने मला शेंडा मोडून भेंड्या दाखवीत होता. मी त्याला चार आणे भावात कमी कर असे म्हटले. तोही कबूल झाला. माझे लक्ष तराजूकडे होतेच. तो मिनतवारीने माप करीत होता. मी पिशवीत भेंड्या घेऊन घरी आलो. सौ. ने लगेच चिरण्यासाठी घेतल्या. पहिल्या एकदोन भेंड्या उत्तम निघाल्या. नंतर मात्र एक एक भेंडी किडकी निघू लागली. सौ. ने त्या क्षणी मला रागावण्यास सुरुवात केली. हे सारे मी निमूटपणे ऐकत होतो. तिच्या मते; मी या भेंड्या आता बाजारात जाऊन परत कराव्यात आणि पैसे आणावेत. पण तिचा हा खाक्या मला बिलकूल मान्य नव्हता. मी तिचे सारे बोलणे ऐकून घेतले. सबब, मला या दिवशी जेवणात भाजी मिळाली नाही.

भेंडीचे निमित्त करून आपल्या बायकोने भांडत राहावं यात मला कसलेच गैर वाटत नाही. तिच्या मते, तुम्ही आयुष्याचे चाळीस पावसाळे ओलांडून

तुम्हाला चांगल्या आणि वाईट भेंडीतील फरक कळू नये यात आश्चर्य आहे. परंतु मला तिच्या या शेऱ्याचे कधीच वाईट वाटले नाही. भाजीबाजार हा चांगुलपणा आणि वाईटपणा यातील फरक दाखविण्यासाठी एक सोय म्हणून भरत नाही, तर तो विविध नमुन्याची काही गरजशून्य माणसे एकत्र आणून तैलबुद्धीचे माजोरे दर्शन घडविण्यासाठी त्याचे एक प्रयोजन म्हणून भरतो. वयाची चाळीस वर्षे म्हणजे अनुभवाचा अर्क किंवा शहाणपणाचे अचूक आराखडे असतील तर गेली चाळीस वर्षे भरत असलेला बाजार एक अनुभवसमृद्धीचे उघडे दालनच आहे. माणसे जगतात म्हणजे तरी काय ? ती दिवस ढकलत जातात, वर्षामागून वर्षे जातात. ते थेट चाळीसपर्यंत. पुढे ही वाट अंगवळणी पडते. पण चाळीस वर्षांवर तुम्हाला कोणी तरी थांबवते आणि तुमच्या अकलेच्या ताऱ्यांचे कोडकौतुक करते. मी माझ्या बायकोला म्हणालो, " चाळीस वर्षांची खूणगाठ तू शहाणपणाची समजत असल्यास मला त्यात फार मोठा धक्का आहे. ज्ञानेश्वरांना अवघे बावीस वर्षांचे आयुष्य मिळाले तर कै. गडकरी यांच्या वाट्याला अवघी चौतीस वर्षांची मर्यादा आली. दोघेही चाळीशीपर्यंत न जाता किती मोठे झाले ? दोघांच्याही नशिबात आठवडे बाजाराचा धाक नव्हता. ज्ञानेश्वरांसारख्या महाभागाने पत्नीशिवाय आपली परिपक्वता दाखविली, तर गडकरी यांनी दोन बायका बाळगूनही भेंडीसाठी त्यांचे गाऱ्हाणे घेतले नाही. परंतु माझ्या या युक्तिवादाचा तिच्यावर कसलाच परिणाम होत नाही. ती या निमित्ताने माझ्याशी मनसोक्त भांडते. मी तितकाच मुकाटपणे ऐकून घेत 'व्यवहारशून्य' या हुद्याचे भले मोठे प्रमाणपत्र घेऊन आपण तिच्या रागाला वाट करून देणे, निचरा बाहेर काढणे, या तत्त्वाशी बांधून घेतो. याचा अर्थ बायको जेव्हा नवऱ्याशी भांडते तेव्हा जी क्रिया होते तिनेच संतप्त भावना शमवल्या जातात, त्यांचे विरेचन होते.

तसा मी एक भांडणप्रिय माणूस आहे. स्वयंपाकघरात दोन मांजरे भांडताना मी तितकाच तल्लीन होऊन सविकल्प समाधीत येतो. या मांजरांच्या भांडणाचा जोरदार ध्वनी इतरांची झोप घालवील, पण मी मात्र अगदी साळसूदपणे भ्याड मनाचे दृष्य पाहून या सादाला प्रतिसाद देतो. शेवटी मांजरे देखील आपल्या अतिरिक्त भावना या भांडखोर ध्वनीतून सहजपणे वाटेला तर लावत नाहीत ना ? कुठलीशी भावना अनावर झाली की ती आपली वाट शोधते. वाट सापडली की तुंबलेला निचरा वाहात जातो. एकदा विरेचन झाले की आपोआप शुद्धीकरण होतेच. सर्व प्राणिमात्र या भांडणप्रक्रियेतून स्वत:चा गेलेला तोल

सांभाळतात. म्हणून हे मांजराचे भांडण मला सहसा मिटवावे वाटत नाही. माझे तर असे मत आहे की कुठलेच भांडण सहसा मिटवू नये. ते आपोआप मिटतेच.

सार्वजनिक नळावरील बायकांचे भांडण जेव्हा मी पाहतो तेव्हा माझे कुतूहल अगदी शिगेला पोचलेले असते. ज्या वेगाने नळातून पाणी येते त्याच वेगाने भावनांचा आवेग बायका भांडणातून बाहेर फेकतात. घरात सासूशी, नणंदेशी मूकपणे भांडणारी, नवऱ्याशी रुसून अबोला धरणारी आणि आपल्याच पोरावर मार मार मारून अनावर झालेली स्त्री नेमकी नळावर हा सगळा वचपा काढून स्वत:चा निचरा करते. या तिच्या भांडणात कोणीही तिऱ्हाईत गेला तरी त्याला पद्धतशीर बाजूला जावे लागते. नळावरील भांडण हे सासुरवाशीण महिलेचे हृद्‌गत मोकळे करण्यासाठी मांडलेले एक विरेचक प्रदर्शन आहे. येथे पाहणे आणि ऐकणे एकाच वेळी तुल्यबळाने तुमचा विरंगुळा झालेले असते. संत तुकाराम 'निंदकाचे घर असावे शेजारी' असे लिहून गेला, पण या ब्रीदात केवढा भावार्थ आहे. एक तर तुम्हाला शेजार असला पाहिजे. तोही निंदा करणारा, तुमच्याशी सतत भांडणारा. निंदक जेव्हा आपली निंदा करतो तेव्हा त्याचे चिंतन हे तुमचे आत्मचिंतन झालेले असते. तो तुम्हाला चार शिव्या देऊन गार करीत नाही, तर त्या ऐकून शिवापासून निर्माण झालेली शिवी तुम्हाला परखड परीक्षणात नेते. निंदक आपल्या निंदेतून अतिरिक्त निंदा मोकळी करून तिच्यावर क्षणभर भांबावतो. लगेच समंजस होऊन आपले अनावर रूप विरेचनानंतर शुद्ध करून घेतो. आता मात्र शेजारी निंदकाशिवाय पर्याय नसतो.

परवा मी वर्गात कवितेची निर्मितिप्रक्रिया समजावून देत होतो. वर्डस्वर्थने 'उत्स्फूर्त भावनेचा आवेग' या निर्मितीमागे असल्याचा आपला अनुभव सांगितला आहे. मला वाटते या निर्मितीद्वारे आपला भावपूर्ण आवेग हलका करणे आणि आपल्या मनसोक्त भांडणाद्वारे तुंबून राहिलेला भावनेचा आवेग मोकळा करणे यात काय फरक आहे? दोन्हींतही शब्दांद्वारेच आपल्या भावनेला वाट मिळते. भांडणे किंवा सृजन करणे म्हणजेच विरेचनातून शुद्धीकरण करणे होय. ऋषीमुनींच्या शापातून आलेली वाणी किंवा आकाशातून आलेली देववाणी या शेवटी अनावर भावनेचा निचरा काढण्यासाठी केलेला एक खेळ आहे. मी मैफलीत रंगत चाललो. गाणे ऐकून एखादा श्रोता निर्विकार राहतो, तर दुसरा अतिभावविवश होऊन गाण्यापासून विभक्त होतो. दोघेही अनावरच.

एक अतिनॉर्मल तर दुसरा अब्नॉर्मल. केशवसुत ' गाण्याने श्रम हलके होतात ' असे सांगून गेले. यामुळेच मैफलीला रंग भरतो. गाणारा व ऐकणारा समान पातळीवर यावा आणि दोघांचेही समतोलाने शुद्धीकरण व्हावे, असे भाग्य फारच विरळ असते.

तुमचा व्यवसाय अतिरिक्त पातळीवर जातो तेव्हा तो कवडीमोल होतो. चालताना तुम्ही जेव्हा थकून जाता तेव्हा पुढची वाट दिसत नाही. तुम्ही झोपेच्या आहारी जाऊन स्वत:ची जागृती नष्ट करून घेता किंवा निद्रानाश या रोगाने तुमचे उघडेवागडे रूपही आंधळे होते. निर्जला एकादशी तुम्हाला परवडत नाही किंवा खादाड भूक तुम्हाला मानवत नाही. तुमच्या दोन्ही डोळ्यांना तेवढेच दिसते. दोन्ही कानांना तितकेच ऐकू येते. तुमचा प्रवास ' किती चालावे भराभर तर दोन्ही पाय बरोबर ' एवढाच उरतो. ही सगळी द्वंद्वे एकमेकांचा समतोल सांभाळणारी आहेत. आपली अवयवे समधातता बाळगतात, पण अवयवांनी सांधलेला माणूस मात्र अशी समतोलवादी भूमिका घेत नाही. सकाळ पासून रात्रीपर्यंत तो टप्प्याटप्प्यातून कधी अनावर तर कधी अनासक्त होऊन आपले जगणे बिघडलेले असते. अशा वेळी निंदेचे भांडवल करून, भांडणाचे निमित्त करून आपले दैनंदिन जगणे शाबूत ठेवणे ही माणसाची धडपड असते.

कुठल्याही चाकोरीबाहेर येणे ही मनाची सहजप्रवृत्ती असते. प्रयोजन नसलेले जगणे ही एक तल्लीनता असते, तसेच प्रयोजन नसलेले भांडण ही देखील एक मन:शांती आहे. कलावंत ' शब्दच आमच्या जीवाचे जीवन ' असे म्हणतो तेव्हा हेच शब्द भांडण्यासाठी आसुसलेले असतात. राग आणि अनुराग एकाच नाण्याच्या दोन बाजू भांडणातून आलटूनपालटून एकमेकांना उजाळा देतात. पौर्णिमेचा चंद्र पाहून अनावर झालेल्या लाटा किंवा प्रतिपदेचा चंद्र, सखोल तळाशी नसलेल्या लाटा यांच्या नशिबी कधीसुद्धा चिरकाल लौकिक नाही. आत्यंतिकता किंवा अतिरिक्तता यांनीच या दोन अविभाज्य बाजू डागलेल्या असल्यामुळे त्या उजळू शकत नाहीत. निसर्गातील कडाक्याचे ऊन, वादळी पाऊस आणि कडक हिवाळा जेव्हा वसुंधरा परिधान करते तेव्हा तिचे रूप दुभंगलेले असते. तिची ही अनावर किमया बाहेर येऊनच तिला बाळसे आलेले असते.

तत्त्वज्ञ अरिस्टॉटल कॅथार्सिस तत्त्व ज्या अजाण क्षणी कलाकृतीच्या संदर्भात सांगून गेला त्याच क्षणी मानवी जीवनाची रोजनिशी या तत्त्वाशी बांधून राहिली. तुम्ही ' काल ' चे ऋण घेऊन ' आज ' जगता आणि ' उद्या ' -

साठी अधीर होता. तेव्हा या तिन्ही टप्प्यांवर भरती आणि ओहोटी यांचा खेळ खालीवर करतो. अशावेळी अनावर झालेली कल्पना 'व्यवहारशून्य' होऊन भांडणाद्वारे फेकणे अगत्याचे असते. बाजारात न विकलेली भेंडी तुमच्याभोवती आता विरंगुळा घेऊन येते. मांजराचे भांडण तुमचा पेच सोडवते. अतिरिक्त जगण्याची लालसा आणि अनावर झालेली मरणाची ओढ यांचे जोपर्यंत कॅथार्सिस होत नाही तोपर्यंत सुखी जगणे हाती लागत नाही.

आज मी परत आठवडे बाजारात फिरत आहे. माझ्या आजूबाजूला ताजी रसरसशीत भाजी दिसते. मी प्रत्येक भाजीची चौकशी करतो. अलिबाबाच्या या अपूर्व खाणीत माझे डोळे दिपून जातात. अशा वेळी मी अनावर होऊ नये काय ? माझ्या किडलेल्या भेंड्यांपासून बायको रागावली. ती भांडत राहिली. आम्ही दोघेही अनावर होऊन एकमेकांपासून दूर झालो. बाजारात मिळालेला विरंगुळा घरात नाहीसा झाला. दुसऱ्या आठवड्यात मी पुन्हा बाजारात जाऊन मागचे पाढे म्हटले. आठवडे बाजार आणि आठवडे भांडण यांना जोडणारी कॅथार्सिसची प्रक्रिया जोपर्यंत आहे तोपर्यंत भाजीबाजारात मनसोक्त फिरणे माझ्या अंगवळणी पडणारे आहे. माझी बायको, तिला तर भांडणाशिवाय आकार, विकार नाही. यात निचरा आणि शुद्धीकरण येते आणि जाते. मानवी जीवन कॅथार्सिसने केवढे व्यापले आहे !

# १९ / साभार परत

अलीकडे मला पोस्टमनची वाट पाहताना मनस्वी विरंगुळा मिळतो. मी खिडकीशेजारी खुर्ची टाकून तासन्तास कधी पोस्टमन येईल याकडे लक्ष देऊन असतो. सकाळी आणि दुपारी त्याची येण्याची वेळ झाली की मी आतुर होतो. रविवार किंवा सुट्टीचा दिवस हे मला जाता जात नाहीत. या दिवशी मी रात्री झोपतो ते उद्या सकाळी आपल्या दारात पोस्टमन येणार या आशेनेच. या पोस्टमनचा पोशाख मी दुरून ओळखतो. त्याचे माझ्या वसाहतीमधील आगमन माझी उत्कंठा वाढविते व त्याची पावले जेव्हा घराकडे येऊ लागतात तेव्हा माझा आनंद गगनात मावत नाही. मी माझ्या घराला पत्रासाठी पेटी केली नाही. कारण पोस्टमनने रूक्षपणे यावे आणि नकळत या पेटीत पत्रे टाकावीत हे मला मान्य नाही. मी हॉलच्या दोन्ही खिडक्या अशा उघडतो की त्या या पोस्टमनला दिसाव्यात. त्यातून त्याने पत्रे टाकावीत. पण याहीपेक्षा या खिडक्यांच्या खाली मी आतुरतेने बसलो आहे याकडे त्याचे लक्ष जावे. मोठ्या रसिकतेने त्याने टाकलेल्या पत्रावर आपली नजर जावी. नंतर ते पत्र उमलावे; नव्हे त्याला कुरवाळून जवळ करावे, असा माझा नित्याचा परिपाठ आहे.

माझ्या पाहण्यातला देवमण नावाचा पोस्टमन माझ्या मोठ्या कुतूहलाचा विषय आहे. त्याने आपल्या वयाची साठी ओलांडली आहे. तो नित्य नेमाने कार्यालयातून सर्व पत्रे आपल्या पिशवीत घेतो. नंतर एका झाडाखाली निवांत बसून त्याची छाननी करतो. त्यातील मजकूर वाचतो. ज्या मजकुराचा माणूस आपल्यासमोर येतो त्याला तो मजकूर अगोदरच सांगतो. नंतर हे पत्र तो त्याला

देतो. देवमण पोस्टाचे पाकीट देखील अशा काही हस्तलाघवाने फोडतो की इतरांना ते सीलबंदच वाटावे. मात्र मजकूर अगोदर समजल्यामुळे त्याच्या अंतर्ज्ञानाचे कौतुक करावे. मानवी सुखदु:खाची पत्रे वाचून देवमण जीवनाकडे अलिप्त भावनेने पाहतो. पत्रातील दु:ख इतरांना सांगताना भावविवश होत नाही किंवा त्यातील सुख, आनंद व्यक्त करताना तो भावशून्यही होत नाही. जणू आपल्याजवळची विविध पत्रे आपल्या अनुभूतीचे विविध नमुने आहेत. ती वाचून आपण या माणसांना धीर देत आहोत अशी त्याची धारणा असते. देवमण आठवडे बाजारात जेव्हा पत्रे वाटतो तेव्हा या पत्रांबरोबर भाजीपाल्याचा भाव आणि त्याचा मोबदला पिशवीत पडावा अशी इच्छा व्यक्त करतो. आपण दीडदमडीचे पोस्टमन असलो तरी त्याने दिलेले पत्र हे लाख मोलाचे असल्याने त्याची किंमत मला तितकीच मोलाची वाटते.

देवमणच काय, मला कुठलाही पोस्टमन पत्रामुळे देवदूतच वाटतो. विद्यार्थीदशेत शिकत असताना वडिलांकडून पैसे मागविताना मी जे पत्र लिहीत असे त्यातील मायना रूक्ष व्यवहारी असेल, पण तो ज्या पत्राद्वारे प्रकट होई त्याचे रूप काही और होते. पुढे तरुण वयात प्रेमपत्रे आपण कशी लिहावीत याची मला धास्ती लागली. एकवेळ आपणास प्रेम करता आले नाही तरी चालेल, पण प्रेमपत्र लिहिता आले पाहिजे अशी माझी भूमिका होती. रुक्मिणीने ज्या आत्मीयतेने आपले प्रेमपत्र सुदेव ब्राह्मणाकरवी कृष्णाकडे पाठविले तो दूत केवढा भाग्यवान असेल. दोन प्रेमिकांची जुळलेली मने तो आपल्या हस्ते घेऊन जात होता, आणि एका मनाची पावती दुसऱ्या मनाला देत होता. पूर्वी हे कार्य कबूतरे करीत. जी कबूतरे शांततेचे प्रतीक म्हणून पं. नेहरूंनी आकाशात सोडली तीच कबूतरे खरी म्हणजे विविध पत्रांतून आपला न्याय्य वारसाहक्क उड्डाणाद्वारे स्पष्ट करतात. कालिदासाचा मेघदूत केवळ यक्षाचा सांगकाम्या राहत नाही, तर तो प्रेमरसाने ओथंबलेले शब्दातीत पत्र आपल्या प्रवासात बाळगून ठेवतो. साऱ्या प्रवासभर त्याला सांभाळून यक्षाच्या पत्नीकडे पोचते करतो. एका मनाची आठवण दुसऱ्या मनाला सांगणे हे पत्राचे कार्य असेल, पण ते पत्र तितक्याच रसिकतेने इतरांना अचूकपणे पोचते करणे ही बाब मला त्याहून रसिकपूर्ण व कठीण वाटते. पत्राच्या कार्डावरील मजकूर मी रोखठोक एका दमात वाचतो. हे कार्य मला कपातून बशीत चहा ओतून गप्पकन प्याल्यासारखे वाटते. अंतर्देशीय पत्रे वाचताना आपण ते केवढ्या आतुरतेने फोडले यावरच माझे लक्ष केंद्रित होते. या पत्रावर ‘ येथे फोडा ’ असा मजकूर

जेथे लिहिलेला असतो, नेमकी ती जागा सोडून मी ते पत्र फाडतो. हे कार्य मला फूल आणि पान यांना न ओळखता झाड ओरबाडल्यासारखे वाटते. मी जेव्हा पत्राचे पाकीट पाहतो तेव्हा माझी नजर 'प्रेषक कोण' याकडे जाते. हा प्रेषक आपली जिज्ञासा जागृत करणारा असेल तर हे पाकीट मला आलटूनपालटून पाहावेसे वाटते. फक्त प्रौढांसाठी असणारा चित्रपट जसा कुमारांचा कुतूहलाचा विषय होतो तसे हे 'अमक्याने फोडावे' असलेले पाकिट मला उत्कंठा देते. अशा वेळी खिडकीतून एखादे मांजर अलगद चोरपावलाने घरात शिरावे तसे मी पाकीटात डोकावून पाहतो, व पुन्हा त्याला सीलबंद करतो. त्यातही या पत्रावरील कमी तिकिटे तुम्हाला जो भुर्दंड देतात त्याचा राग तर नसतोच, पण त्यामुळे हे पत्र आपल्याला हमखास मिळाले याचे अपूर्व समाधान असते.

विविध नमुन्यांची पत्रे गोळा करणे, त्याचा अल्बम तयार करणे हा माझा छंद आहे. साहित्यिकांची पत्रे, क्रीडापटूंकडून आलेली पत्रे, घरगुती पत्रे या अल्बममध्ये सुशोभित झालेली आहेत. ही पत्रे त्यातील स्वच्छ व सुंदर अक्षरांमुळे, त्यातील बहुरंगी मजकुरामुळे आणि त्यावरील अजब पत्त्यामुळे मला ठेवण्यासारखी वाटतात. या पत्राखालची सही माझी नजर ओढून घेते. सानेगुरुजींची सुंदर पत्रे वाचून मी गुरुजींच्या मनाचा बांधील झालो. त्यांच्या सुंदर पत्रांमुळेच तरुण मने उफाळून आली. समतेकडे धावली. निसर्गाशी एकरून झाली. त्यांनी स्वातंत्र्याची ज्योत प्रज्वलित केली. समाजवादाची शपथ घेतली. गुरुजींच्या पत्रांना अक्षरवाङ्मयाचे स्वरूप मिळते, ही त्या पत्रांची केवढी थोरवी आहे! पं. नेहरूंनी इंदिरा गांधींना जी पत्रे लिहिली त्यातून राजकीय जीवनाचा जो चलच्चित्रपट व्यक्त झाला तो भावनिक जीवनापेक्षा अधिक मोलाचा आहे. ही पत्रे लिहून नेहरूंनी आपला मुत्सद्दीपणा तर सिद्ध केलाच, पण पुढे या मुलीने देखील आपला वारसा सुसंगतपणे चालविला. पत्रे राजकीय जीवनाला एका दमात विसंगतीकडून सुसंगतीकडे नेतात. सामाजिक जीवनास विषमतेकडून समतेकडे खेचतात, तर कौटुंबिक जीवनास भावनांकडून विचारांकडे ओढतात.

उशिरा आलेली पत्रे क्षणभर राग दाखवतील. लवकर आलेली पत्रे त्यातील माधुर्य सांगतील, तर वेळेवर आलेली पत्रे तुमच्या जगण्याचा अर्थ स्पष्ट करतील. वेळेवर लग्न होणे हा जसा 'देवाघरचा न्याय' आहे तसे पत्राने वेळेवर घरात येणे 'पायगुणाचे' आहे. तुम्ही पत्रातील अक्षरांवर नजर ठेवा. लिहिणारा तुमच्यासमोर उभा राहतो. तुमचे कासवी प्रेम परस्परांना दिलासा

देऊन जाते. जसे अक्षर तसे मन, हे तत्त्व पत्रांना मान्य नाही. पत्रे कसलेही अक्षर आपलेपणाने स्वीकारतात. तुमचे अक्षर ओबडधोबड, न समजणारे असू द्या. ज्याप्रमाणे चिखलातून कमळ वर येते तसे या पत्रातून पाणीदार मने वर येतात. पत्राची भाषा हृदयाची असल्याने हे कार्य इथे 'इये हृदयीची तिये हृदयी घातले' या भूमिकेचा वारसा घेणारे असते. दिवसभर तुम्ही तापत्रयाने होरपळून जाता तेव्हा अशी पत्रे तुम्हाला संजीवनी देतात. नल-दमयंती, रुक्मिणी-कृष्ण, कच-देवयानी किंवा सुभद्रा-अर्जुन या जोडप्यांना आपला व्यवहार पत्राद्वारे स्पष्ट करता आला. 'मूकं करोति वाचालम्' अशी त्यांची पत्रे होती. एकमेकांच्या दिलाचा दिलवर एकमेकांच्या पत्रातून दिसत होता. म्हणून त्यांची स्वयंवरे पौराणिक संदर्भ घेऊन आजही सामाजिक क्रांतीला आव्हान देणारी आहेत. या प्रेम-सृष्टीतील नवे नवे उन्मेष आजही नित्यनूतन वाटतात. प्रतिभावंतास धीर देतात. त्यातून पत्रसृष्टीचा अपूर्व महिमाच दिसून येतो.

ज्याला चांगले पत्र लिहिता येते तो पत्रकार, अशी माझी सोपी व्याख्या आहे. पत्रकार हा व्यासंगी व चौफेर बुद्धीचा असावा याबद्दल दुमत नाही. पण मला ही बाब दुय्यम वाटते. जर या पत्रकारास पत्र कसे लिहावे, त्यातील औचित्य कसे साधावे, या पत्राचा सुभग शेवट कसा करावा याचे प्राथमिक ज्ञान नसेल तर तो कवडीमोल आहे. पत्रकार जेव्हा राजकीय, सामाजिक आणि वैचारिक पातळीवर ध्येयधुंद होऊन तरंगतो, तेव्हा त्याचे पत्रातील लेखनकौशल्य ओतप्रोत भरलेले असते. आईच्या उदरातून बाहेर आलेले मूल स्वयंभू व परिपूर्ण असते. या मुलाचेच प्रौढात रूपांतर होते. तशी ही वृत्तपत्रे तुमच्या आठवणीवजा पत्राचे आगळे रूप आहे. मुले वयाने मोठी होतात, तशी मनाने परिपूर्ण होतात. तशी ही वृत्तपत्रे आहेत. भारतीय संस्कृतीचा अविभाज्य घटक म्हणून वृत्तपत्रे नावाजलेली असतील, तर या संस्कृतीचा आकर्षक उगम तुमच्या आमच्या दैनंदिन जीवनातील वाहणारा आहे. ज्याला आपल्या जगण्याचा मुद्दा साकार करायचा असेल त्याने आपल्यापुढे कागद घ्यावा आणि त्यावर तितकाच वळणदार मजकूर लिहून आपले पत्र पूर्ण करावे. तुमची भांडवलशाही, सरंजामशाही आणि लोकशाही या पत्रातील शाईने जेव्हा धुतल्या जातील तेव्हा त्यांना समाजात विचाराचे, आचाराचे अधिष्ठान मिळेल. या अपूर्ण किमयेला तोड नाही.

एखाद्या वाळवंटात चुकून हिरवळ दिसावी तसे सुंदर पत्र तुमच्या ओसाड जीवनात हुरूप आणून देते. हे पत्र आकाशाला मुठीत घेते. पंखाच्या पिसाऱ्यात

भरारी आणून देते. अथांग समुद्र घोटात घेते. अजिंक्य दुनिया क्षणात जिंकता येते. याक्षणी जगण्याचा चुकलेला पाढा ही पत्रे वाचून सहीसलामत सुटला जातो. पत्रे जीवनाला अर्थ आणून देतात तर परमगंध दरवळून जातात. विविधरंगाचे चष्मे परिधान करून जगाकडे पाहावे तो विविध पत्रांचे नमुने तुम्हाला आठवतील. युद्धभूमीवर सैनिक लढाई जिंकतात आणि आनंद पत्राद्वारे आपल्या घरी कळवितात.

मी जेव्हा उदासीनतेने घेरला जातो तेव्हा ही पत्रे मला बालकवींच्या कवितेसारखी दिसतात. अशाच एका भव्य पहाटे मी एक पत्र लिहिले. पुन्हा पुन्हा ते वाचून घेतले. आता ते आपणांस दिसणार नाही या खेदाने पाकिटात बंद केले. मोठ्या कलात्मकतेने त्यावर पत्ता लिहिला. डाव्या बाजूला स्वत:चा पत्ता लिहिला आणि पत्र नक्की मिळावे म्हणून दहा पैशाचे कमी तिकीट लावून खात्रीपूर्वक पत्रपेटीत टाकले. या गोष्टीला पंधरा दिवस झाले. आपल्या पत्राची पोच येईल या आशेने मी माझ्या लाडक्या खिडकीखाली खुर्ची ठेवून या पत्रोत्तराची वाट पाहात होतो. रोज पोस्टमन येत होता. तो चंद्राच्या कलेप्रमाणे नवा साज चढवलेला दिसत होता. मात्र त्याचे येणे व माझे निराश होणे आता अंगवळणी झाले होते. इतक्यात त्या पोस्टमनने एक पाकीट या खिडकीवाटे घरात टाकून दिले. नेमका यावेळी मी तिथे नव्हतो. क्षणात मी आलो व या पाकिटावर नजर फेकली. हातात घेतले, तो काय ? आपणच लिहिलेले पाकीट 'साभार परत' आले आहे. मी मनाशी कसलाही विचार न करता ते पाकीट जवळ घेऊन 'मम सुखाचि ठेव' म्हणून खिशात घातले. कुणी तरी मला सांगत होते, पत्रे येतात-जातात पण ती कुठेच थांबत नाहीत. म्हणूनच मला माझीच पोच पुन्हा पुन्हा हवी आहे.

# २० / प्राजक्ताशी जडले नाते

मी पाहतो तो काय, मागचा पारिजात एकदम वाळला आहे. मला सकाळी भली मोठी परडी भरून फुले देणारा पारिजात आज असा एकाकी वाळून जावा! ऐन रंगात नृत्य यावे आणि नर्तकी कोसळून जावी, मैफलीच्या अगदी समेवरच गायकास मुकेपण यावे आणि उत्कर्षाच्या बिंदूवर चित्रकाराचा कुंचला दुभंगून जावा तसे या पारिजातकाचे तर झाले नाही ना ? जो आमच्या घराचे अंगण सुगंधित करायचा, गंधर्व नगरीचा परिमल साऱ्या वसाहतीत दरवळून द्यायचा. त्यास कुणा पाप्याची नजर तर लागली नाही ना ? माझे जसे घराचे एक स्वप्न होते तसेच परिसरातील एका बागेचेही स्वप्न होते. अलीकडे मध्यमवर्गास घर बांधणे म्हणजे कर्जाचे हप्ते आयुष्यभर देत राहणे असा एक नेम झाला आहे. अशा वेळी हृदयागणिक पारिजाताचा परिमल नवा धीर, नवा दिलासा देणारा होता. तोच लख्ख उन्हात एकदम आकाश भरून यावे, काळाकुट्ट अंधार अंगणभर पडावा तसे आज पारिजाताशिवाय सारे घर प्रकाशहीन, गंधहीन झाले आहे. सारे कसे सुने सुने वाटते.

तसे पाहता, गेल्या दोन वर्षांपासून मी कितीतरी वेदना या पारिजातास बहाल करीत आलो आहे. कै. नरहरी कुरुंदकरासारखा पहाडी माणूस व्यासपीठवर उभा राहतो काय नि कोसळतो काय! सारेच काही मती कुंठित करणारे. अगदी डोळ्यांसमोर पाहता पाहता एक पुरोगामी व्यासपीठ अंदाज न देता, न घेता रिकामे होते. ही वेदना माझ्या हृदयाच्या अंतर्हृदयात मला नाना कळा देत होती. अशी जखडवून टाकणारी वेदना देखील या पारिजाताने जखमेवर जशी खपली बसावी तशी अलगद भरून सोडली होती. रंग, गंध, स्पर्श, रूप आणि

नाद या संवेदनासुद्धा शेवटी एकेक वेदनाच घेऊन येणाऱ्या आहेत. त्याच्या पण अलगद या प्राजक्ताची फुले टिपीत. एखादी वेदना या फुलाच्या पाकळीवर काही काळ तरंगत असे; आणि वाऱ्याबरोबर जो या फुलांचा परिमल आसमंतात जायचा तोच मुळी या वेदनेसह. आपले या गंधाचे आणि वेदनेचे साम्राज्य या वसुंधरेवर एखाद्या सार्वभौम राजाने पसरावे तशी ऐट या प्राजक्त वृक्षाची असे. माझ्या लहानपणी गुरुजींनी 'दु:ख देवास सांगावे' अशी सुंदरशी सुभाषितवजा काव्यरचना मनाच्या खोल गाभ्यात रुजविली होती. पुढे मी मोठा झालो. घरवाला झालो आणि याच मनाच्या खोल गाभ्यात प्राजक्त आणि दु:ख यांचे लागेबांधे रुजवून बसलो.

जेव्हा रोज सकाळी प्राजक्ताची फुले लुटायला माझ्या अंगणात गर्दी होई तेव्हा मी मागच्या दारी उभा राहून या गर्दीशी हितगुज करायचा. माझे लक्ष मात्र प्राजक्ताचे एकएक फूल वेधून घेत असे. मी या मुलांना सांगत असे, 'ही फुले अशी वेचू नका. तुरा खोवलेला कोंबडा जसे दाणे टिपतो ना, तशी तुम्ही फुले टिपा. एकाच वेळी फूल आणि सुगंध लुटत जा. फुलं वेचली की तुमची भरलेली परडी बाजूला ठेवा. क्षणभर प्राजक्तखालची जमीन नाकाने हुंगा. तुमचे घ्राणेंद्रिय आपल्या सार्थकतेचा अपूर्व इतिहास घडवून जाईल. पुन्हा प्राजक्तास एखादा सुखद स्पर्श द्या. तुमचे स्पर्शेंद्रिय आपल्या मुलायमतेचा गोडवा गाईल. क्षणभर तुम्ही डोळे मिटून झाडासमोर उभे रहा. तुमचे चक्षु अलिबाबाच्या गुहेत तेज:पुंज झालेले असतील.' वस्तुत: हे सारे काही मी बोलत असे, आणि मन मात्र फुला-फुलांवर जडत जायचे. तो माझा आणि मी त्याचा एवढी अद्वैतता आम्ही परस्परांनी स्वीकारली होती. सकाळी त्याचे ते नयनरम्य दर्शन मी दिवसभर 'सुंदर ते ध्यान' असे मनात बाळगून ठेवी आणि दिवसाची रात्र तसेच रात्रीचा दिवस कसा होई याचा थांगपत्ता लागत नसे.

महाभारतात कुंती श्रीकृष्णास संकटाचे वरदान मागणारी म्हणून चितारलेली आहे. मी श्रीकृष्णास वरदान मागतेवेळी थोडी दुरुस्ती करून सांगेन - 'हे मधुसूदना ! माझ्या संकटास प्राजक्ताची किनार दे.' रुक्मिणी आणि सत्यभामा यांच्या प्रीतीतील निवाडा या प्राजक्ताने केला आणि श्रीकृष्णभक्तीचा पाढा अजरामर करून दिला तोच हा पारिजातक आज माझ्या वेदनेपासून दूर जात आहे. समुद्रमंथनातून जी रत्ने बाहेर आली त्यात एक अवर्णनीय असे प्राजक्त रत्न होते. हे रत्न एखाद्यास अलौकिक देणगी म्हणून अवगत व्हावे. आणि

लगेच ते नतद्रष्टाने हस्तगत करावे, एकदम बेपत्ता व्हावे, तसे आज मला झाले आहे. मृगाने कस्तुरीचा गंध शोधता शोधताच जवळची कस्तुरीच फेकून द्यावी, कर्णाची अंगीकृत कवचकुंडले चोरली जावीत, घरट्यात पक्षिणीसमोर पंख फुटलेले पाखरू कोसळून पडावे तसे आज मला झाले आहे. मी रात्री आकाशाकडे पाहतो आणि चांदण्या प्राजक्त म्हणून मोजतो. सूर्योदय आणि सूर्यास्ताच्या वेळची लाली याच प्राजक्त फुलांच्या देठातून रंगलेली तर नाही ना, या सुखद कल्पनेने मनास भुरळ पडते.

आपली वेदना 'हे विश्वचि माझे घर' अशी चिरव्यापी होते, तेव्हा ती प्राजक्ताच्या दालनातून आलेली असते. तसेच 'रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग' ही संतवाणीच्या प्रतिभेतून निघाली असेल तिचा नवा नवा उन्मेष प्राजक्ताच्या फुलाचाच असेल. कालिदासाचा यक्ष मेघदूताबरोबर आपला निरोप देताना ही फुले देण्यास उत्सुक होता अशी माझी खात्री आहे. कारण विरहाची वेदना 'सह-अनुकृती' म्हणून घेणारे एकमेव फूल म्हणजे प्राजक्त होय. मंदार राग आणि प्राजक्तराज एकमेकांवर एवढे विसंबून असतात की त्यांना चक्रवाक पक्ष्यांप्रमाणे विभक्त होणे कठीण! एकाची सुरांची खुलावट आणि दुसऱ्याची गंधाची, रंगावर परस्परांना अनुरक्त करून सोडते. कधी रागाने अनुरागाकडे तर कधी अनुरागाने रागाकडे यावे, जावे असा हा लपंडाव आहे. परंतु माझ्या पाहण्यात असे काही कपाळकरंटे आहेत की ज्यांना मंदार आळविता येतो, परंतु प्राजक्ताचा उपभोग घेता येत नाही. धृतराष्ट्र हा जन्मांधळा होता आणि पतिव्रता गांधारी डोळे असून आंधळी होती. दोघांचे दुःख व्यासाच्या प्रतिभेने वेदनेतून रंगविले आहे. माझी खात्री आहे की, या दोघांची खरी वेदना आपण मुक्तपणे पारिजात पाहात नाही. अशी ही वेदना आणि प्राजक्त एकमेकांस सूर देतात. माझा प्राजक्त असा एकदम का कोसळला? वनस्पतिशास्त्र सांगते अतिपावसाने एखादे झाड असे एकाएकी वाळून जाते. त्याच्या मुळास रोग जडतो आणि मुळे जळाली की वरचे सारे झाडच कोसळून जाते. मी तुम्हास विचारतो, मग मुळाशी असलेली तुमची वेदना का जळू नये? पण ती आता वर अधिक फोफावून येत आहे. एखाद्या माणसाने अंथरुणावर रोगाने त्रस्त होऊन मरण्यापेक्षा एकदम कोसळून पडणे केव्हाही भव्य आणि दिव्य आहे. कारण असे मरण जगण्याच्या थ्रिलमधून आलेले असते. पण कोणतेही मरण जी वेदना देत इतर मरणाचा स्वीकार करते तिची वाट तुम्ही कशी लावाल? माझ्या प्राजक्ताच्या मुळाशी वेदना होती, नव्हे आहेच. ती मुळी आमच्या

जीवनाची 'संजीवनी' आहे. याच वेदनेसह हा प्राजक्त जळून खाक झाला असेल तर ते दुःख पेलणारे आहे. जगात अशी काही दुःखे असतात ती निर्भेळपणे स्वीकारायची असतात. आज माझ्या दारी प्राजक्त नाही हे दुःख मी निर्भेळपणे उपभोगत आहे. निर्भय वृत्ती आणि निर्लेप भक्ती या द्वंद्वास सांधणारी वेदना जेव्हा पोरकी होते तेव्हा अशा प्राजक्ताची आठवण पोखरून काढते.

मानवी जीवनाचा प्रवास शून्यातून शून्याकडे जाणारा असेल तर हे शून्य अंगणात लावलेल्या प्राजक्ताच्या आळ्याएवढे मोठे असेल. म्हणून मी जेव्हा शून्यातून शून्याकडेच पाहतो तेव्हा केवळ प्राजक्तच पाहतो. मी जेव्हा आकाश झेलण्याचा प्रयत्न करतो तेव्हा देखील माझ्या अंगी जे बळ येते ते देखील प्राजक्ताचेच आंदण असते. निर्मळ आणि मुलायम फुले जेवढी सुकुमार तेवढीच कणखर असतात. जणू काही ती सांगू पाहतात 'मऊ मेणाहूनी आम्ही विष्णुदास, कठीण व्रजास भेदू ऐसे' अशी ही प्राजक्ताची संतभूमी आहे. पुण्यभूमी आहे. मला सुकृताची जोड देणारा प्राजक्त जेव्हा वाळला तेव्हा तो एक वेदना देऊन गेला. आता दुसरी वेदना शिल्लक आहे, ती पोरकी आहे. तुमच्या शून्याची धाव शून्याकडेच तशी वेदनेची धाव वेदनेकडेच. मला जेव्हा प्राजक्ताविना अंगण उदास दिसते तेव्हा समग्र मनोभूमीच उदास दिसते. पंखाची भरारी नक्षत्राशी नाते जोडते. लाटांशी नाते जोडताना किनाऱ्याशी जुळवून घ्यावे लागते. प्राजक्ताशी नाते जोडताना सारी वसुंधरा आपलीशी करावी लागते. वसुंधरा गंधवती आहे. ऋतुवती आहे. तितकीच ती अतुलनीय अशी सहनशील आहे. जो प्राजक्त वसुंधरेच्या अपूर्व वात्सल्याखाली लहानाचा मोठा होतो तो आपल्या अंगात मातृत्वाचे गुणधर्म घेऊन डोलत असतो. अशा वेळी वसुंधरेची वेदना हीच त्याची वेदना असते. मग तुम्ही-आम्ही तरी कोण? याच वसुंधरेचे लाडके पुत्र आहोत. हीच भावना प्राजक्ताशी नाते जोडते. इंद्राने स्वर्गातून पृथ्वीवर प्राजक्त आंदण म्हणून फेकून दिला. प्राजक्ताने येथे येताना चांदण्या पाहून आपल्या फुलांना जन्म दिला. खाली समुद्रातून लाटांबरोबर थेंब वर आकाशात जातात आणि चांदण्या होतात. पुन्हा या चांदण्या खाली प्राजक्त-फुले बनतात. असे हे अतूट, अक्षय चक्र आहे. पारिजात बहरून येतो तेव्हा घराचे जगणेच सोने झालेले असते. तो जेव्हा पार कोसळून जातो तेव्हा साऱ्या घराचे छप्पर उडून ते मुळी उदास आकाशाकडे टक लावून पाहते एकच धून आठवीत, आळवीत, 'प्राजक्ताशी जडले नाते.'

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
विभाग
दा. क्र. 3408
24669
ग्रंथ शाखा

# २१ / हेचि सर्व सुख

अलिबाबाची गुहा पाहून डोळे दिपून जावे तसे पुस्तकाचे दुकान पाहून मला होते. रंगीबेरंगी मुखपृष्ठ, वेगवेगळे आकार माझ्या मनाला भुरळ पाडून जातात. पुस्तकांची नावे वाचताक्षणी माझी नजर खिळते ती या पुस्तकाच्या बांधणीवर. मी ते पुस्तक प्रथम हातात घेतो, त्याला नाजूक तऱ्हेने कुरवाळतो, मागेपुढे त्याला निरखून त्याचे मनापासून कौतुक करतो आणि क्षणभर मी त्याचां होऊन जातो. मला अजूनही या पुस्तकाची किंमत दिसलेली नसते. काही वेळा ती दिसते पण पटत नाही. माझ्या जागी मूल्यवान पुस्तके कधीच महागडी नसतात. ती मला कधीच अमूल्य वाटत नाहीत. किंबहुना स्वस्त किमतीची पुस्तके मला कधीच सापडत नाहीत. माझ्या मते पुस्तके रुपयांच्या राज्यात कधीच वावरत नाहीत. ती धनाच्या राशीचे मोल देत नाहीत की घेत नाहीत. ती ज्यांना जीवाभावाची असतात त्यांना बहुमोलाची राहतात आणि हे मोल कुठल्यातरी अतीत संज्ञेत पडलेले असते. दुकानातील पुस्तके तुमच्याकडे गिऱ्हाईक होऊन पाहत नांहीत, तर कुठले तरी लागेबांधे बांधून ती तुमच्याशी जखडलेली असतात. दुकानदार, पुस्तके आणि गिऱ्हाईक ही नाती इथे परस्परांना छेदून एकमेकांना विसरून गेलेली असतात. पुस्तकांचे गठ्ठेही मला अतूट अशी आवळ्याची मोट वाटते. विसकटलेली पुस्तके अस्ताव्यस्त पाहताना मला विसंगतीतून सुसंगतीकडे गेल्याचे दिसते. या पुस्तकांची रीतसर मांडणी मला एका लष्करी सैनिकांचे शिस्तबद्ध दृश्य आठवून देते, तर वरच्या सांदीला पडलेले त्याचे रूप मला मर्मबंधातला ठेवा आठवून देते. अशा वेळी हे पुस्तकाचे दुकान मला माझेच वाटते आणि ही सारी पुस्तके जणू काही मला बोलावतात,

आग्रहाने पुन्हा पुन्हा हितगुज करतात.

पुस्तकांची विक्री ही कल्पना व्यवहार्य असली तरी हा व्यवहार केवळ आतबट्ट्याचा नसून तो तुमच्या गतजन्मीच्या ऋणानुबंधाचा असतो. हे ऋण म्हटले तर शब्दांचे, म्हटले तर रुपयांचे, म्हटले तर नगद उधारीचे असेल; पण ते अधिक तर एकमेकांच्या अंत:करणनीतीचेच जास्त असते. इथे तुम्ही पैसे देऊन पुस्तक घेता यापेक्षाही काही तरी दिल्याशिवाय आपण काही घेऊ नये या संस्कृतीशी अधिक जवळ गेलेले असता. त्यामुळे या व्यवहारात संस्कृतिदर्शन असते. सुसंस्कृतीने, सुसंस्कृत पद्धतीने सुसंस्कृत होण्यासाठी आपल्या सुसंस्कृतीचे अदबीने केलेले हे दर्शन असते. ते जितके नाजूक तितकेच रोखठोक म्हणूनच व्यवहारशून्य असते. मालक जेव्हा अशा पुस्तकाची पावती फाडून तुमच्या हाती ठेवतो तेव्हा या पुस्तकावर तुम्ही शिक्कामोर्तब केलेले असते. हे पुस्तक आता हक्काच्या घरी चाललेले असते. कुणाच्या तरी हृदयात घर करण्यासाठी चाललेले असते. दुकान-मालकांशी जे नाते असते ते तोडून नव्या नात्याशी नवे जीवन धारण करण्यासाठी हे स्थलांतर असते. लाडकी लेक सासरी जाताना इथे मागे परतुनी पाहत नाही; एवढेच! ज्या कागदात हे पुस्तक बांधलेले असते त्यात ते सुखरूप असते. पुन्हा ते तुमच्या हातात असल्याने अधिक तुमचेच झालेले असते. आणि तुम्ही जेव्हा ते आपल्या पिशवीत टाकता तेव्हा ते कुठल्यातरी काळजात काळजीने ठाण देऊन बसलेले असते. आता हे पुस्तक आणि तुम्ही याशिवाय इतर काहीच उरलेले नसते. हे पुस्तक तुमचे आणि तुम्ही पुस्तकाचे एवढीच श्रीशिल्लक असते.

दुकानात एका पुस्तकावर तुमची नजर जेव्हा खिळते तेव्हा दुसरे तुमच्या मनाचा ठाव घेताना दिसते. अशा वेळी तुमचे लक्ष खिशाकडे जाते. तो रिकामा असूनही तुमची नजर पुस्तक ओढल्याशिवाय राहत नाही. अशा वेळी पुस्तके विकली जातात. यापेक्षा ती रास्त पद्धतीने चोरली जातात, यावर तुमचा क्षणभर विश्वास बसतो. वीज चमकून क्षणात आकाश चमकून जावे तसे तुम्ही पुस्तकाशी जखडून जाता. पुस्तक तुमच्याशी तेज:पुंज होऊन जाते. थोरामोठ्यांनी पुस्तके चोरलेली असतात, या तत्त्वाने तुम्ही विरंगुळा घेता. अशा वेळी दुकानात चक्क डाका घालण्याशिवाय पर्याय उरत नाही. तुमचे हस्तलाघव एकमेकांना साहाय्य करते. इथे चोर कोण असतो? पुस्तके की तुम्ही? या प्रश्नाला उत्तर मिळत नाही आणि चोरीला अर्थ राहत नाही.

ही चोरी एका सुसंस्कृत मनाची असते. तिने संस्कृतिसंवर्धनाची शपथ

घेतलेली असते. ही चोरी पुस्तके महाग म्हणून केलेली नसते, अथवा खिसा रिकामा म्हणून झालेली नसते तर ती जीवनव्यवहारातील अपरिहार्यतेची एक सूचना देणारी असते. तिच्यात कुठलाच ताप नसल्याने पश्चात्ताप आलेला नसतो. हे कृत्य सत्कर्माचे असल्याने त्यात पापाचा अंश नसतो. आणि हे मालकाशी नकळत घडल्याने, आपल्या आत्म्याची साक्ष घेतल्याने या सत्कर्मात काहीच नुराई राहिलेली नसते. प्रो. जिनसीवाले पुस्तकांची चोरी करीत, या वाक्याचे मी लहानपणी कित्ते गिरवले होते. आणि तेव्हा मी स्वप्नात पुस्तकांची चोरी केली होती. आज दुकानात हे स्वप्न साकार होताना कृतार्थतेचे वारे साऱ्या अंगभर वाहताना मी कृतज्ञतेने ओथंबलेला आहे. ज्या भावनेने तरुण कुणाचे तरी मन चोरतात, किंबहुना ते चोरल्याशिवाय त्याला अर्थच उरत नाही, तसे शहाणी माणसे पुस्तक चोरतात. चक्क दुकानात, दुकानदारांदेखत ती आपल्या नजाकतीने चोरली जातात. पुस्तकांची चोरी ही राजरोस सांगितली तरी शिक्षेस पात्र नाही आणि तिच्यापायी शिक्षा भोगली तरी पुढे सुधारणा होत नाही. अशी पुस्तके विकत घेण्यात समाधान नाही. ती चोरलेली असतात म्हणून शाश्वत असतात, तुमच्या नजरबंदीत असतात, म्हणूनच फक्त तुमचीच राहतात.

माझ्या हिशोबी नवी-जुनी असा पुस्तकाबाबत भेदभाव नाही. ती लहान-मोठी असा फरकही नाही. पुस्तके ही एकजात इथून तिथून एकाच तोलामोलाची जिवंत असतात. अशा वेळी पुस्तकाचे अंतरंग मला दैदिप्यमान करून जाते. रंगापेक्षा अंतरंग, आकारापेक्षा विचार आणि मांडणीपेक्षा शोधणी पुस्तकाबाबत मला महत्त्वाची वाटते. अर्ध्या किंमतीत पुस्तक विकताना ते जीर्ण म्हणून संपादणी केली जाते. लहानपणी अर्ध्या तिकिटावर प्रवास करताना मला जो राग येई त्यावेळचे समर्थन जसे लंगडे तसे हेही समर्थन मला पटणारे नाही. मुळात जी पुस्तके किमतीत मोजली जातात ती पुस्तके नसतातच, ती असतात तुमच्या देवाण-घेवाण व्यवहारातील एक रूक्ष समाचार. यात भाव असतो, भावना नसते, इथे भाव ठरविला जातो, कमी-जास्त केला जातो. पुस्तकाच्या छापील किमतीवर सूट दिली जाते आणि एकंदरीत माणुसकीलाच सूट दिलेली असते. चोरलेली पुस्तके तुमचे मन चोरतात. अर्ध्या किमतीत घेतलेली पुस्तके जीवनभर तुम्हाला अपूर्णांकच शिकवतात. सूट देऊन घेतलेली पुस्तके तुमच्या जगण्याशी घासाघीस करून जातात, तर एकजात मूळ किमतीत घेतलेली पुस्तके तुमच्यापुढे बंदा रुपया म्हणून उभी राहतात. पुस्तकाचे नाते रुपयाशी जोडतात ती केवळ व्यवहार्य असतात. जीवनभर अपरिहार्य नसतात.

मोगऱ्याच्या फुलांचे सौंदर्य जसे विक्रीत नसते तसे पुस्तकांचे तत्त्वज्ञान हे तोलामोलाचे नसते. फुले मुक्त हातांनी उधळायची असतात. आपल्या सुगंधाने वाऱ्यात मिसळून द्यायची असतात. तशी ही पुस्तके ज्योतीने ज्योत प्रज्वलित करीत त्यातील अक्षरसत्याने इथून तिथून न्यायची असतात. पुस्तके ही पुस्तकेच असतात. माणसे जशी माणुसकीशी, तशी पुस्तके ही अक्षरांशी जखडलेली असतात. ती दुकानात बंदिस्त, घरात वावरणारी, ग्रंथालयात सुपंथाने एकमेकांची आणि कपाटात केवळ देखणी असतात.

नव्या पुस्तकाला शोभेसे कव्हर घालणे हा माझा एक आवडता छंद आहे. जातिवंत शेतकरी ज्या अदबीने आपल्या बैलावर झूल चढवितो तसा मी पुस्तकाला कव्हर लावतो. हे पुस्तक यामुळे मळत नाही. हे जसे खरे, तसे ते कव्हर घातल्याने अधिक डौलदार दिसते, हे खरे आहे. शिवाय या कव्हरवर जे तुम्ही स्वत:चे नाव लिहिता त्यामुळे या पुस्तकाशी तुम्ही नावानिशी एकरूप झाल्याचे पटते. स्वत:च्या अक्षरात लिहिलेले नाव, रबरस्टँपने शिक्कामोर्तब केलेले नाव यातून माझे पुस्तक अशी आत्मीयता निर्माण झालेली असते. मला या नावाव्यतिरिक्त कव्हरवर इतर काहीच नको असते. पुस्तकाचे नाव कव्हरवर देण्यात अर्थ नसतो. हे तुमच्या स्पर्शातून कुठले ते कळले पाहिजे. तुमच्या संग्रही असलेल्या पुस्तकांत जे पुस्तक तुम्हाला हवे त्याने तुम्हाला मौनातून बोलाविले पाहिजे. ते संकेत तुमचे आणि त्याचेच असले पाहिजेत, आणि ते स्पर्शसौंदर्यातून ओळखले पाहिजे. येथे शब्दावाचून अर्थ कळतो. अर्थाशिवाय भाव मिळतो; अशी पुस्तके केवळ तुमचीच असतात. इतरांची नसतात. म्हणूनच एकनिष्ठ राहतात, होतात. ती जेव्हा तुमच्या हातात येतात तेव्हा आपले अंतरंग अलगद उघडण्यासाठी उत्सुक झालेली असतात. ज्याक्षणी तुम्ही त्यांच्या अंतरंगात शिरता त्याक्षणी तुम्ही या साम्राज्याचे धनी झालेले असता. आकाशात शिरताक्षणी चांदण्या मोजण्याचा मोह व्हावा, पण त्या मोजता येऊ नयेत, उलट आपणच एखादी चांदणी होऊन जावे तसे या पुस्तकाच्या अंतरंगी तुम्ही अक्षरबद्ध होता. हा प्रवास ज्ञानेश्वरीच्या सौंदर्याने करायचा असतो. तो हृदयसंवाद पाकळी-पाकळीतून उमजायचा असतो. हे मिलन दोन जीवांच्या सायुज्यतेची सीमा दाखविणारे असते. या पुस्तकातून ज्ञानाचा शोध घ्यायचा असतो. शोधातून आत्मबोध द्यायचा असतो. येथे देणे असते, घेणे नसते. ऋणानुबंध असतो. ऋण नसते. तुम्ही जेव्हा पुस्तकांच्या दुकानात जाता तेव्हा सलोकता या मुक्तीने तुम्हाला भुरळ पाडलेली असते. तुम्ही जेव्हा येथे पुस्तक

हाती घेऊन चाळलेले असते तेव्हा समीपतेने तुमच्यावर राज्य चालविलेले असते. जेव्हा पुस्तक घेऊन तुम्ही घरी येता, त्यास कव्हर घालून नावानिशी आपलेसे करता तेव्हा स्वरूपता या मुक्तीच्या आधीन तुम्ही झालेले असता आणि एकाग्र होऊन पुस्तकाचे अंतर्यामी विश्व तुम्ही जसे पाहाल तसे सायुज्यता मुक्तीने तुम्ही पछाडले जाल, याची खात्री बाळगा. पुस्तके जशी संस्कृतिदर्शक, तशी ती तुमच्या सुजाण संस्कृतीची द्योतक आहेत.

हातउसनी दिली-घेतलेली पुस्तके तुमच्या जीवनात एक नवे वळण देणारी असतात. आयुष्याच्या वाटचालीत अटळ रस्त्याने समोर चालत जाणे कंटाळवाणे असते. अशा वेळी मध्येच आलेले वळण नव्या हिमतीने चालण्यास धीर देते. तुमच्या संग्रही असलेली पुस्तके ही तुमचीच म्हणून ती सरळ मार्गाने जाणारी - उसनी आणलेली पुस्तके मात्र तुमची नसूनही धीर देणारी, पुढच्या प्रवासास नवा मार्ग दाखविणारी असतात. ही पुस्तके परत देण्याच्या बोलीवर आणलेली असतात. तरीसुद्धा त्यांच्या अतूट मैत्रीने ती आपलीशी करण्याचा मोह होतो. ही देखील एक प्रकारची चोरीच असते. पण तीत शास्त्रशुद्धता नसते. धाडस नसते. ती तुमच्या संग्रहात चपखल बसतात. पुस्तकात पुस्तक मिसळून जाते. हे वळण सुसंगतीचे असते. यात क्रम देखील संगतवार असतो. या पुस्तकाची संगत ही गंमत म्हणून असते. ही आणि संग्रहातील पंगत एकमेकाशी पाहुणचार घेत चाललेली असते. पुस्तकांचा संग्रह हा तुमच्या कर्तृत्वाचा असतो तर इतरांच्या लेखी तो हातचलाखीचा कार्यभाग झालेला असतो. अशा वेळी पुस्तके ही पुस्तकेच असतात. ती तुमची की आमची हा गौण भाग असतो. असे समाधान करून घ्यायचे असते.

पुस्तके जेव्हा तुमच्या जीवाचे जीवन होऊन जातात तेव्हा ती जीवाभावाशिवाय तरली जात नाहीत. तुम्ही जेव्हा शब्दांच्या धनाने समृद्धतेकडे ओढले जाता तेव्हा हे ऐश्वर्य रुपयांच्या राशीने मोजले जात नाही. तुमचे घर देखणे आहे. त्यातील स्वयंपाकघर वस्तुवस्तूंनी सुशोभित झाले आहे. माजघर त्यातील नेत्रदीपक वस्तूंना बोलावीत आहे. वास्तूला वस्तूंची शोभा. जेव्हा या वस्तूंना पुस्तकांची किनार लाभते तेव्हा तुमच्या घराची ' रुपेरी कडा ' अंधार विसरण्यासाठी येते. घराची किमया त्यातील आकर्षक फर्निचरपुढे दिसत नाही, तर ती तेथील पुस्तकांच्या अस्ताव्यस्त पुण्याईवर आहे. घर मातीचे असते. त्यातील माणसे मातीशी नाते सांगणारी असतात. याच घरातील पुस्तके मात्र या मातीशी नाते जोडून कायमची राहतात. ती भूतकाळ घेऊन वर्तमानकाळाशी

नवा संदर्भ जोडतात, तर भविष्याकडे आपले डोळे लावून नाविन्याचा उजाळा देऊन जातात. उंची कपडे तुमच्या बांधेसूद देहाला डौलदारपणा देतील, तर तुमच्याजवळ असलेले पुस्तक याच देहाचे अंतर्यामी सौंदर्य दाखवून देईल. घराचे घरपण जसे माणसांच्या माणुसकीवर तसे त्याचे अपूर्व वैभव हे त्यातील पुस्तकसंग्रहावर आहे. तुमची दिवाळी जेव्हा नव्या पुस्तकांच्या हजेरीत साजरी होते तेव्हा अवतीभवती झालेली रोषणाई अधिक तेज:पुंज झालेली असते. 'दसरा सण मोठा नाही आनंदा तोटा' या पालुपदाने तुम्ही लुटलेले सोने पुस्तकांच्या पूजेतून वृद्धिंगत झालेले असते. शुभमुहूर्त पुस्तकांशी लागेबांधे बांधून असतात ती यामुळेच.

पुस्तके ही वाचण्यासाठी असतात यावर माझा विश्वास बसत नाही. काही पुस्तके ही केवळ संग्राह्य असतात. ती तुमच्याजवळ असतात यातच अप्रूप असते. तुम्ही जेव्हा ही पुस्तके उघडून पाहता तेव्हा ती जवळून दूरची वाटतात. अशी पुस्तके जवळ असणे अधिक अगत्याचे असते. ज्ञानेश्वरीसारखा ग्रंथराज हा वाचायचा की पचवायचा हा प्रश्न महत्त्वाचा नाही. शेवटी ग्रंथातील अंतरंग पाहणारा पाहतो तो कुवतीप्रमाणेच. हे धावणे सरड्याचे असते. हे वाचणे ऐहिक माणसाचे असते. परंतु ज्ञानेश्वरी माझ्या संग्रहात आहे याचे मला केवढे समाधान! ती मी पारायणासाठी इतरांना देताना पुन्हा माझ्याकडे वेळीच आली का याकडेच माझे लक्ष. ती आहे त्या लकबीत आली ना, यावर माझा कटाक्ष. ती इतरांनी वाचली का, ती त्याला कळली का, याची मला चिंता नाही. तुमच्या घरी हा ग्रंथ आहे ना, तो तुमच्या परिपक्वतेचे लक्षण झाले. सुसंस्कृतपणाचे एक चिन्ह झाले. सगळी पुस्तके वाचली जातात, वाचली पाहिजेत यावर मी विश्वास ठेवत नाही. त्यावरही माझा विश्वास बसत नाही. पुस्तकांची विश्वासार्हता हा चर्चेचा विषय नसून तो आपलेपणाच्या सुसंस्कृत मनाचा एक भाग आहे. आई आपल्या अपत्यावर प्रेम करते याची चिकित्सा कोणी करत नाही. तिचे वात्सल्य हे विश्वासदर्शक असतेच. तसे तुमचा पुस्तकसंग्रह हा तुमच्या दैनंदिन जीवन जगण्यातील विश्वासाने निर्माण केलेला एक विरंगुळा असतो. घराभोवती असलेली, विविध फुलांनी नटलेली बाग तुमच्या नित्यजीवनी कोणते ऐहिक सुख देते? उलट या प्रश्नात तुम्हाला जगण्याचे उत्तर सापडणार नाही. तसे तुमच्या संग्रहातील पुस्तक तुम्ही किती वेळा वाचले; वाचून काय समजले, समजून किती शहाणपण आले, या प्रश्नांची उत्तरे मिळणारी नाहीत. काही प्रश्नांची उत्तरे मिळत नसली तरी ती शोधण्यात, तुमच्या संग्रही असण्यात

जगण्याचे सामर्थ्य दडलेले असते. पुस्तके ही तुमच्या संग्रही असतात ती जगण्याशी पूरक राहण्यासाठी. त्याचे अस्तित्व हा तुमच्या अस्मितेचा भाग असतो. तुम्ही जगता आणि या जगण्याची पातळी पुस्तके सांगून जातात.

मी जेव्हा कुठल्याही शुभप्रसंगी पुस्तके आदान-प्रदान करतो तेव्हा एका जगण्यातून दुसऱ्या जगण्याचा आदर्श दाखवितो. पारितोषिकप्राप्त पुस्तके मला विरंगुळा देत नाहीत, तर पारितोषिक म्हणून दिलेले पुस्तक मला अधिक दिलासा देऊन जाते. विवाहप्रसंगी नवदांपत्यास भेट म्हणून दिलेले पुस्तक ज्या घाईगर्दीतून त्याच्याजवळ जाते ते पुढे तरी त्याला आठवणीने वाचावेसे वाटते का? हा प्रश्न मला क्षितिजासारखा दूरचा वाटतो. वधू-वरातील सीमारेषा पुस्तके आपल्या अभीष्ट चिंतनातून पुसतील यावर विश्वास ठेवता या पुस्तकांचे मोल अगणित राहील. आणि विश्वास न ठेवता ते अगणित, अमूल्यच राहणारे आहे. कारण ज्या मुलायम धाग्यांनी हे नवदांपत्य बांधलेले असते त्याची खूणगाठ या पुस्तकानेच दृढ केलेली असते. या दांपत्याच्या भावी जीवनातील हे संस्कृतीचे एक दर्शन आहे. म्हणून हे एका जगण्याने दुसऱ्या जगण्याला दिलेले वळण आहे. माणसे येतात आणि जातात. परंतु त्यांच्या जगण्याची अमरज्योत मात्र कायम असते. तशी पुस्तके ही कालप्रवाहात नष्ट होणारी चीज असली तरी ती अंतरंगी नवा उजाळा देणारी एक प्रज्वलित ज्योत आहे. आणि ज्योतीने ज्योत पेटवून दीपावली साजरी करावी तसे हे आनंदपर्यवसायी व्रत आहे. ज्या जगण्यात व्रत हे ठाण मांडून बसते ते जगणे आपल्या या धो धो प्रवाहातून ओसंडून वाहणारा आनंद लुटत असते. म्हणून या सुखपर्यवसानी जगण्याचा शुभमुहूर्त तुम्ही कुठले तरी पुस्तक जवळ बाळगून साजरा करा. मी पुस्तकात जगत आहे. आणि या जगण्यात पुस्तके 'हेचि सर्व सुख' झाली आहेत.

# २२ / खुराडे

जिवाची मुंबई करणे, यात जीव आहे तो माणसाला की मुंबईला? हौशी माणूस मुंबईला जाईल, अलोट पैसा खर्च करून चैन उडवील. मजल्यामजल्यांनी सजलेल्या इमारती पाहून डोळ्यांचे पारणे फेडून घेईल. कुणाला या साऱ्यात जीव आहे असं वाटत असेल तर मी म्हणेन, ती एक शुद्ध फसवणूक आहे. मुंबईत अलोट गर्दी असते. कुठेही जा, मुंग्यांसारखी माणसांची रांग असते. जिकडे तिकडे तुम्ही माणसेच पहाल, तरीसुद्धा ही माणसं एकमेकांची नसतील. माणसे अगदी जवळ असतात, पण ती कुणाचीच नसतात. अगदी मुंग्यांत जी शिस्त असते, जी परिश्रम करण्याची शिकस्त असते, तशी येथील माणसांत शिस्त असते. ती स्वत:पुरती. जणू काही माणूस विचार करतो स्वत:साठी, आचार करतो तोही स्वत:साठी आणि यंत्रवत् धडपड असते तीदेखील स्वत:साठी. आत्मकेंद्रित, स्वत:भोवती फिरून पुन्हा स्वत:तच मिसळणारा माणूस मुंबईत कोणता जीव बाळगून आयुष्याचे सोने करून घेतो हे एक कोडे आहे. अशा या माणसाळलेल्या पण माणुसकी नसलेल्या मुंबईची वारी याला जर तुम्ही जिवाची मुंबई म्हणत असाल तर तो एक आत्मवंचनेचा भाग आहे.

मुंबई बुद्धिवाद्यांची म्हणावी तर येथे ज्यांच्या बुद्धीबद्दल वाद आहे असे बुद्धिवादी भेटतील. बुद्धिजीवी वर्ग मुंबईला विटला नाही. कारण कुणाच्याही बुद्धीत येथे जीव सापडत नसल्याने तो मुंबईशिवाय कुठेच जात नाही. खरं म्हणजे त्याचीच जिवाची मुंबई होत असते. मुंबई व्यापाऱ्यांची म्हणावी तर येथे 'आज नगद कल उधार' अशी पाटी जवळपास नसते. उधारीशिवाय धंदा नाही, आणि कुठलाही व्यापार आतबट्ट्याचा होणे अथवा न होणे हे या उधारीवर

अवलंबून असते. मुंबई गुंडांची म्हणावी, तर येथील एकजात गुंड प्रथम पैसा तोंडावर फेकून आपला व्यवहार रोखठोक करतात. त्यांचे नाते गिऱ्हाईक आणि व्यापारी असे नसून ' मी तुला विकत घेतो ' या गुर्मीतून परस्परांनी सांभाळलेले असते. प्रश्न विकत घेणाऱ्याचा नसतो, तर विकत देणाऱ्याचा असतो. मुंबईत आयात-निर्यात, फायदा-तोटा, उधार-नगद आणि दिवस-रात्र ही द्वंद्वे नेहमीच तकलादू राहिलेली असतात. एकमेकांशी फटकून वागणे हा त्यांचा जगण्याचा व्यवहार असतो, व तोही कसल्याच आनंदाचे मोल न जुमानता. मुंबईचा औद्योगिक विकास कुठल्याच टप्प्यावर थांबणारा नसतो. यात पुढचे पाऊल पुढेच जाते. ते कधीच मागचे होत नाही. म्हणून मुंबईला भूतकाळ आणि भविष्यकाळ नाही. आहे तो केवळ वर्तमानकाळ ज्यावर पळण्याची शर्यत असते आणि हे पळणे थांबण्यासाठी नसते. या मुक्कामावरच मर्ढेकरांचा जगण्याचा पाढा चुकला होता, आणि तुमच्या-आमच्या घशाखाली परिस्थितीचा काढा गेलेला होता.

मुंबई ही टोलेजंग आहे. जमिनीपासून ते आकाशापर्यंत तिची उंची आहे. तिच्या अवतीभवती जो समुद्र आहे त्यात तिचे जे प्रतिबिंब पडते ते तळाशी राहताना आपल्या बिंबाकडे चुकूनही पाहणारे नसते. मुंबई आरशामध्ये पाहताना आरशाशी वैर करते. इमारतीकडे बोट दाखविताना केवळ उंची पाहते. तिचे प्रत्येक क्षणी वागणे ' आधी कळस मग पाया रे ' असे उलटे असते. म्हणून ती अरुंद पसरली नाही की लांबच लांब पहुडली नाही. तिला लांबचा पल्ला गाठायचा नाही. जवळचे पाहायचे नाही. जे तुम्ही आत्मनिरीक्षण वा आत्मपरीक्षण म्हणता ते मुंबईच्या गावी कधीच आलेले नसते. मुंबईला फक्त चालायचं असतं. दूर दूरवर जायचं असतं आणि म्हणूनच तिला थांबायचं नसतं. टोलेजंग मुंबईचा हा खुलासा केवळ तिलाच दिलासा देणारा असतो. तिला पाय असतात ते चालण्यासाठी, हात आहेत ते मेहनत करण्यासाठी. मुंबईला कान नसतात. डोळे नसतात. मुंबईचा हस्तस्पर्श हा इंद्रियगम्य नसतो. आणि तिला तुकारामासारखी आंधळेपणातील ' दिव्य दृष्टी 'ची गरजही नसते. मुंबईच्या इमारती दगडा-विटांच्या असल्या तरी त्यांतील माणसे हाडामासांचीच असतील याची खात्री देता येत नाही.

स्वत: मुंबई टोलेजंग असली तरी तिच्या कुशीत केवळ सदनिकांना स्थान आहे. या सदनिकांना मुंबई तळहाताच्या फोडाप्रमाणे सांभाळते. त्यांना जी संस्कृती अवगत तिचा कुठल्याच प्रकृतीशी सुसंवाद नसल्याने त्या कमालीच्या

बाजूला फेकल्या गेलेल्या आहेत. या सदनिका एकटच्या म्हणून एककल्ली, स्वत:कडे पाहणाऱ्या म्हणून अंतर्मुखी मुखवटे धारण करणाऱ्या, म्हणून ढोंगी सदनिका आतून 'बाहेरून सतत एक ढोंग लपवितात. असे हे अप्रूप ढोंग हा मुंबईचा हुकमी एक्का आहे. डाव जिंकणाऱ्या मुंबईला एवढे आणि इतुकेच पुरे आहे.

मुंबई पैशात खेळते. पैशाभोवती खेळते, आणि पैशासाठी खेळते. हा खेळ तर रडीचा असतो. जिंकणे-हरणे यातील मजा त्यात नसते. मुंबईत माणसांना किंमत नसते. ती किंमत पैशाला तरी असते का? मूल्य, अमूल्य यांपैकी कुठलेच पद तिच्या आगळ्या-वेगळ्या व्यक्तिमत्त्वाशी निगडित नसते. मुंबईचे हे व्यक्तिमत्त्व धूसर असते ते कायमचे. ते इतरांना दिसत नाही. ती स्वत: पाहत नाही. विविध रंगांचे, वेगवेगळ्या ढंगांचे हे व्यक्तिमत्त्व मुंबई सरडयाच्या किमयेने सांभाळते, संधिसाधू वृत्ती उजाळते आणि स्वार्थी बाजारभावाने गिऱ्हाइकांची वाट पाहते. कुणाचीतरी वाट पाहणे हे मुंबईच्या अंगचे वळण आहे. हीच मुंबई वाट पाहते, मात्र वाट दाखवत नाही. जिवाच्या मुंबईत अशा कितीतरी वाटा पाऊलवेडच्या झालेल्या आहेत.

मी जेव्हा मुंबईचा विचार करतो तेव्हा मला ही मुंबई भारतातील एक मोठे शहर, राजधानी वाटत असले तरी ती एक अलीकडे सामान्य माणसाची वृत्ती बनली आहे. तुम्ही हिला न पाहता ओलांडून जाल तर तुमचा पुढचा प्रवास सुखाचा होणार नाही. मुंबईचे अंतरंग व बहिरंग आलटूनपालटून बदलणारे, मानवी जीवनाच्या मूलभूत प्रकृतीशी वैर साधणारे नाही. तरीसुद्धा तिच्यात क्षुद्रता-बीभत्सता आपल्या संस्कृतीतून सुसंगतपणे जाणारी आहे. खेडे, नगर, किंवा शहर या तिहेरी सूत्रांपेक्षा मुंबईचे वळण मानवी प्रकृतीशी कुठेही संगतवार जाणारे आहे. अशा या मुंबईत मी जेव्हा जातो, थांबतो तेव्हा मी मुंबईबाहेरचा असतो. मुंबईच्या सदनिका ज्या तिच्या अविभाज्य व्यक्तिमत्त्वाच्या खाणाखुणा आहेत त्या मला नेहमी परक्या, खुज्या वाटत आल्या आहेत. या सदनिका कधीच तुमचे उघडचा डोळ्यांनी स्वागत करणार नाहीत. त्यांचे दरवाजे नेहमीसाठी बंद असतात. उघडल्यानंतर त्या येणाऱ्यांचे हास्याने स्वागत करतील आणि अवतीभवती न पाहता पुन्हा आपला दरवाजा लावून घेतील. खिडक्या बंद, दरवाजे बंद, त्यामुळे त्यात 'मी' ला 'तू'ची साथ नसते. मी मला पाहतो, तुला विसरतो. केवळ माझ्यात पाहतो, तुझ्यात डोकावत नाही. या सदनिकांना शेजार असतो आणि नसतो. त्यामुळे शेजारधर्म कळत नाही, वळत नाही.

बरं, ही सदनिका-संस्कृती असते. ती विकसनशील आहे. पण हा विकास क्षितिजसमांतर नसल्याने तो संस्कृतीकडे मूळ पदावर येऊन थांबतो. अशा वेळी मुंबई जेव्हा मला पाहते तेव्हा मी तिचा नसतो. तिला मुळी नाते नकोच असते. तुम्ही ऋणानुबंधाचे धागे जेव्हा मुंबईशी जोडून घ्याल तेव्हा ते तुटलेले दिसतील. फाडणे, तोडणे हा मुंबईचा एकेकाळचा हातखेळ आहे, सांधणे हा तिच्या विकृतीचा एक भाग आहे. दोघांनाही एकमेकांत मिसळू न देणं हा तिच्या संस्कृतीचा गुणधर्म आहे. परंतु हे सारे आज नामशेष झाले आहे. मुंबई काय आहे त्या ठिकाणी कायम आहे. तुम्ही जिथे जाल तिथे हे कायमपण दिसेल, त्यावर ठसा असेल.

मुंबईच्या परिवर्तनाकडे पाहताना तिच्यातून वाडे गेले, सदनिका आल्या. राहणी बदलली, दिनक्रमात नवी धावपळ झाली. माणसे आणि वाहने यांची गर्दी वाढली. मुंबईच्या या बदलात अपरिहार्यता असून ती मानवी जीवनाशी सुसंगत नाही. तिच्या संस्कृतीत प्रवाहपतितांचे पाणी आहे. तिचा प्रकृती विसंगतीने पछाडलेली आहे, आणि विकृती हा तिचा स्थायीभाव असल्याने ती या स्वभावापासून आजतागायत कधीच फटकून राहिली नाही. तिचे प्राचीन रूप जेवढे स्वागतशील तेवढेच ते आधुनिकातील प्रतारणा करणारे आहे. मुंबईत मी जेव्हा जातो तेव्हा या प्रतारणेशी लागेबांधे जोडून घेतो, पुढे पुढे ही प्रतारणाच माझ्या व्यक्तिमत्त्वाशी निगडित होते. मग मला माणसांकडे पाहता येत नाही. मैत्र जीवाचे सांभाळता येत नाही. शेजारधर्माला पारखे व्हावे लागते. जणू काही आपण मुंबईचे, तिच्यातील सदनिकांचे एकमेव वारसदार आहोत. तिच्या परिवर्तनाचा भाव पतनापर्यंत गेलेला असल्याने तो समस्त मानवी जीवनात अढळ स्थान पटकावून बसलेला आहे. वाट पाहणे किंवा शेजारधर्म सांभाळणे हे मुंबईच्या ध्यानीमनी नाही, अशी समज तिच्या पृथगात्म व्यक्तिमत्त्वाचा एक विशेष पैलू आहे.

मुंबईला कधी स्वप्ने पडतात का, हे कुतूहल सुटता सुटत नाही. तिची निवांतता, तिच्या अंगी असलेली शांतता या स्वप्नांना प्रेरणा देईल काय ? तिची जागृती हा तिचा सहज ओघ; यात तिला आपले स्वप्नाळू डोळे दडलेले दिसतील का ? ती जे ऋतू पाहते, अनुभवते त्यातील समरसता तिच्या प्रकृतीशी सुसंगत की विसंगत ? तिची रोजची दैनंदिनी सकाळपासून रात्रीपर्यंत ज्या क्रमातून अवतीर्ण होते त्यात किती स्वप्नाळू जमाखर्च असतील ? तिच्या हृदयात न मावणारा उन्हाळा, डोळ्यांत धूर येताक्षणी ओसंडून वाहणारा पावसाळा आणि

साऱ्या अंगभर गोठलेला हिवाळा जसा येतो तसा जातो. त्यावर मुंबईच्या म्हणून काही पाऊलखुणा आहेत काय? तिला गर्दीचे वेड आहे, म्हणजे या गर्दीतील माणसांचे वेड आहे काय? ती प्रकृतीनुसार गजबजलेली, शोषणातून शोषणाकडे धावणारी, यात ती कुठे थांबते? जे क्षण ती शांततेत घालवते ते तिच्या नशिबी कोणते अनुभव देतात? हे सारे प्रश्न मुंबईबाबत उत्तराशिवाय ध्रुवासारखे अढळ आहेत. मुंबईचे प्रश्न आणि तिने निर्माण केलेले प्रश्न जात्याच एकातून दुसरे आलेले, तरीसुद्धा एकमेकांपासून दुरावलेले. तिने निर्माण केलेले प्रश्न संपूर्ण मानवी जीवनातील उद्ध्वस्तता टिपणारे आहेत. प्रश्न तेच, रंग वेगळे, उत्तरे वेगळी. म्हणून त्यांचे अंतर्बाह्य स्वरूप वेगळे.

मुंबईची परंपरा तिच्या संस्कृतीपासून कितीतरी योजने दूर आहे. तिने आपली परंपरा कधीच इतिहासजमा केली आहे आणि संस्कृती मुळापासून बदलून टाकली आहे. तिच्या या परंपरेत जातिभिन्नता ही एक आशयभिन्नता होती तर तिची समता हा ममतेचा परिपाक होता. तिच्या या संस्कृतीत जीवनमूल्ये तेज पांघरून अढळ उभी होती. आपल्या कर्तव्याची जोपासना करताना ती कधीच पराङ्मुख नव्हती. तिची प्रसिद्धिलोलुपता, तिची अभिजात सत्त्वशीलता या एकातून वेगळ्या असल्या तरी त्या मुंबईसाठी सदैव आतुरलेल्या आहेत. मुंबई हे सारे मनापासून आपलेसे करते, त्यासाठी जीवन-मरणाचा संघर्ष करते. त्यात तिला नेमके आपले अस्तित्व हवे आहे. हे अस्तित्व तिच्या अस्मितेचा धागा होऊन बसले आहे; तिला जगायचे आहे, हा तिचा मुख्य कार्यभाग. आणि या जगण्यात असलेली धडपड, संघर्ष एवढीच तिची प्रमुख प्रेरणा आहे. मुंबई नेहमीच प्रयोजनवती असते. सदैव कार्यतत्पर राहते. म्हणून ती कधीच शून्य नसते. एवढेच नव्हे, तर एकेक शून्य ती निर्माण करीत आपला आकडा अवाढव्य करीत राहते. तिचे जीवनव्यवहाराचे गणित मांडणीमांडणीतून सुटलेले असते आणि त्याची अचूक उत्तरे ठरवून शोधताना ती कमालीची ढोबळ झालेली असतात.

तुम्ही जेव्हा मुंबईला महाराष्ट्राचा आत्मा म्हणून मोकळे होता तेव्हा तिचे शरीर तुमच्या डोळ्यांसमोर आलेले असते. महाराष्ट्राचे वर्णन 'राकट देश कणखर देशा' असे करताना गोविंदाग्रजांची प्रतिभा या मुंबईपासून सर्वस्वी दूर होती. मुंबईचे 'न्हालेल्या गर्भवती' सारखे रूप पाहून मर्ढेकर तिच्याविषयी सहानुभूती बाळगून होते. तिचे ओजस्वी मातृत्व कामगारांच्या नित्य जीवनाशी जखडलेले पाहताना कविवर्य सुर्वे मुंबईवर सूक्ते रचतात. मुंबई हा सर्वच

प्रतिभावंतांचा आधार आहे, कलावंतांचा तो एक ओघवता प्रवाह आहे. आपल्या प्रतिभेच्या स्पर्शाने तिला उजळून द्यावे, आणि तिच्या नव्या उन्मेषातून आपली कलाकृती अभिजात करावी ही या सर्वांची नित्यनूतन धडपड आहे. तिच्या अंतरंगी असलेले 'अठरा जातीचे कडबोळे' अनुभवताना आपण विशाल अंत:करणाचे असल्याचा दिमाख असतो. यात समता-ममतेचा दुवा अखंडित सांधलेला असतो. मुंबईचा निसर्ग, मुंबईत अवतरलेला निसर्ग तकलादू असून तो नित्य नवा असतो, इथे सूर्य उगवताना दृष्टीआड झालेला असतो तर तो मावळताना अंधाराशिवाय त्याचे काहीच दिसत नाही. मुंबईचे त्याच्यावाचून अडत नाही, त्याचेही मुंबईत काही चालत नाही. मुंबई जेव्हा शुभ्र आकाश पाहते तेव्हा ते खालचे प्रतिबिंब झालेले असते. त्यात चंद्राचे शीतल चांदणे, विजेचा लखलखाट होऊन आलेले असते. असंख्य चांदण्यांचा लपंडाव इथे मुंबई पाहता जणू काय आपलेच साम्राज्य त्यावर लादते. तिच्या या निसर्गाबाबतच्या सर्व संवेदना सूक्ष्मातून स्थूलाकडे जातात. मुंबई संवेदनक्षम असते असे जेव्हा आपण म्हणतो, तेव्हा ती हिरमुसलेली असते. तिचा रुसवा न मावळणारा, प्रसन्नतेच्या वर सदैव डोके काढणारा असतो.

मुंबईला एक धून आहे, पण ती माधुर्याच्या जवळपास फिरकणारी नाही. ती स्वरवेडी होताना भेसूरतेचे गाणे ऐकविते आणि मधेच आपला कंठ मोकळा करून बसते. तिच्या स्वरास्वरात समन्वयाने कधी आरोह कधी अवरोह आलेला पाहताना मुंबई कितीतरी वेळा स्वत:च्या बासरीपासून दुरावते. ती अशा वेळी पूर्वेकडून पश्चिमेकडे वळते. स्थिरावते. या बिंदूवर संगीतातील नाविन्य दाखविते. कर्णमधुर व कर्णकर्कश यातील तरतमभाव तिला कळण्याइतकी सवड नसते. आपण हे वेळीच समजून घेतले पाहिजे, दिले पाहिजे याची तिला आवड नसते.

मुंबई स्वत:कडे पाहताना इतरांकडे डोळेझाक करते का, या प्रश्नाच्या उत्तरात तिची विशाल नजर सामावलेली आहे. जी सदनिका तिच्या संस्कृतीचा गाभा आहे, तिचा खरा मुखवटा आहे ती तरी मुंबईला आपल्यात सामावून घेईलच ना! मुंबईच्या सदनिका संस्कृतीत चारचौघे एकत्र येऊन कधी नांदले आहेत का? ज्या भारतीय परंपरेने एकीचे वैभव सांभाळले, सहकार्याचे स्तोत्र गाईले, समतेचा झरा वाहत ठेवला आणि विशाल दृष्टीचे कोडकौतुक केले ती परंपरा मुंबईची सदनिका केव्हाच गमावून बसली आहे. तुम्ही येथे जेवताना, वागताना, एकरूप झाला आहात काय, हा विचार महत्त्वाचा झाला आहे.

तिला कधी –

> ''ॐ सहनाववतु, सहनौ भुनक्तु
> सहवीर्यं करवावहै।
> तेजस्विनावधीतमस्तु
> मा विद्विषावहै।।
> ॐ शांति: शांति: शांति:।

अशी ज्ञानाची उपासना खऱ्या मानवधर्मातून करावी वाटते का? हा प्रश्न महत्त्वाचा झाला आहे. मुंबईला पतिधर्म, पत्नीधर्म, बंधुधर्म, शेजारधर्म या वळणाने अंतिम असा मानवधर्म जोपासता येतो का, या प्रश्नाचे उत्तर अवतीभवतीच्या परिस्थितीत जसे सापडते तसे ते या परिस्थितीत सापडलेल्या मानवी वृत्तीतही सापडते. तिने जो लौकिकाचा ध्यास पत्करला आहे तोच मुळी अशाश्वततेच्या अंतिम टोकापर्यंत पोचलेला आहे. तिला जगणे माहीत नाही, जीवन माहीत नाही. ती धावते. मंदगतीने चालत नाही. ती यांत्रिकतेला शरण गेली म्हणून जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावर ती मरण पावते. तिला ना रक्ताच्या नात्याचा ध्यास, ना अश्रूंच्या नात्याची ओढ, ना प्रेमाच्या नात्याची खबर. दिवस उगवल्यापासून ते मावळेपर्यंत ती राब राब राबते आणि कधी, केव्हा व कुठे झोपते ते कळत नाही. तिचे यंत्रवत् जगणे, मध्येच बिघडणे, पुन्हा यंत्रवत् चालू राहणे एवढ्याच क्रिया शिल्लक आहेत.

मुंबई ही आता केवळ मुंबई राहिली नाही. ती सर्व माणसांची एक वृत्ती झाली आहे. तुम्ही जेव्हा जिवाची मुंबई कराल तेव्हा तिची वृत्ती घेऊन याल. मुख्य म्हणजे ही वृत्ती खुजी राहील; या खुज्या वृत्तीचे तुम्हाला वावडे नसेल. त्यात तुम्ही कुणाचेही नसाल; फक्त स्वत:चे असाल. तुमचे खाणे, राहणे आणि जगणे केवळ एका रिंगणाचेच राहील. आपल्या अवतीभवती काय घडते, काय जळते ते तुम्हाला दिसणार नाही. दिसले तरी तुम्ही डोळे असून आंधळे व्हाल. सहकार्याचा हात तुम्ही ना उगारणार ना उभारणार. तुम्हाला जे अंगचे वळण पडेल तेच तुमचे राहील. ना प्रगती ना गती. एका डबक्यातून दुसऱ्याकडे जाणारा ओघ. तुम्ही एकेकाळी दूध पचविले होते. आता दूध मिळत नाही म्हणून तुम्ही ताक प्याल. ताक मागण्यासाठी भांडे लपवाल. आता ताक तुमच्या इतके अंगवळणी पडेल की तुम्ही दूध पचवू शकणार नाही. याहीपुढे तुम्ही ताकाला दुधाचे मोल देऊन आपल्या वृत्तीवर पांघरूण घ्याल. म्हणून मला मुंबई ही आता मानवी जीवनात खोलवर रुजलेली एक

अघोर वृत्ती वाटते. ती माणसांनी गजबजलेली, तरीही माणसे तोडून एकटी राहणारी आहे. या मुंबईने माणसांचे एक रिंगण ओढले, त्यात स्वत:ला डांबून घेतले, अवती-भवती कुंपण बांधले. यापलीकडे कुठेच जाण्यास वाव दिला नाही, नव्हे जाण्याचा प्रश्नच उरला नाही, मानवी जीवनाचा मुंबई हा एक सडलेला, तोडताक्षणी पुन्हा सडू घातलेला एक रोग झालेला आहे. त्यावर ना औषध ना कुठलेच पथ्य.

अलीकडे मला जिवाची मुंबई करावी वाटत नाही, मी मुंबईत जातो आणि लगेच परततो. तेथील धावणाऱ्या गाड्या, अलोट गर्दीची भेसूरता, माणसामाणसातील अंतर, सारे काही आठवले की शहारे येतात. परवा मुंबईत बालकवींची जन्मशताब्दी साजरी झाली. मला बालकवींची 'जीर्ण दुर्ग' कविता आठवली. या कवितेचा शेवट कवी एका शाश्वत सत्याने करतो :

**''हे काळाचे खेळ कुठेही असेच चालायाचे**
**त्यास कशाला परी आम्हाला काही न वाटे त्याचे**
**एक खुराडे भाड्याचे ते राहू त्यात खुशाल**
**क्षुद्र जीवाते आम्हा कशाला असले रंगमहाल'**

माझ्या जिवाच्या मुंबईत आता एवढीच तडजोड उरली आहे.

# २३ / अनुदिन अनुतापे

प्रत्येक महिन्याची पहिली तारीख ही अंगावर काटा आणणारी असते. या दिवशी मिळणारा पगार तुटपुंजा असल्याने त्यात घरखर्च कसा करावा हीच चिंता अस्वस्थ करणारी वाटते. या पगारातून कुणाला काय द्यावे त्यापेक्षा कुणाला बाजूला ठेवावे यावरच आपली मदार राहते. देणेकरी दारात येतात आणि आपला पगार संपलेला असतो. यापेक्षा ज्या महिन्यात पगारच होत नाही तो महिना आपले भाग्य उजळणारा असतो. जणू काही दारात उभे राहून आपण उत्तर देतो, ' पगार नाही '. परंतु तुटपुंज्या पगाराची गोळाबेरीज कशीही करा, हातचा मात्र मागे ठेवीत नाही. महिन्याच्या पहिल्या आठवड्यात आपण 'गरमागरम' झालेलो असतो, दुसरा आठवडा काहीसा 'नरम' असतो. आणि शेवटचे दोन आठवडे मात्र 'बेशरम' होण्यात जातात.

बरे, येणाऱ्या पहिल्या तारखेची वाट पाहावी तर त्यात समाधान नसते. पुन्हा ये रे माझ्या मागल्याचे गुऱ्हाळ चालू होते. खिसा गरम करून घरी जावे, आपल्या मुलाबाळांसह बायकोशी बाहेर बागेत गप्पा माराव्यात हे सारे आताशा इतिहासजमा झाले आहे. उलट पगाराचा दिवस हा विविध लोकांची यादी करण्यात, देणेकऱ्यापासून तोंड लपविण्यात घालवावा लागतो. सुख आणि पैसा हे अविभाज्य घटक मानल्यास आपल्या नशिबी ते नाहीच म्हणून जगणे तेवढे शिल्लक उरते.

सकाळपासून रात्रीपर्यंत यंत्रवत् काम करणाऱ्या माणसास अखेर विरंगुळा असतो कोठे ? घर, ऑफिस, आणि उरलेल्या वेळात कुठेतरी भटकण्यात विरंगुळा मिळतो का ? उत्तर साधे आहे. तो मिळत नाही. बरे, दैनंदिन कार्यात तरी

तो असेल ना तर शपथ! विरंगुळा शेजारी मिळत नाही, बाजारी मिळत नाही, घरी मिळत नाही, की दारी मिळत नाही. मग अखेर जगायचे तरी का? जगण्याला पातळी असते यातही तथ्य नाही. कारण त्या पातळीपर्यंत आम्ही पोचतच नाही. मी जगतो याचा अर्थ मला अस्तित्व आहे. माशांना अस्तित्व असते तसे मला आहे. अस्तित्वाला अस्मितेची जोड नाही म्हणून मरणास तोड नाही. जिथे जगणे आणि मरणे सक्तीतून पुढे येते तिथे या दोन्ही क्रिया अटळ असून संवेदनाशून्य झालेल्या असतात. जगणे आणि मरणे या दोन टोकांत पहिल्या तारखेला मिळणारा पगार कुठेतरी हेलकावे देत 'आला क्षण गेला क्षण' या पालुपदाचे स्मरण करून देतो आणि आपण नाइलाज म्हणून पुढे चालत जातो.

परवाचीच गोष्ट घ्या ना. महागाईभत्त्याची वाढ वृत्तपत्रातून जाहीर झाली. मागील बाकीसह हातात चांगले पांचशे रुपये पडणार होते. मी मनाशी विचार केला, जरा वेगळे खर्च करावेत. म्हणजे दोन शर्ट घ्यावेत, बायकोला पाच-पन्नास बाजूला ठेवण्यासाठी द्यावे. आईला दानधर्मासाठी दहा-पंधरा रुपये म्हणून बाजूला काढावेत. मुलाची सायकल दुरुस्त करावी. मुलीला शॉपिंगसाठी शंभर रुपयाचा आकडा सांगावा आणि उरलेली सारी रक्कम मुलांची फी म्हणून शिल्लक ठेवावी. पण कसले काय, देणेकरी तुमच्यासमोर दत्त म्हणून हजर! वर्तमानपत्रातली बातमी हा त्यांचा दिलासा आणि आपल्या लेखी उसासा असतो. ते या दिवशी घरी - दारी आणि ऑफिसात वेळेवर हजर राहून आपले देणे आगाऊ वसूल करून जातात. मग मिळालेला महागाईभत्ता फक्त महागाई शिल्लक ठेवून खिसा रिकामा करून जातो. असे वर्षातून दोन वेळा महागाईभत्ते येतात-जातात. आपण मात्र आहे तेथेच राहतो. पुन्हा एक तारखेच्या पगाराची गोळाबेरीज चालू राहते. कुणाला द्यावे आणि कुणाला मागे ठेवावे?

आयुष्याला पाण्याची उपमा दिली जाते, पण हे पाणी नितळ नसते. स्वच्छ नसते. ते असते मचूळ. ओघवते पण कमालीचे अशुद्ध. अशा पाण्यात हात कसे धुवून घ्यावेत? हे पाणी प्रवाही असूनही ते केव्हा आणि कुठे नाहीसे होईल ते कळत नाही. या पाण्याला द्यायचा रंग तरी आपल्या हाती कुठे असतो? तो असतो बाजारात, पहिल्या तारखेची वाट पाहात. असे हे ओघवते जगणे, मचूळ जगणे आणि रंगहीन जगणे शेवटी कुठे संपणार? पृथ्वीवरील सर्व ओघवते प्रवाह वळणावळणातून अंतिमतः सागराला जाऊन मिळतात. आपल्या या जगण्यातील खाचाखोचा शेवटी पगाराशी निगडित राहतात. मी

रोज सकाळी उठतो. माझे सर्व व्यवहार उरकून ऑफिसात जातो. मी ऑफिसातून उठतो, माझे तेच व्यवहार पूर्ण करून घरी येतो. मी आरामात झोपतो. मधेच जागा होतो व उद्याचे व्यवहार कसे पार पाडायचे ते ठरवतो. माझे जगणे, पगाराचे माझे विचार करणे, पगाराचे एक ते तीस तारखेपर्यंत हे असेच चालते. तीस ते पुन्हा एकपर्यंत उलटे - सुलटे चक्र पुन्हा फिरते.

जगण्याचा पाढा रोज वाचताना कुठेच चुकत नाही. आयुष्य कसे उन्हाळे, पावसाळे आणि हिवाळे ओलांडून सरकते; आपण मात्र या सर्वांचे बळी झालेले असतो. तळपत्या उन्हाचे चटके अंगाला सवय करून जातात. पावसाळा नेहमीचा येऊन जातो आणि हिवाळ्यातला गारठा आपली इच्छाशक्तीच मारून टाकतो. अशा वेळी पश्चात्तापाने आपली साधना पोखरून गेलेली असते. तुमचे व्रतस्थ जीवन पुन्हा पगाराशी लागेबांधे जोडून जाते. तेच पगाराचे येणे. तीच पगारवाढ महागाईभत्ता हाती न लागता येणे आणि जगण्याचा पाढा अचूक म्हणणे सारे कसे क्रमाक्रमातून आलेले असते. तीन प्रहरांचा एक दिवस. सात दिवसांचा एक आठवडा, चार आठवड्यांचा एक महिना आणि बारा महिन्यांचे एक वर्ष. यात कुठेही खंड नाही. एकाने यावे, दुसऱ्याला पुढे न्यावे. दिवसामागून रात्र तसा रात्रीमागून दिवस हे दोघे एकमेकांचे. तुम्ही आम्ही मात्र साक्षीदार असून कुणाचेच नसतो.

मग माणूस जगतो कशासाठी ? माझे उत्तर आहे अनुतापासाठी. रामदासांचे अनुतापाने दग्ध झालेले मन प्रभुरामचंद्राजवळ व्यक्त झाले. तुमच्या दैनंदिन जगण्यात अनुतापाने दग्ध झालेले मन अव्यक्तच राहते. त्याला हा अनुताप ऑफिसात सांगता येत नाही. घरी बायकोपुढे दाखविता येत नाही. स्वत:शी त्याला बांधून दररोज त्याच्याशी तडजोड करावी लागते. संत रामदासांच्या लेखी हा अतूट काळरात्र घेऊन येतो आणि त्यातून आलेल्या अतूट भक्तीने आपले सार्थक करून जातो. माणसे मात्र रोज अनुतापाने पोखरून जातात आणि पुन्हा अनुतापालाच शरण येतात. रोजच्या जगण्यात पावलोपावली येणारा अनुताप मागचे विसरू देत नाही की पुढचे आठवू देत नाही. तो असतो वर्तमानकाळी. म्हणून पावलाने खालची धूळ झटकून तिथेच थांबायचे असते. आपल्या लेखी केवळ काळरात्रच नसते, तर असलेला काळदिवस देखील महाभयाण असतो. समोर एखादे झाड दिसावे. त्याला ना पान, ना फूल, ना फळ. निष्पर्ण तसे निष्फळ जगण्याचे श्रेय, झाड तुमचे आमचे साक्षीदार होऊन येत असते. अनुतापाचे इथे एक आवर्तन पूर्ण होते.

मला कुठलीच तडजोड अमान्य असते आणि तडजोडीशिवाय हाती काही लागत नाही. जगणे पावलोपावली ज्या सरळरेषेतून जाते तिथे देखील मन मारून चालावे लागते. पंख पसरून पाखराने आकाशाकडे पाहावे आणि घरट्यात पंखविद्ध व्हावे. बीजातून रोपटे वर यावे तोच खरडून काढावे. तसा दिवस अनुतापाने होरपळून जातो. योजनेचे गणित मांडावे त्याला तडा जातो. भविष्याकडे डोळे लावावे आणि भूतकाळावर समाधान मानावे. मन मारण्याची प्रक्रिया अंगच्या वळणाने सुखीजीवनाची किल्ली ठरावी. सहनशीलतेचे साम्राज्य आपल्या सार्वभौमत्वाने दिवसभर दिसावे. कुटुंबवत्सल कर्ता व्हावे. तिथे कुठलाच मान नसावा. आदरपूर्वक काय पहावे? सन्मानपूर्वक कोणी वागावे? कुठले नाते जवळ करावे, कुठले दूर करावे? कुणाला आपला, कुणाला परका म्हणावे? हे प्रश्न अनुतापाने होरपळलेले असतात. तडजोडीची उत्तरे शोधत असतात. एकमेकात गुंतून घट्ट झालेले असतात. पुन्हा पुन्हा आठवून आपला गुंता दाट करीत असतात. सकाळी उठल्यानंतर अनुतापाचे किरण अंगावर पडतात; रात्री झोपल्यानंतर अनुताप पांघरूण होऊन येतो.

पेपर वाचावा तोच अनुतापाने घेरलेले असते. राजकीय जीवन पदोपदी अनुतापाचे आंदण होऊन आलेले असते. खून, मारामाऱ्या, चोरी प्रकरण आणि अपघात यांचा जणू काही रोजचा रतीब झालेला असतो. अशा वेळी मन खंबीर होण्याऐवजी अनुतापाने होरपळून जाते. माणसे कशी माणसापासून दूर पळतात. सकाळच्या चहाच्या वेळी हे सारे वृत्तपत्रातून वाचावे, दिवसाची सुरुवात कशी छान व्हावी अनुतापाने. मुलगा शाळेतून येतो. संपामुळे शाळा बंद असते. मुलांची भांडणे, शिक्षकांचे हेवेदावे, वर्गाची मोडतोड, अध्यापनाची बोंबाबोंब, सारेच अनुतापाच्या दाट छायेत आलेले. आजची संस्कृती अनुतापाची, आजची प्रकृत्ती अनुतापाची. सामाजिक ऋणानुबंध अनुतापाचे, वाटाघाटी अनुतापाच्या आणि सौहार्दपूर्ण मैत्री सुद्धा अनुतापाची. जगण्याचा प्रत्येक क्षण जर अनुतापाने दग्ध झालेला असेल तर मानवी हक्क सांगायचा कुणाला? तो मनातच होरपळतो. सत्तेचे राजकीय अंग आणि माणुसकीचे सामाजिक अंग ज्या अनुतापाने बांधले जाते, ती खूणगाठ तुमची दैनंदिन सुरुवात, ती तुमच्या जगण्याचा शेवट!

राष्ट्रीय पुरुष तुमच्या जगण्याचा आधार आहेत. त्यांचे विचारधन तुमच्या वाटचालीचे मार्गदर्शन आहे; परंतु या युगपुरुषांची हरघडी होत असलेली विटंबना कुणी सांगावी, कुणी पहावी आणि कुणी ऐकावी? आमच्या दैनंदिन जीवनात

सोयीप्रमाणे हे पुरुष येतात, आपले वैचारिक पाठबळ सोयीनुसार सांगून देतात. खरे म्हणजे ही सोय आम्हीच तडजोडीतून केलेली असते. विभूतिपूजेविरुद्ध बंड करणाऱ्या नेत्यास चार भिंतींत कोंडून त्याचा दगड बनविलेला असतो. स्वातंत्र्यासाठी जिवाचे रान करणाऱ्या महात्म्यास शासकीय कचेरीत टांगून ठेवले जाते. युगपुरुषांची जयंती कुठल्यातरी राजकीय सोयीसाठी, महापुरुषांची जयंती कसल्यातरी राजकीय स्वार्थासाठी साजरी होते. हार घालणे, आक्रस्ताळी भाषणे देणे आणि जयजयकाराने सारे थंड होणे.

सांस्कृतिक अनुताप कुठल्या डोळ्यांनी पहावा, कलेची विविध अंगे काय म्हणून ऐकावीत, कुठेही तडजोडीला वाव आहे. कुठेही स्वार्थाला भाव आहे. उध्वस्तचा गाव आहे आणि अनुतापाचे नाव आहे. विकृतीला प्रकृती, सुधारणा करू पाहणाऱ्या सेवेची संस्कृती, मंत्रीपदाला चिटकून बसण्याची संस्कृती, सारे कसे रंगातून गडद झालेले संस्कृतिदर्शन. यात आपला रंग कुठला नि परका रंग कुठला. डोळ्यावर चष्मा चढवून जो रंग पाहावा तो आपलाच समजावा. त्यातही राजकीय परिसस्पर्श या संस्कृतीला घडताच तिचे सोने कवडीमोल व्हावे. आमच्या दृष्टीस परिसाने स्वत:चे गुणधर्म सोडलेले असतात. आकाश पोकळीत उतरलेले असते. बागेतील फुले फूलपण विसरून गेलेली असतात. निर्झराचे प्रवाहीपण नामशेष झालेले असतात. सारे कसे विकृतीकरणाने विद्रूप झालेले! गाण्याला सूर नसतात, कवितेला शब्द नसतात, नाटकाला अभिनय नसतो, नृत्याला साज नाही की चित्राला रंग नाहीत. कलेशिवाय कलावंत, गाण्यावाचून गायक आणि चित्राशिवाय चित्रकार जिथे रोजचा पाहावा लागतो तिथे अनुताप हाच जगण्याचा अविभाज्य भाग झालेला असतो.

सर्वस्पर्शी अनुतापास हृदयस्पर्शी अनुतापाने हाक द्यावी तसे मला आर्त किंकाळीतून सांगायचे आहे. महाराष्ट्रधर्मीय रामदास तुमच्या आमच्या जगण्यात जिवाभावाचा सखा आहे. तो एरवी कुठल्यातरी पंथाचा, कुठल्यातरी जातीचा आणि कुठल्यातरी नीतीचा व्रतस्थ असेल, पण दैनंदिन जगण्यात मात्र तो हरघडी दीपस्तंभ झाला आहे. त्याचे समाजकारण 'लेकुरे उदंड झाली' चे असेल, राजकारण 'मराठा तितुका मेळवावा' चे असेल, व्यवहार, 'संसार करावा नेटका' असेल, तर परमार्थ 'बुद्धी दे रे रघुनायका' चा असेल. रामदास मात्र अनुतापाने दग्ध होताना हेच सांगतो. बहीण भावाची नाही, पती पत्नीचा नाही, मुलगा बापाचा नाही, ही सारी नाती एकमेकांची नसूनही माणूस स्वत:ची ओढाताण करून घेतो. अनुतापाला कवटाळून जातो आणि आपण भाऊबंदकीला

जवळ करतो. मला जन्म मिळाला, जगायचे आहे, नव्हे अनुतापाला बांधून ठेवायचे आहे.

अलीकडे आपण सारेजण महागाईने घेरलेले आहोत. रुपयांचे अवमूल्यन झाल्याने माणूस देखील अमूल्य(!) होत आहे. जो रुपया कमवायचा त्यासाठी दिलेला वेळ, घेतलेले काम, शक्ती आणि पर्यायाने वाया गेलेला दिवस मूल्ये ढासळून देत आहेत. 'देहे त्यागिता कीर्ती मागे उरावी' असे म्हणत अपकीर्तीला शरण जायचे. जिथे राहतो तिथे घराला घरपण नाही. खुराडे संस्कृती अंगिकारल्यामुळे शेजारपाजार नाही. घरात कुणी कुणाचे नाही. सारेच दिल्या घेतल्याचे जग असे हे अनुतापाचे विश्व उरते. पगारवाढ होते. पण खर्चाला ताळमेळ नसतो. आर्थिक ओढाताण सारे जगणेच उद्ध्वस्त करून जाते. कुणाला सांगावे, कुणाला ऐकावे, मुकाटपणे सहन करायचे. वर खाली दबलेला. अवतीभवती कुढलेला. अंतर्यामी पोखरलेला. अनुतापाकडे आपोआप गेलेला. माणूस कसा असून नसतो. मग हे किती दिवस चालायचे ? किती म्हणून सहन करायचे ? सामान्यपणे फक्त रोज पालुपदाने धीर देत घेत म्हणायचे :

**''अनुदिन अनुतापे तापलो रामराया**
**परमदिन दयाळा नीरसी मोहमाया**
**अचपळ मन माझे नावरे आवारीता**
**तुजविण शिण होतो धाव रे धाव आता''**

# २४ / मृत्यूचे साम्राज्य

माझ्या प्राचार्यांचा मृत्यू मला झोंबणारा झाला आहे. तो मनात घर करून राहिला आहे, खोलवर रुजला आहे. आजही तो विसरला जात नाही. मी विसरण्याचा प्रयत्न करतो तर तो अधिकच आठवतो. हा माणूस सकाळी आपल्या मुलाला स्टेशनवर निरोप देतो. कॉलेजमध्ये वेळेवर येतो. आपुलकीने माझ्याशी मन मोकळे करतो. कॉलेजमधील जाहीर केलेल्या प्राध्यापकांच्या मुलाखती सहज घेतो, तोच एकदम छातीत कळ येते आणि उपचारांच्या सामन्यात सारे काही संपून जाते. तेल असलेला, ऐन प्रकाशात असलेला दिवा एकदम विझतो. सारे कसे अघटित! अतर्क्य! मनाला पुन्हा पुन्हा झोंबणारे आहे.

रामदास सहज लिहून गेले 'संचिताचे सरता शेष। नाही क्षणाचा अवकाश। भरता न भरता निमिष। जाणे लागे।' असा भावप्रत्यय प्राचार्यांचा मृत्यू देतो. प्राचार्यांना ना रोग, ना त्यांचे वृद्धपण, ना अपघात. मग असे का? पुन्हा रामदास आठवतो, 'एक मृत्युमार्गी लागले। एक अर्धपथ क्रमिले। एक ते सेवटास गेले। वृद्धपणी।' पुढे आपली साक्ष रामदासांनी अधिक स्पष्ट केली आहे. 'मृत्यू न म्हणे बाळ तारुण्य। मृत्यू न म्हणे सुलक्षण। मृत्यू न म्हणे विचक्षण। बहुबोलका।' प्राचार्यांचा मृत्यू 'एक अर्धपथ क्रमिले' या स्वरूपाचा आणि म्हणूनच तो अजूनही 'बहुबोलका' वाटतो. तो प्रसंगी अस्वस्थ करतो. उदासपणा आणून देतो. पाखरे उडून गेलेले झाड, तारका सोडून गेलेले आकाश, रानभर एखाँदेच फुलपाखरू चुकलेल्या झुडपाशी ओळख देणारे वेडे. असा प्रकार आज दिसतो आहे. उदास माळावर रापलेला बासरीचा सूर ध्वनीत प्रतिध्वनी देत पुन्हा लोकांतातून एकांतात विरावा, तसे प्राचार्यांच्या मृत्यूने केले

आहे. पंखात मिटलेला, ओठात स्तब्ध झालेला, अश्रूत गोठलेला मृत्यू मला रंगीबेरंगी वाटतो.

सकाळी बागेत येरझारा मारताना मला विविध फुलांची झाडे बोलावतात. या वेळी मी झाडांची पालवी सूक्ष्मपणे पाहतो. पानापानावर दवबिंदू आपल्या सौंदर्यासह रेंगाळताना दिसतात. मी जवळ जातो. कुठून तरी वाऱ्याची झुळूक येते, सूर्यप्रकाशाचा अलगद किरण दवबिंदूवर पडतो. तो पाहता पाहता नामशेष होतो. हे दृश्य मला मृत्यूचे तांडवनृत्य दाखवते. मानवी जीवनाची क्षणभंगुरता मला आठवत नाही. मृत्यूचे काळभैरवी स्वरूप दिसते. या पालवीच्या आड एखादी कळी उमलण्याच्या ऐन भरात असते. तिच्या अवतीभवती एखादी आळी असते. तिने पाहता पाहता या कळीला पोखरून सोडावे. फुलण्यापूर्वी, गंधित होण्यापूर्वीच तिचे देहावसान व्हावे. मला मृत्यूची भयानक किंकाळी ऐकू येते. मी कानांत बोटे घालतो तरी ती कानांतून मनात केव्हा शिरते हे कळत नाही. तरी माझी पावले बागेतच फिरतात. मी मग झाडाचे पान न् पान निरखून पाहतो. त्यावरील एकेक आळी मारून टाकतो. विविध कळ्या अजमावून पाहतो. त्यावरच्या आळ्या पायाखाली चिरडून टाकतो. एकापरी मी मृत्यूलाच जमीनदोस्त करतो. मला पुन्हा बागेत एक मांजर दिसते. त्याचे लक्ष एका झुडपामागील उंदराकडे असते. जे मला दिसत नाही ते मांजराला दिसते. ते केव्हा यावर झडप घालते ते कळत नाही. पाहता पाहता मांजर उंदीर गिळून टाकते. मी जमीनदोस्त केलेला मृत्यू मला मांजराच्या रूपात दिसतो. अशा वेळी मी बागेतला उंदीर होतो.

मानवी जीवनात मृत्यू हा अटळ आहे याची जाणीव जन्मापासून मृत्यूला कवटाळेपर्यंत सर्वांना दृढ झालेली असते. आपला दिनक्रम नियमितपणे चालू असताना मृत्यूचे धृपद चालूच असते. मृत्यूच्या मैफलीत अस्ताई, अंतरा नसतोच मुळी. असते ती भैरवी व तीही सतत सम गाठलेली. ही मैफल ऐन सकाळी रंगात येते. भर दुपारी ती समेवर असते. तिची रात्र ऐन धुंदीत समाप्त होते. तिला काळ - वेळ लागत नाही. अक्राळ - विक्राळ तिचा सोस असतो. आणि तरीही मृत्यू अटळ म्हणून जगावेच लागते. जगण्याचा सोस भारी, मरणाची भीती न्यारी. अशा धुमश्चक्रीत सारेच भिकारी, असे हे सूत्र मृत्यूने जखडलेले आहे. सूत्रधाराने सूत्र निर्माण केले. कुठे कसे गुंडाळले ते कळत नाही. फक्त आपण जाळ्यात अडकतो. गुंता सुटत नाही. सोडावा तर अधिक घट्ट होतो. मृत्यू हा एक गुंतावळा आणि तुम्ही - आम्ही त्यात अडकलेले. अभिमन्यू

योद्धा असून ज्या चक्रात अडकला त्यातून तो बाहेर येऊ शकत नव्हता. मृत्यू आत ओढून घेतो. बाहेर सोडत नाही. तो येतो आणि घेऊन जातो. पुन्हा आणून मात्र सोडत नाही.

जगण्याचा सोस अपरिहार्य म्हणून मृत्यू अनिवार्य आहे. परंतु मृत्यूविषयीची भीती जगण्याची लालसा दाखवीत नाही का ? प्राचीन ते अर्वाचीन, संतापासून महंतापर्यंत आणि नेत्यापासून गोत्यापर्यंत साऱ्यांनी मृत्यूची बढाई गाईली. स्तोत्र आळविले. फुशारकी सांगितली. कुणाचा जीव चिमण्या मुलात घुटमळतो म्हणून मृत्यू नको वाटतो. कुणाचा जीव घरदार, पैसा व सत्ता याभोवती घुटमळतो, तरी काही 'संसार म्हणिजे सवेच स्वार। नाही मरणासी उधार। मापी लागले शरीर। घडीने घडी।' चा पुन:प्रत्यय घेत मृत्यूला धुडकावतात.

मरणाला रात्र आडवी, असे म्हणत मृत्यूला बाजूला सारणारे महावीर, मृत्यू आपल्या ज्ञानातून पुढे ढकलणारे डॉक्टर मृत्यूच्या तत्त्वज्ञानाचे पुरस्कर्ते असतात. असा हा भयग्रस्त मृत्यू भीती निर्माण करतो. त्यातून जगण्याचे एक आवर्तन पूर्ण होते. ऐन रंगात आलेले तारुण्य, ऐन बहरात गेलेले बालपण आणि झाडावर पिकलेले फळ खाण्यास उतावळे झालेले म्हातारपण हीसुद्धा मृत्यूची तीन तोंडे आहेत. असा हा तीन तोंडी मृत्यू राहतो एकीकडे, जेवतो दुसरीकडे आणि वावरत असतो तिसरीकडे. मात्र कुठेही आपला मूळ स्वभाव सोडत नाही.

मी वर्गात मुलांना शिकविण्यात रंगतो. कविवर्य तांब्यांची मृत्यूविषयक गीते माझ्या अंगवळणी पडलेली आहेत. या गीतांचे रसग्रहण मला तोंडपाठ आहे. तरीसुद्धा मला 'मरणात खरोखर जग जगते' या ओळीचा अर्थ कळत नाही की, 'का मरणी अमरता ही न खरी' चा भावार्थ कळत असून तो वळणी पडत नाही. तांबे मृत्यूला 'हरीची करुणा' म्हणतात. त्याला 'आईचे घर' म्हणतात. असे असूनही मृत्यूचे भावनात्मक स्वरूप माझी बुद्धी पाहू शकत नाही. मी जेव्हा मृत्यूला तात्त्विक पातळीवर ठेवतो तेव्हा मला मृत्यूचे पिंजण अक्राळ - विक्राळ वाटते. मी जेव्हा मृत्यूचे तत्त्वज्ञान स्वीकारतो तेव्हा मृत्यूनेच मला आपलासा केलेले असते. काळ अनंत आहे, पृथ्वी विपुला आहे. यावर भवभूतीचा आशावाद पटण्यासारखा आहे. परंतु यावर मृत्यूने आपले स्वामित्व गाजविल्यामुळे भवभूतीसह मला तो भयभीत करतो. करुणाग्रस्त बनवितो. माझ्यापुढे असलेली मुले मृत्यूविषयी निरागस असतात. त्यांना या विषयीचे अज्ञान शोभून दिसते. या सर्वात मी ज्ञानी म्हणून वावरतो तो मृत्यूविषयक

पूर्णविराम घेऊन. जीवनात इतरही विरामचिन्हे महत्त्वाची असतात, तरी माझे लक्ष पूर्णविरामाकडे केंद्रित झालेले असते. मी मृत्यूला व मृत्यू मला विसरता विसरत नाही. अशा वेळी माझ्या वर्गातली मुले मला बरेच काही देतात. मी ते निमूटपणे घेतो. मात्र मला काहीच देता येत नाही. मी पगारी अध्यापक कितीतरी कोरडा राहतो.

तुमचा विश्वास बसो अथवा न बसो - तुकाराम सदेह वैकुंठास गेला. 'आम्ही जातो आमुच्या गांवा। आमुचा रामराम घ्यावा।' अशी त्यांची भावसमाधी गाईली जाते. या प्रकारात तुकारामाने मृत्यूवर विजय मिळवला होता काय ? ज्याची सदैव 'ब्रह्मानंदी लागली टाळी' अशी वृत्ती असते त्याला आपले स्वरूप अणूएवढे, आकाशाएवढे दिसते. तरी सुद्धा या अणूत किंवा आकाशात मृत्यूचे प्रतिबिंब सामावलेले असतेच. ज्या ज्ञानेश्वरांना आपले 'व्योम' गवसले - तेही मृत्यूसह - त्यांना 'संजीवनी ज्ञान' मृत्यूनेच पूर्ण करावे लागले. संताचा परमार्थ मृत्यूच्या किनाऱ्याने जाताना स्वार्थाच्या लाटेचे त्याला आकर्षण राहिलेच. म्हणजे मृत्यूचे साम्राज्य सर्वतोपरी पसरलेले आहे. मृत्यूची लोकशाही लोकांसाठी, लोकांची व लोकांकडून आलेली आहे. मृत्यू हुकूमशहा असतो तेव्हा या लोकशाहीतील लोक लपून बसलेले असतात. मृत्यू स्वातंत्र्य हेरतो, समता अजमावून पाहतो व विश्वव्यापी बंधुत्व दाखवून आपलेच वर्चस्व सिद्ध करतो. या चराचर सृष्टीत मृत्यू 'मैत्र जीवाचे' सांगताना प्रत्येकास 'सोयरपण' देतात. आपला प्रांजलपणा शिस्तीतून दाखवणे एवढेच त्याचे कार्य आहे. हे कार्य सूर्य - चंद्रासारखे कधी स्वयंप्रकाशी, कधी परप्रकाशी राहते. त्याची तप्तता, शीतलता सुखदु:खाने कधी द्वंद्वात्मक तर कधी द्वंद्वातीत होते. या कार्यात सहजता आहे. नियमितपणा आहे. आपपरभाव नाही, पक्षपात नाही. हे कार्य कल्पनातीत असल्याने ते भावविवश वाटते. मृत्यू करुणेचे गणित मांडतो, भीतीने ते सोडवितो तर अश्रूने त्याचे उत्तर सापडलेले असते.

मला प्राचार्यांचा मृत्यू पुन्हा पुन्हा आठवतो तेव्हा मृत्यू वैभवाच्या कळसावर चढलेला दिसतो. प्राचार्य मागे पोरकेपण ठेवून गेले. 'अकस्मात तोही पुढे जात आहे' असे त्यांचे जाणे. 'दुजा शोक वाहे' असे आमचे जगणे. या दोघांचा मेळ कुठे, कसा घालायचा ? मृत्यू वाऱ्यासारखा धावणारा, समुद्रासारखा अथांग, आकाशाएवढा अनंत व भास्कराप्रमाणे तेजस्वी असला तरी त्याला शस्त्राने मारता येत नाही, उलट तोच मारतो. तो पाण्यात मिसळला जात नाही तर आपलाच घोट घेतो. त्याला अग्नी जाळत नाही तर आपणच

त्याच्या नावाने सतत जळतो. त्याचे धावणे वाऱ्यासारखे म्हणून न दिसणारे पण जाणवणारे मात्र असते. हे सारे मला प्राचार्यांच्या मृत्यूने 'चार शब्दा' - तून कळाले आहे. माझ्या महाविद्यालयात श्रद्धांजली वाहताना मी एक कविता प्राचार्यांच्या नावे केली. तीत आभाळभर उदासीनता पसरलेली होती. दोन मिनिटांची शांतता राखून आम्ही सारे पुन्हा वर्गात जात आहोत. तांब्यांच्या कवितेचा आधार घेत 'पुन्हा तटावर हेच पाय' स्वरूप उकलून दाखवीत आहोत. सूर्योदय आणि सूर्यास्त ही जगण्याची दोन टोके असल्याचे मला कुणीतरी सांगते. मला मात्र माध्यान्हीचा सूर्य आणि क्षितिजावरचा सूर्यास्त मृत्यूतच दिसतो. अलीकडे माझा प्रत्येक दिवस मृत्यूच घेऊन उजाडतो व मृत्यूला सलामी देत मावळतो. माझ्या मनाचा गुंता आज तरी या मृत्यूचा गुंता झालेला आहे. इसापनीतीत जाळ्यात अडकलेला सिंह केविलवाणे एका उंदराला आळवतो. त्याला आर्त अशी हाक देतो. आणि तो उंदीरही उपकाराची फेड करण्यासाठी तितक्याच आपुलकीने त्या सिंहाकडे येतो. सिंह सुटतो. पुन्हा डरकाळी फोडतो. उंदीर कुठे असतो याचा पत्ता नसतो. मला हे सारे प्राचार्यांच्या आठवणीतून आठवलेले असते. एखाद्या चिमणीने पाहता पाहता उडून जावे, आकाशात दिसेनासे व्हावे. काळोख भरलेले आकाश आपली उदासीनता पांघरून पुढे उभे राहावे. मी त्यात मृत्यूच्या साम्राज्यात हरवलेले माझे प्राचार्य पुन्हा पाहतो.

REFBK-0026781

# मधु जामकर

● उस्मानिया विद्यापीठाचे एम. ए. मराठी प्रथम श्रेणीत, प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण.

● कै. डॉ. ना. गो. नांदापूरकर सुवर्णपदक विजेते.

● गेली २५ वर्षे मराठी भाषा व वाङ्मय यांचे अध्यापन कार्य

● लघुनिबंध, समीक्षा व कविता यांचे सातत्याने नामांकित नियतकालिकांतून लेखन.

● प्रभावी वक्ते म्हणून महाराष्ट्रास परिचित.

● अ. भा. मराठी नाट्य परिषदेच्या स्पर्धेत 'मराठी नाट्यसंगीत' या प्रबंधास प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळाले.

● विविध साहित्य संस्थांशी जवळून परिचित व सभासद.

● साहित्य संमेलने, आकाशवाणी व दूरदर्शनवर चर्चासत्रात, परिसंवादात सहभाग.

● काही कवितांचा प्रसिद्ध गायिकांनी गाईलेल्या कॅसेटमध्ये समावेश तसेच काही प्रसिद्ध लेखकांच्या पुस्तकांना प्रस्तावनाही लिहिल्या आहेत.

● साहित्य संस्कृती व्यवहारात तळमळीने कार्य केले.